**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 प्रमाणे तक्रार क्रमांक 41/2007.**

1) श्री प्रेमदास रेकाजी राठोड
बी–8, लिबर्टी एन्क्लेव्ह, जेपीनगर रोड,
मालवीया नगर, खामला, नागपूर – 25 ..... **तक्रारकर्ता**

**विरुध्द**

1) श्री अविनाश कातडे
जन माहिती अधिकारी तथा
उपजिल्हाधिकारी (निवडणूक)
जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर,
सिव्हील लाईन्स नागपूर ..... **गैरतक्रारदार**

<u>वि वे च न</u>

तक्रारकर्ता यांनी दिनांक 19 मे 2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे जन माहिती अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर यांनी माहिती उपलब्ध करुन न दिल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम 18 नुसार तक्रार दाखल केलेली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. तक्रारदार गैरहजर आहेत. त्यांनी तसे पत्र दिलेले आहे. गैरतक्रारदार जन माहिती अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय हे हजर आहेत.

2. तक्रारदार यांनी दिनांक 22 मार्च 2007 रोजी राज्य जन माहिती अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय यांचेकडे स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक माहितीचा कालावधी सन 2005 पासून 12 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. टपालाद्वारे माहिती व इलेक्ट्रॉनिक फॉर्ममध्ये माहिती उपलब्ध असेल ती माहिती शक्यतोवर सीडीवर द्यावी असे अर्जात नमुद केले आहे. सदरचा अर्ज हा जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयास प्राप्त झालेला नाही असे त्यांनी खुलाशामध्ये नमुद केलेले आहे. सदरचा अर्ज हा जन माहिती

अधिकारी यांचे कार्यालयात कशा प्रध्दतीने दिला गेला याबद्यल तक्रारदारानी अर्जामध्ये कोणत्याही प्रकारे नमुद केलेले नाही किंवा जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयाची पोच दाखल केलेली नाही. माहिती अधिकारी यांनी खुलाशात असे म्हटले आहे की तक्रारदार यांनी राज्य जन माहिती अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, नविन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई येथे दि. 12.2.2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियमा अंतर्गत अर्ज सादर केलेला होता. सदरचा अर्ज राज्य निवडणूक आयोगाकडे दि. 15.4.2007 चे पत्रान्वये दि. 10.5.2007 रोजी प्राप्त झाला व त्याअनुषंगाने दि. 19.2. 2007 रोजी अर्जदार यांचे अर्जात मागणी केलेली माहिती राज्य निवडणूक आयोग, नविन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई – 32 यांचेकडे सादर करण्यात आली. नंतर अर्जदार यांनी दि. 19 मे 2007 रोजी नोंदणीकृत डाकेने माहिती मिळण्यासाठी अर्ज दाखल केला होता व तो दि. 5.6.2007 रोजी प्राप्त झाला. राज्य माहिती आयोग कार्यालयातील दि. 19.6.2007 च्या नोटिसी बरोबर 19.5.2007 व 22.3.2007 च्या अर्जाची प्रत प्राप्त झाली यामध्ये दि. 22 मार्च 2007 चा अर्ज यापूर्वी प्राप्त झालेला नव्हता. तो प्राप्त झाला. अर्जदाराच्या दि. 19.6.2007 च्या अर्जाप्रमाणे दि. 25.6.2007 रोजी माहिती पुरवण्यात आलेली आहे व त्याबद्यलची पोचपावती मिळालेली असून ती सहपत्र म्हणून सादर केली आहे.

3. आयोगाकडे केलेल्या तक्रार अर्जात माहितीच्या अर्जाच्या तारखेचा उल्लेख नाही मात्र सहपत्र म्हणून अर्जाची प्रत (तिकीट) नसलेली जोडलेली आहे. अर्जदाराच्या तक्रारीमध्ये नमूद केलेल्या दि. 22.3.2007 च्या अर्जाच्यापूर्वी राज्य निवडणूक आयोगाकडे त्यांनी दि. 12.2.2007 रोजी तीच माहिती मागितली होती त्याबद्यलचा तक्रारीत उल्लेख नाही. दि. 22.3.2007 च्या अर्जावर नमुद केल्याप्रमाणे कार्यालयातील प्राप्त पोच किंवा कोणत्या माध्यमातून पाठवला आहे असेही त्यांनी नमुद केलेले नाही. किंवा पाठविलेल्या अर्जाचीसुध्दा रु. 10 चे स्टॅम्पसहीत झेराक्स प्रत नाही. मागितलेल्या माहितीपैकी बहुतांश माहिती ही राज्य निवडणूक आयोगानी प्रसिध्द केलेली असते. तसेच बहुतांश माहिती ही महाराष्ट्र शासन राजपत्रातसुध्दा प्रसिध्द केलेली असते. असे असून सुध्दा पुन्हा दिनांक

19.5.2006 रोजी रजिस्टर पोष्टानी पुन्हा अर्ज माहिती अधिकारी यांचेकडे केलेला दिसून येतो. मात्र त्या अर्जाचा उल्लेख राज्य माहिती आयोगाच्याकडे तक्रारीत दिसून येत नाही. दि. 19.5.2006 चा अर्ज जसा पोष्टानी पाठविलेला आहे तसा 22.3.2007 चा अर्ज वर नमुद केल्याप्रमाणे कोणत्या पध्दतीनी पाठविला आहे हे दिसून येत नाही. अर्ज सादर केल्याचा कमीत कमी पुरावा सादर करणे अपेक्षितत असते. याचा अर्थ तक्रारदार यांनी तीच व अधिकची माहिती निवडणूक आयुक्त, राज्य जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर यांचेकडे वेगवेगळे अनेक अर्ज करुन मागितली आहे असे दिसते. त्याअनुषंगाने त्यांना माहिती उपलब्ध झालेली आहे तेही दिसून येते. परंतु तरीसुध्दा त्यांनी आजच्या सुनावणीच्या अर्जात गैरहजर राहण्याची परवानगी मागितलेली असतांना त्यांना माहिती उपलब्ध झालेली आहे याचा पुन्हा ते उल्लेख करीत नाहीत. यावरुन त्यांना माहिती उपलब्ध करुन घेण्यापेक्षा माहिती अधिकारी यांना शास्ती लादणे हे अधिक महत्वाचे वाटते असे दिसून येते. ज्या अर्जदारास प्रामाणिकपणे माहिती हवी असते ते अर्जदार सर्व पत्रव्यवहार किंवा कागदात्रांच्या संदर्भात आयोगास अवगत करतात. अर्जदारानी इतर केलेल्या अर्जाच्याबद्यल कोणत्याही प्रकारे आयोगास अवगत केलेले नाही व फक्त 22.3.2007 च्या अर्जाच्या संदर्भात माहिती त्यांना मिळाली नाही अशी तक्रार त्यांनी आयोगाकडे केली आहे. त्यामुळे शास्तीचा विचार करावयाचा झाल्यास त्यांच्या इतर अर्जाच्या बाबतसुध्दा विचार करावा लागतो. व माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज प्राप्त झाल्याची पोच याचासुध्दा विचार करावा लागतो व नेमकी हीच बाब तक्रारकर्त्यांनी तक्रार अर्जात नमुद न केल्याने व त्यांना त्यांच्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे माहिती अधिकारी यांनी सिध्द केलेले असल्यामुळे सदरची तक्रार ही खारीज करण्यास पत्र आहे.

**<u>नि र्ण य</u>**

1) तक्रारकर्ता यास माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरची तक्रार ही खारीज करण्यात येत आहे.

2) तक्रारकर्ता व गैरतक्रारदार माहिती अधिकारी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 3.10.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 प्रमाणे तक्रार क्रमांक 42/2007.**

1) श्री प्रेमदास रेकाजी राठोड
बी–8, लिबर्टी एन्क्लेव्ह, जेपीनगर रोड,
मालवीया नगर, खामला, नागपूर – 25 ..... **तक्रारकर्ता**

**विरुध्द**

1) श्री मुकेश सोमकुवर
जन माहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी, माहिती तंत्रज्ञान संचालनालय,
सामान्य प्रशासन विभाग, नवीन प्रशासकीय इमारत,
19 वा मजला, मंत्रालय, मुंबई–400032. ..... **गैरतक्रारदार**

<u>वि वे च न</u>

तक्रारकर्ता यांनी दिनांक 19 मे 2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम 18 नुसार तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. तक्रारदार व गैरतक्रारदार कक्ष अधिकारी तथा सहा. जन माहिती अधिकारी, माहिती तंत्रज्ञान संचालनालय हे हजर आहेत.

2. तक्रारदार यांनी दिनांक 5 एप्रिल 2007 रोजी राज्य जन माहिती अधिकारी माहिती तंत्रज्ञान संचालनालय सामान्य प्रशासन विभाग यांचेकडे राज्य सरकारच्या वेबसाईटचे व्यवस्थापन व ई–गव्हर्नन्स कालावधी 7.3.1998 पासून अर्जदाच्या तारखेपर्यंत एकुण 7 मुद्यांवर नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती घेणार असे नमुद करुन माहिती मागितलेली होती. सदरच्या अर्जाच्या संदर्भात त्यांना विहित मुदतीत माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी आयोगाकडे तक्रार केलेली आहे. तक्रारीमध्ये सदरचा अर्ज दिनांक 5 एप्रिल 2007 चा अर्ज त्यांनी कोणत्या पध्दतीने पाठविला होता याबद्यल काहीही नमुद केलेले नाही. दि. 22.9.2007 रोजी त्यांनी आयोगास लिहिलेल्या पत्रामध्ये जन माहिती

अधिका–याकडे कुरिअर मार्फत पाठविलेला अर्ज संचालनालयाने घेण्यास नकार दिल्याने त्यानंतर परत आला असे नमुद केले आहे. परंतु कुरिअर मार्फत पाठविलेला अर्ज व त्याद्यलचा पुरावा व तो परत आल्याचा पुरावा मात्र सादर केला नाही. त्यानंतर तक्रारदार यांनी सदरचा अर्ज हा रजिस्टर पोष्टाने माहिती अधिकारी यांचेकडे पाठविला असे दिसून येते व तो दि. 17.6.2007 रोजी माहिती अधिकारी यांना प्राप्त झालेला दिसून येतो व तसे तक्रारदार यांनी त्यांच्या अर्जात नमुद केलेले सुध्दा आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती अधिकारी यांनी दि. 6 जुलै 2007 रोजी तक्रारदार यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असून ती माहिती त्यांना दि. 14 जुलै 2007 रोजी प्राप्त झाली असेही तक्रारदार यांनी म्हटलेले आहे. परंतु सदरची महिती ही त्यांना हवी असलेली माहिती नाही व ती बरोबर उपलब्ध करुन दिलेली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु त्याकरीता त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (1) अन्वये प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल करावयास पाहिजे होते. परंतु ते तसे केलेले दिसून येत नाही व त्यापूर्वीच राज्य माहिती आयोगाकडे तक्रार केलेली असल्यामुळे कदाचित तसे ते त्यांनी दाखल केलेले दिसून येत नाही. असे असले तरी आतासुध्दा दि. 6 जुलै 2007 चा माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध करुन दिलेल्या माहितीच्या विरुध्द त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा संचालक, माहिती संचालनालय यांचेकडे प्रथम अपील दाखल करणे संयुक्तिक राहिल. सदरचे प्रथम अपील आज जरी मुदतीच्या बाहेर दाखल करावे लागत असले तरी ते राज्य माहिती आयोगाच्या आदेशाप्रमाणे असेल व त्यामुळे मुदतीच्या संदर्भात प्रथम अपीलीय अधिकारी यांनी हरकत घेणे संयुक्तिक राहणार नाही. अर्जदार यांनी जी माहिती त्यांच्या अर्जात मागितलेली आहे ती माहिती संचालनालयाकडे संकलित आहे किंवा नाही याबाबतचा निर्णय हा प्रथम अपीलीय अधिकारी हे संचालनालयाचे प्रमुख असल्यामुळे अधिकृतरित्या प्रथम अपीलाच्या निर्णयाद्वारे उपलब्ध करुन देतील अशी अपेक्षा आहे.

4. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 5 प्रमाणे प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये माहिती अधिकारी हे नियुक्त करणे बंधनकारक आहे. अर्जदाराच्या अर्जाच्या संदर्भात माहिती ही कक्ष अधिकारी तथा सहा. जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली दिसते. तसेच आयोगाच्या पुढे तक्रारीच्या सुनावणीस सुध्दा कक्ष अधिकारी तथा सहा. जन माहिती अधिकारी हे उपस्थित राहिलेले आहे. वास्तविक माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने याबाबत अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघने केलेले दिसते. अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे सहा. जन माहिती अधिकारी ज्यांना तसे कोणत्याही प्रकारचा अधिकार दिलेला नाही व कोणत्याही अर्जाच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन देतांना ती माहिती अधिकारी यांनीच उपलब्ध करुन दिली पाहिजे व आयोगापुढे सुध्दा सुनावणीस माहिती अधिकारीच उपस्थित असले पाहिजेत याची दखल संचालक यांनी घेणे आवश्यक आहे. व यापूढे कमीत कमी राज्याच्या माहिती संचालनालयाच्या मध्ये माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदींबाबत जी उदासीनता दाखविली जात आहे असे दिसून येते ती त्यात सुधारणा होईल अशी अपेक्षा आहे.

## नि र्ण य

1) तक्रारकर्ता यांची तक्रार ही निकाली काढण्यात येत असून तक्रारकर्ता यांनी कक्ष अधिकारी तथा सहा. जन माहिती अधिकारी माहिती तंत्रज्ञान संचालनालय यांनी दि. 6 जुलै 2007 रोजी उपलब्ध करुन दिलेल्या माहितीच्या संदर्भात प्रथम अपील हे प्रथम अपीलीय अधिकारी तथा संचालक माहिती संचालनालय यांचेकडे दाखल करावे व त्यास मुदतीची बाधा येणार नाही.

2) संचालक, माहिती संचालनालय यांनी माहितीचा अधिकारी अधिनियम 2005 च्या कलम 5 प्रमाणे सार्वजनिक प्राधिकरण म्हणून तातडीने माहिती अधिकारी यांची नियुक्ती करावी.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 प्रमाणे तक्रार कमांक 69/2007.**

1) श्री पी. बी. संत, माजी सव्हीसमन
बी 39, वासुदेव नगर, हिंगणा रोड,
नागपूर – 440016 ..... **तक्रारकर्ता**

**विरुध्द**

1) श्री हेमंत नानोटी
जन माहिती अधिकारी तथा
सहा. संचालक, नगर रचना विभाग
(अतिरिक्त कार्यभार) नागपूर महानगर पालिका
नगपूर. ..... **गैरतक्रारदार**

## <u>वि वे च न</u>

तक्रारकर्ता यांनी दिनांक 5.7.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम 18 (1) प्रमाणे त्यांच्या दिनांक 21.2.2007 च्या माहिती मिळण्याच्या अर्जाच्या संदर्भात माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे तक्रार दाखल केलेली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. तक्रारदार व गैरतक्रार तथा माहिती अधिकारी हे हजर आहेत.

2. तक्रारदार यांनी दिनांक 21 फेब्रुवारी 2007 रोजी जोडलेल्या सहपत्राच्या मध्ये मागितलेल्या माहिती प्रमाणे माहिती मागितली होती. सदारच्या अर्जाच्या संदर्भात दिनांक 13.3.2007 रोजी संदर्भाधीन अर्जान्वये अपेक्षिलेली माहिती नगर रचना विभाग नागपूर महानगर पालिका नागपूर येथे उपलब्ध आहे. नगर रचना विभागातून कागदपत्रांच्या झेराक्स प्रती आवश्यक शुल्क भरुन प्राप्त करुन घ्याव्यात असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दि. 3.4.2007 रोजी तक्रारदार यांनी माहिती अधिकारी उपसंचालक नगर रचना (प्रशासन) नागपूर महानगर पालिका कडे दि. 13.3.2007 च्या उत्तराच्या संदर्भात पत्र लिहून निश्चित फी कळविलेली नसल्यामुळे आपणास माहिती पुरवावयाची नाही अशी

तक्रार या अर्जात केलेली दिसून येते. त्यानंतर दि. 3.5.2007 रोजी प्रथम अपीली प्राधिकारी म्हणून पुन्हा सहा. संचालक नगर रचना प्रशासन यांचेकडे अपील केलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या व प्रथम अपीलाच्या संदर्भात उत्तर दिलेले नसल्यामुळे व सुनावणी झालेली नसल्यामुळे तक्रार दाखल केलेली दिसून येते.

3. तक्रारदार यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की संपूर्ण तळेगाव दाभाडे स्कीम मधील आदित्य डेव्हलपर्सच्या संदर्भात कोणती कागदपत्रे आवश्यक आहेत तसेच नियमाच्या संदर्भात कोणते नियम आवश्यक आहेत हे स्पष्टपणे कळविले असते किंवा निरीक्षण घेवून कागदपत्रे निश्चित दाखवून त्याचा खर्च भरुन घेवून अर्जदारास माहिती पुरवता आली असती व त्या अनुषंगाने दिनांक 13.3.2007 चे पत्र दिलेले होते. परंतु सदरच्या पत्रामध्ये स्पष्टता नाही व ते मोघम आहे असे तक्रारकर्त्याचे म्हणणे आहे व त्यामुळेच आतापर्यंत आवश्यक शुल्क त्यांना भरता आले नाही. प्रथम अपील केले होते परंतु त्याची सुनावणी झाली नाही. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये अर्जदारानी माहिती अधिकारी यांचे वरील वरिष्ठ अधिकारी जे असतील त्यांचेकडे प्रथम अपील करावयास पाहिजे होते परंतु दि. 3.4.2007 चा अर्ज हा माहिती अधिकारी उपसंचालक नगर रचना अशा पध्दतीने केलेला आहे व प्रथम अपील हे सहा. संचालक नगर रचना अशा पध्दतीने केला आहे. त्यामुळे दि.3.4.2007 चा अर्ज व दि. 3.5.2007 चा अर्ज हा संदर्भहिन म्हणून वेगळया शाखांमध्ये जावून पडलेला असण्याची शक्यता दिसते. असे असले तरी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चा उद्येश हा माहिती उपलब्ध करुन देणे असल्यामुळे अर्जदारास त्यांनी मागितलेली माहिती ही उपलब्ध करुन देणे आवश्यक ठरते. त्यामुळे आता तांत्रिक बाबीमध्ये न अडकता माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून दोन दिवसात तक्रारकर्त्यानी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात त्यांना पोष्टाने खर्च व माहिती उपलब्ध करुन देण्याचा पोष्टल खर्च हा कळविणे व खर्चाचा भरणा केल्यानंतर मागितलेल्या माहितीची झेराक्स हया 10 दिवसात उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल.

**<u>नि र्ण य</u>**

1) तक्रारदार यांची तक्रार ही अंशतः मंजुर करण्यात येत असून त्यांच्या दिनांक 21.2.2007 च्या अर्जासोबत असलेल्या परिशिष्टातील माहिती प्रमाणे माहिती ही उपलब्ध करुन देण्याकरीता निर्णय मिळाल्यापासून 2 दिवसात होणा–या प्रतींचा खर्च व टपाल खर्च पोष्टाने कळविण्यात यावा. माहितीच्या संदर्भातील खर्चाचा भरणा झाल्यानंतर 10 दिवसात माहितीच्या छायाप्रती करुन रजिस्टर पोष्टानी तक्रारकर्ता यांच्या दिलेल्या पत्त्यावर पाठविण्यात याव्यात.

2) तक्रारकर्ता व माहिती अधिकारी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 4.10.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 प्रमाणे तक्रार कमांक 82/2007.**

1) श्री विकास शेंडे
नागरी बॅंक कॉलनी, राष्ट्रभाषा प्रचार समीतीच्या मागे,
हिन्दनगर वर्धा. ..... **तक्रारकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अपर आयुक्त, नागपूर महानगर पालिका,
नागपूर.

2) श्री हेमंत नानोटी
जन माहिती अधिकारी तथा
सहा. संचालक, नगर रचना विभाग
(अतिरिक्त कार्यभार) नागपूर महानगर पालिका
नगपूर. ..... **गैरतक्रारदार**

## वि वे च न

तक्रारकर्ता यांनी दिनांक 12.7.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम 18 (1) नुसार तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. तक्रारदार व गैरतक्रारदार तथा माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी गैरहजर आहेत.

2. तक्रारदार यांनी दिनांक 23.4.2007 रोजी तक्रार अपील क. 12/2007 मध्ये कार्यवाही अहवाल हा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सादर करावा व कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर तसे अर्जदारास व आयोगास कळवावे. त्यामुळे अपीलकर्त्याचा अर्ज मंजूर करण्यात येत असून उत्तरवादीनी अर्जदाराच्या तक्रारीची दखल घेवून त्यास योग्य तो निर्णय मिळेल असे पाहावे. त्याप्रमाणे सुनावणी घेण्यात आलेली दिसून येते. परंतु सुनावणीच्या प्रमाणे कार्यवाही करुन व आवश्यक वाटल्यास म्हाडाच्या अधिका–याशी

संपर्क करुन एक आठवडयाच्या आंत अपीलार्थीस कळविण्याचे निर्देश देण्यात आले होते. परंतु याबाबत माहिती अप्राप्त असल्यामुळे दि. 15.6.2007 रोजी माहिती अधिका–यांना विचारणा केली असता संबंधित झोनने याबाबत कायद्याचे सल्लागाराचे अभिमत घेवून पूढील कार्यवाही करण्यात येईल असे कळविले होते. अर्जदार श्री विकास शेंडे यांना दिलेल्या दि. 16.8.2007 च्या पत्रानुसार उपरोक्त कॉलनीमध्ये नागपूर सुधार प्रन्यासकडून 12 बांधकामावर दि. 28.9.1995 ला नोटिस कार्यवाही करण्यात आली होती. व त्याअनुषंगाने दि. 25.5.1996 ला अंशतः अनधिकृत बांधकाम काढण्यात आले होते त्यामुळे 12 बांधकामावर पूढील कार्यवाही नागपूर सुधार प्रन्यासने करुन तसे अर्जदारास परस्पर कळवावे असे सदरच्या पत्राने कळविलेले दिसत आहे. या प्रकरणात नागपूर सुधार प्रन्यासनी सन 1995 मध्ये नोटिस कार्यवाही केली असल्यामुळे याबाबत नागपूर सुधार प्रन्यासने पूढील कार्यवाही करावयाची आहे हे स्पष्ट दिसते व त्याप्रमाणे माहिती अधिकारी यांनी नागपूर सुधार प्रन्यास व अपीलार्थीस कळविण्यात आलेले दिसते. त्यामुळे अपीलार्थीस याबाबत म.न.पा.कडून अपेक्षित माहिती मिळालेली असल्यामुळे व यापूढील कार्यवाहीची माहिती नागपूर सुधार प्रन्यासकडून अपेक्षित असल्यामुळे ही माहिती देण्यासाठी या निर्णयाची प्रत नागपूर सुधार प्रन्यासकडे पाठविण्यात येत आहे तसेच म.न.पा.स्तरावरील कार्यवाही पूर्ण झाली असल्यामुळे प्रकरण निकाली काढण्यात यावे अशी विनंती राज्य माहिती आयोगास करण्यात यावी असे नमूद केले आहे. यावरुन असे दिसते की म.न.पा.नी कायदा सल्लागाराचे अभिमत घेतलेले आहे. त्यावरुन सुध्दा असे दिसून येते की अर्जदाराने अपेक्षित केलेली कार्यवाही ही म.न.पा.च्या कक्षेत येत नसून ती नागपूर सुधार प्रन्यासच्या कक्षेत येते व त्यामुळे पूढील कार्यवाही करण्याकरीता नागपूर सुधार प्रन्यासला कळविण्यात आलेले दिसते. तक्रारदार यांनी म.न.पा. ही नियोजन प्राधिकरण म्हणून 2002 मध्ये घोषित झालेले असल्याचे शासन निर्णय दाखविले. त्याबाबत माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले असले तरी पूर्वीची कारवाई ही नागपूर सुधार प्रन्यासनी केलेले असल्यामुळे व तसे कायदा सल्लागाराचे अभिमत असल्यामुळे ती कार्यवाही नागपूर

सुधार प्रन्यासनी पूर्ण करावी व म्हणून त्यांच्याकडे निर्णयाची प्रत पाठविण्यात येत आहे असे म्हटले. माहितीच्या अधिकारामध्ये एखाद्या कार्यवाहीच्या संदर्भात ती पूर्ण झाली किंवा नाही याबाबतची माहिती मिळू शकते. ती पूर्ण होवून अहवाल सादर केला पाहिजे अशा प्रक्रियेचा आग्रह धरता येत नाही त्यामुळे तक्रारदार यांनी केलेले संदर्भित तक्रारीनुसार म.न.पा.मध्ये कायदा सल्लागाराचे अभिमतसहीत ज्या ज्या टिपण्या झाल्या असतील त्या टिपण्याच्या छायांकित प्रती अपीलकर्ता यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल व त्यावरुन त्यांना अपेक्षित कार्यवाहीच्या बद्यलची माहिती ही उपलब्ध होवू शकेल.

**नि र्ण य**

1) तक्रारकर्ता यांची तक्रार ही अंशतः मंजुर करण्यात येत असून त्यांना अपेक्षित असलेल्या कार्यवाहीच्या संदर्भात म.न.पा.च्या नगर रचना विभागात दिनांक 3.5.2005 च्या अर्जाच्या संदर्भात जी जी कार्यवाही झालेली असेल त्या कार्यवाहीच्या बद्यल असलेल्या सर्व टिपण्या विधी अभिमत सहीत माहिती त्यांना हा निर्णय मिळाल्यापासून 2 दिवसात विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) तक्रारकर्ता व माहिती अधिकारी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 4.10.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 473/2007.**

1) श्री टि. के. सुनिलकृष्णन
महाराष्ट्र टुरिझम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड,
सांस्कृतिक बचत भवन, सिताबर्डी, नागपूर. ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) श्री विजय चव्हाण,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जनरल मॅनेजर,
महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ,
9 वा मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉइन्ट,
मुंबई – 400 021.

2) श्री दे. कि. जाधव
जन माहिती अधिकारी तथा
डेप्युटी जनरल मॅनेजर,
महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ,
9 वा मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉइन्ट,
मुंबई – 400 021.

**वि वे च न**

अपीलकर्ता यांनी दिनांक 21/9/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरजर आहे उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 4.7.2006 रोजी माहिती मिळण्यासाठी माहिती अधिकारी यांचेकडे अर्जासोबत जोडलेल्या परिशिष्ट ''अ'' प्रमाणे 21 मुद्यांवर माहिती मागून स्वतः दिलेल्या तक्त्यामध्ये माहिती उपलब्ध करुन द्यावी म्हणून विनंती केली होती. सदरच्या अर्जाच्या संदर्भात दि. 25 जुलै 2006 रोजी मागितलेली माहिती ही जनहितार्थ नाही म्हणून विनंतीचा विचार करता येत नाही असे कळविण्यात आले आहे. सदरच्या निर्णयाने व्यथित होवून अपीलकर्ता यांनी दि. 4.8.2006 रोजी प्रथम अपील दाखल केले होते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दि. 18.9.2006 रोजी दिला असून माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम केला आहे व तसे अपीलकर्ता यास कळविलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णयाविरुध्द द्वितीय अपील दाखल केले आहे.

3. अपीलकर्ता यांनी दि. 4.7.2006 च्या अर्जामध्ये सन 1984 पासून तर अर्ज केल्याच्या दिनांकापर्यंत प्रसिध्दी, विधी विषयक व डेक्कन ओडीसी हया ट्रेनच्या संदर्भात आतापर्यंत झालेला खर्च दिलेल्या तक्त्यामध्ये पोष्टाने देण्यात यावा किंवा इ—मेल पत्ता दिला आहे त्यावर देण्यात यावा असे नमुद केलेले दिसून येते व वर नमुद केल्याप्रमाणे 21 मुद्यांवरसुध्दा माहिती मागितलेली आहे. 21 मुद्यांची छाननी केली असता असे दिसून येते की अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती अभिप्रायात्मक प्रश्नाच्या स्वरुपात मागितलेली आहे तसेच मागितलेल्या कालावधीतील माहिती ही दिलेल्या तक्त्या प्रमाणे मागितलेले असल्यामुळे ती माहिती साधारणतः 30 वर्षाची जी तयार करुन द्यावी लागेल व अशाप्रकारे माहिती उपलब्ध करुन देणे हे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 2 (च) मधील ''माहिती'' व (त्र) मधील ''माहितीचा अधिकार'' या संज्ञेच्या व्याख्येप्रमाणे अपेक्षित नाही. व त्यामुळे प्रथमदर्शनी सुध्दा ही माहिती अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे नसल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नाही. माहिती अधिकारी यांनी ही माहिती सार्वजनिक हितार्थ नाही हया कारणावरुन ती नाकारलेली आहे. त्याबद्यल त्यांनी खुलासा दाखल केलेला आहे. सदरच्या खुलाशामध्ये त्यांनी विधी विषयक अभिमताची प्रत व अपीलकर्ता यांची पार्श्वभूमी निदर्शनास आणणारी

कागदपत्रे दाखल केले आहे. अपीलकर्ता हा महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ या कंपनीचाच अधिकारी आहे. आज अपीलकर्ता हा निलंबीत आहे. अर्ज करतेवेळेस हा सेवेत होता परंतु अपीलकर्त्याच्या विरुध्द गैरवर्तणूकीच्या बाबत वेळोवेळी कारणे दाखवा नोटिसेस त्यांना देण्यात आलेले दिसून येते. साधारणतः 11 डिसेंबर 1990 पासून आणि वेगवेगळया कार्यालयामध्ये कार्यरत असतांना त्यांना जवळपास 30 ते 35 कारणे दाखवा नोटिसेस दिलेले दिसून येतात. स्त्री कर्मचा–यांना त्रस्थ करण्याच्या संदर्भातसुध्दा त्यांच्या विरुध्द आरोप केले गेलेले आहेत व त्यांची खातेनिहाय चौकशी सुरु आहे. आर्थिक गैरव्यवहाराच्या बाबतीतसुध्दा काही नोटिसेस दिसतात. विशेषतः दि. 17.2.2006 रोजी बेशिस्त गैरवर्तणूकीबाबत व्यवस्थापकीय संचालक यांनी दिलेली नोटिस आहे व त्यामध्ये 5 मुद्यांच्यावर त्यांना कारणे दाखवा नोटिस दिलेली दिसून येते. स्त्री कर्मचा–यांनी केलेल्या तक्रारीसुध्दा त्यांच्या विरुध्द आहेत व त्याच्या प्रतिलिपी हया दाखल केलेल्या आहेत. दि. 13.7.2006 रोजी सुध्दा त्यांना पुन्हा नोटिस दिलेली दिसून येत आहे. व अशाप्रकारे त्यांच्या विरुध्द आरोप असल्यामुळे त्यांनी जी माहिती मागितलेली आहे ती माहिती ही सार्वजनिक हितार्थ नसून स्वहितार्थ बचाव करण्याकरीता मागितलेली आहे. असे वाटल्यावरुनच ही सार्वजनिक हितार्थ नाही म्हणून नाकारलेली आहे असे माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. तसेच ज्या स्वरुपात त्यांनी माहिती मागितलेली आहे त्या माहितीचा ते गैरवापर करतील असेही दुर्लक्षून चालणार नाही असेही माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. माहिती अधिकारी यांनी जे विधी विषयक अभिमत घेतलेले आहे त्यामध्येसुध्दा खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेले आहे.

However, in your case, it appears that the information sought for by Shri Sunilkrishnan if for personal purposes and/or for personal grievances against the Corporation. It therefore, can be incorrect from the preamble to the Act as well as the aims and

4

objects of the Act that the law makers did not intend to confer a right on an cmployee to call for information from the employer irrespective of whether it is a "it is a public authority" or not for personal gain or grievances. The intention of the law makers would be evident from the exemption provided for under Section 8 of the Act. The provisions of subsection (1) of Section 1 of Section 8 provide for exemption of disclosure of information, which relates to personal information, the disclosure of which has no relationship to any public activity or interest or which would cause unwarranted invasion of privacy of the individual unless the Central Public Information Officer or State Public Information Officer or the Appellate Authority as the case may be, is satisfied that the larger public interest justifies the disclosure of such information, which relates to personal information contemplated by this provision. Section 8(1)(J) therefore, exempts information which relates to personal information, the disclosure of which has no relationship to any public activity or interest.

In our opinion, if the provisions of the Act are to be interpreted and implemented with reference to information that has relationship with public activity or public interest and if the provisions of the Act are not interpreted in this manner, all "Public

Authorities" including public sector corporations would be flooded with applications from employees seeking all or any information from the employer and thereby the provisions of the Act itself could be rampantly misused and abused, if all or any information irrespective of its public interest or utility is sought to be provided to the applicant. In our opinion, the Competent Authority under the Act cannot turn a blind eye and direct furnishing of information without ascertaining that such applicant is acting bonafide and not for personal gain or private motive or political motivation or other oblique considerations and therefore, nobody can be allowed to abuse the provisions of the Act for oblique considerations, if it relates to his personal matter. Section 8(1)(j) of the Right to the Information Act, 2005 could carp out an excekption to the right to claim information and therefore, since it will be within the jurisdiction of the Competent Appellate Authority to scan the past service record before taking appropriate decision to find out the bonafides or otherwise on the part of the employer, but the entire pase record will have to be placed before the Appellate Authority to justify the contention that the application in question is covered by the exemption under Section 8(1)(j) of the Act.

6

The Corporation would therefore, be perfectly justified to refuse to furnish the information by taking into account the aims and objects of the Act. The information called for by Shri Sunilkrishnan therefore, can be refused on the ground that it is not public interest or of public importance.

प्रथम अपीलाचा निर्णयसुध्दा वरील सर्व बाबींचा विचार करुनच दिलेला असून सदरचा निर्णय हा वरील पाश्वभूमीवर योग्य दिसून येतो. यावरुन माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदींचा वापर हा वैयक्तिक हेवेदावे निश्चित करण्याकरीता वापरते हे निश्चितच अपेक्षित नाही आणि म्हणून अपीलकर्ता यांचे द्वितीय अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## नि र्ण य

1) अपीलकर्ता यांचे दि. 4.7.2006 च्या माहितीच्या अर्जाच्या संदर्भात प्रथम अपीलीय अधिकारी यांनी व माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय हा योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.
2) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दिनांक 5.10.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

However, result oriented furnishing of the Regional Offices are not equipped with at least sufficient staff out of sanctioned strength. No efforts are made by the office of the Commission inspite of the reduced burden and excess staff at the Head office. Aothough supervision direction and management powers are vested in the Chief Information Commissioner, are subject to the decision taken in the meeting of the Commission. However, the administrative powers are not fully used and the disposal also at Mumbai office is very poor in comparison to the State Information Commissioner's at Nagpur and Aurangabad.

When the Commission consists only State Chief Information Commissioner, it does not matter the International Conference at London was attended by State Chief Information Commissioner. When it becomes multi-member body the recommendation of the Commission according to the decision taken in its meeting held is must. The intimation regarding the International Conference of Information Commissioner's at Wellington, New Zealand from 26th November, 2007 to 29th November, 2007 was neither brought to notice of the members of the Commission i.e. State Information Commissioner's nor it is put before the members of the Commission in the meeting held in June, July, Augst 2007 therefore the D.O.Letter No. Tour 2007/CR 75/01 dated 1.6.2007 is not according to the approval of the Commission.

Similarly when Shri Vijay Kuvwalekar took oath, the State Information Commissioner were neither invited nor informed at least.

Even the Conference of the all India Information Commissioner's held in Pune some what in June or July the Chief Information Commissioner had not intimated to State Information Commissioner's at Nagpur and Aurangabad office. I came to know it when the Chief Information Commissioner, State of Madhya Pradesh, on his way back to Bhopal, met me next day in Nagpur. He had surprisingly asked why you have not attended the Conference.

The Right of Information Act, 2005 is enacted by Parliament to provide for setting up the practical regime of right to information under the control of Public Activities in order to permit transperancy and accountability in working of every Public authority the Constitution of the Information Commission and for matters connected herewith.

However, there is no tranperancy in the functioning of the Commission itself in Maharashtra with the assumption that there is no accountability of the Chief Information Commissioner towards the Commission.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 549/2007.**

1) सौ. यशश्री देवराम नंदनवार (हेडाऊ)
''तथास्तु'' प्लॉट नं. 37, भांडे प्लॉट,
उमरेड रोड, नागपूर 440009. ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) श्री शरद चव्हाण,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसंचालक (सं) तथा सदस्य सचिव यांचे कार्यालय
अनुसूचित जाती जात प्रमाणपत्र तपासणी,
गिरीपेठ नागपूर.

2) श्रीमती बी. जे. गिरी
जन माहिती अधिकारी तथा
संशोधन अधिकारी,
उपसंचालक (सं) तथा सदस्य सचिव यांचे कार्यालय
अनुसूचित जाती जात प्रमाणपत्र तपासणी,
गिरीपेठ नागपूर. ..... **उत्तरवादी**

**नि र्ण य**

अपीलकर्ती हिने दिनांक 24/9/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ती हिने दिनांक 22.6.2006 रोजी माहिती मिळण्यासाठी शासकीय माहिती अधिकारी उपसंचालक म्हणून नागपूर महसूल विभागाअंतर्गत हलबा/हलबी अनुसुचित जमातीचे वैधता प्रमाणपत्र वाटपाचा तपशिल यादीतील अनुक्रमांक 19 वर असलेल्या हलबा किंवा हजबी अर्जदाराना वैधता प्रमाणपत्र वितरीत केल्या गेलेल्या प्रमाणपत्राची माहिती नमुद केलेल्या तक्त्यात उपलब्ध करुन द्यावी.

| अ. क्र. | वैधता प्रमाणपत्र दिलेल्या अर्जदाराचे नाव | वैधता प्रमाणपत्राचा अ.क्र. व केस नं. दिनांकासहित | ज्या जातीच्या प्रमाण–पत्राला वैध ठरविले त्या जात प्रमाणपत्राचा रेव्हेन्यु केस नं. दिनांकासहित | जातीचे प्रमाणपत्र निर्गमीत करणा–या अधिका–याचा संपूर्ण तपशिल |
|---|---|---|---|---|
| | | | | |

सदरच्या माहितीचा कालावधी हा जानेवारी 2000 ते 2002 आहे व माहिती ही नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या संदर्भात दिनांक 10.7.2007 रोजी ''विषयांकीत प्रकरणी कलम 2 (च) कलम 2 (झ) (एक) नुसार ''माहिती'' व ''अभिलेख'' याचा अर्थ संज्ञेनुसार कोणताही दस्तऐवज, हस्तलिखीत फाईल असा होतो. तेव्हा शासनाच्या अभिलेख्यामध्ये उपलब्ध असलेली माहिती ही कागदपत्राच्या स्वरुपात पुरविणे अपेक्षित आहे. त्यामुळे आपण मागितलेल्या तक्त्यात माहिती देणे शक्य नाही'' असे कळविलेले दिसून येते. सदरच्या निर्णयाने व्यथित होवून अपीलकर्ती हिने दि. 14.7.2006 रोजी पुन्हा प्रथम अपील हे उपसंचालक तथा सदस्य सचिव यांचेकडे दाखल केले होते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दि. 19.8.2006 रोजी दिलेला असून त्यामध्ये माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम केला असून पुन्हा ''आपले दि. 22.6.2006 चे अर्जात आपण जे रकाने नमुद केले आहे त्या रकान्यानुसार कार्यालयात माहिती ठेवली जात नाही वा जातनिहाय रेकॉर्ड ठेवल्या जात नाही परिणामी आपण विचारणा

केलेल्या विविध रकान्यानुसार माहिती ही शासकीय प्राधिकरणाच्या साधनसामुग्रीच्या प्रमाणाबाहेर व माहिती तयार करण्याकरीता बराच कालावधी लागणार असल्याने शासकीय माहिती अधिकारी यांनी आपणास माहिती देण्याचे नाकारले आहे या निर्णयास मी सहमत असून आपले अपील कलम 7 (9) तसेच आपण आपले अर्जात उद्दिष्ट नमुद केलेले नाही यास्तव कलम 8 (त्र) नुसार फेटाळण्यात येत आहे'' असे कळविलेले दिसून येत आहे. सदरच्या निर्णयाने व्यथित होवून द्वितीय अपील दाखल केले आहे. द्वितीय अपीलामध्ये 1) माहिती अधिकारी यांनी दुष्ट हेतू ठेवून माहिती पुरविण्यास टाळाटाळ केली

2) अनुसुचित जमाती जात प्रमाणपत्र तपासणी समिती अनुसुचित जमातीचे जात प्रमाणपत्र तपासून जातीचे वैधता प्रमाणपत्र निर्गमित करते. कायद्यानुसार वैधता प्रमाणपत्रे वितरणाच्या नोंदी ठेवणे बंधनकारक असूनसुध्दा प्रमाणपत्र वितरण केलेल्या उमेदवाराची नोंद नाही किंवा फाईल नाही असे कारण जाणूनबुजुन देणे व माहिती न देणे.

3) फक्त 2 वर्षात ठराविक जातीच्या जात प्रमाणपत्राची यादी संकलित करुन पुरविणे अपेक्षित असतांनाही अशी माहिती न देणे

4) शासकिय माहिती नियम 7 (9) अन्वये शासकीय साधनसामुग्रीच्या प्रमाणाबाहेर आहे अशी खोटी कारणे देवून माहिती नाकारणी ही कारणे दिली असून पुन्हा मागितलेली माहिती मागितलेल्या स्वरुपात उपलब्ध करुन मिळावी व शासकीय माहिती अधिका—याने दुष्ट हेतूने हेतुपुरस्सर व जाणुनबुजुन माहिती पुरविली नाही तसेच अपीलीय अधिका—याने दुष्ट हेतुने अपील फेटाळले करीता या कायद्याच्या कलम 20 नुसार प्रतिदिन रु. 200 दंड आकारावा व वरील विषयांकित माहिती उपलब्ध करुन द्यावी ही विनंती. सदरच्या अपील मेमोच्या शेवटी प्रतिलिपी मा. पद्मश्री अन्नासाहेब हजारे अध्यक्ष भ्रष्टाचार निमुर्लन समिती, नागपूर महाराष्ट्र राज्य असेही नमुद केलेले आहे.

3. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदींप्रमाणे अर्जदाराने मागितलेली माहिती ही उपलब्ध करुन देणे हा अधिनियमाचा उद्येश आहे. आणि मागितलेल्या माहितीच्या प्रमाणे माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन दिली किंवा नाही ही सिध्द करण्याची जबाबदारी ही माहिती अधिकारी यांची आहे. परंतु असे असतांना अर्जदाराचा अर्ज आल्यानंतर त्या अर्जाची छाननी ही अधिनियमाच्या इतर कलमाच्या संदर्भात करणे आवश्यक ठरते व त्यामुळे मागितलेली माहिती ही ''माहिती'' व ''अभिलेख'' या संज्ञेच्या व्याख्येत बसते किंवा नाही त्याबद्यलची छाननी करुन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिलेले दिसून येते. असे असले तरी अर्जदाराचे समाधान न झाल्यास प्रथम अपीलाची तरतूद कलम 19 (1) मध्ये करण्यात आली आहे. प्रथम अपीलाच्या संदर्भातसुध्दा अपीलीय अधिकारी यांनी माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय हा योग्य आहे किंवा अयोग्य आहे हे तपासून अर्धन्यायिक पध्दतीनी निर्णय द्यावयाचे अपेक्षित असते व त्याप्रमाणे प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येतो व तरीही अर्जदाराचे समाधान न झाल्यास आयोगाकडे द्वितीय अपील करण्याची तरतूद करण्यात आली आहे. आयोगाने अधिनियमाच्या कलम 20 प्रमाणे माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर हे 4 मुद्यांवर तपासून पाहावयाचे असते. कोणत्याही वाजवी कारणाशिवाय माहिती मिळणेबाबतचा अर्ज स्विकारण्यास नकार दिला आहे किंवा कलम 7 च्या पोटकलम (1) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या वेळेत माहिती सादर केलेली आहे किंवा माहिती मिळविण्यासाठी केलेली विनंती दुष्ट हेतूने नाकारलेली आहे किंवा जाणुनबुजुन चुकीची, अपूर्ण किंवा दिशाभूल करणारी माहिती दिलेली आहे किंवा मागितलेली माहिती नष्ट केलेली आहे किंवा माहिती स्विकारण्यास कोणत्याही प्रकारे अडथळा आणला आहे याबाबत तपासून आयोगाचे मत तसे झाल्यास शास्ती लादण्याची तदतूद करण्यात आलेली आहे. व त्यामुळे माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर हे त्या पार्श्वभूमीवर तपासून पाहाणे आवश्यक ठरते. माहिती अधिकारी यांनी ''माहिती'' व ''अभिलेख'' या संज्ञेच्या व्याख्येत अर्जदारानी मागितलेली माहिती येत नसल्यामुळे ही पुरवता येत नाही परंतु अभिलेख्यामध्ये उपलब्ध

असलेली माहिती ही कागदपत्राच्या स्वरुपात पुरविणे अपेक्षित आहे व तक्त्यात माहिती देता येणे शक्य नाही तसेच प्रथम अपीलातसुध्दा कलम 7 (9) प्रमाणे माहिती देण्याचे नाकारलेले असल्यामुळे सदरच्या तरतुदींच्या आधारे तपासणे आवश्यक ठरते. ''माहिती'' या संज्ञेची व्याख्या खालीलप्रमाणे आहे. ''माहिती'' याचा अर्थ कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, इ—मेल, अभिप्राय, सुचना, प्रसिध्दीपत्रके, परिपत्रके, आदेश, नोंदवहया, संविधा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही ईलेक्ट्रॉनिक स्वरुपातील साधनसामुग्री यांचा समावेश होतो अशी केलेली आहे. ''अभिलेख'' यात कोणतेही दस्तऐवज, हस्तलिखित व फाईल, एखाद्या दस्तऐवजाच्या कोणताही सुरक्षापट, अशा सुरक्षापटात संग्रहित केलेल्या प्रतिमेची किंवा प्रतिमांची कोणतीही नकल, संगणकाद्वारे किंवा कोणत्याही अन्य उपकरणाद्वारे तयार केलेले कोणतेही अन्य साहित्य यांचा समावेश होतो. या दोनही संज्ञांच्या व्याख्यांच्या निकषावर अपीलकर्ती हिने अर्जामध्ये मागितलेल्या तक्त्याच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन देणे शक्य आहे किंवा नाही हे तपासून पाहाणे आवश्यक ठरते व त्याकरीता माहिती अधिकारी यांना विचारले असता माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की सन 2000—2002 या कालावधीतील माहिती ही नोंदवहीमध्ये ज्याक्रमाने कोणत्याही जातीचे अर्ज आलेले असतील त्याप्रमाणे नोंद केलेली असते. कोणत्याही एखाद्या विशिष्ट जातीच्या करीता स्वतंत्र अशी नोंदवही नसते व त्यामुळे सदरची माहिती अपीलकर्ती हयांनी विहित केलेल्या तक्त्यात उपलब्ध करुन द्यावयाची झाल्यास त्या सर्व नोंदवहया तपासून तक्ता भरुन द्यावा लागेल व ही प्रक्रिया दोनही संज्ञाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. व त्यामुळे त्यांनी अशा प्रकारचे उत्तर हे अपीलकर्ती अर्जदार यांना दिलेले आहे. प्रथम अपीलाच्या संदर्भातसुध्दा जो निर्णय दिलेला आहे त्या निर्णयामध्ये अधिनियमाच्या कलम 7 (9) तसेच कलम 8 (त्र) नुसार अपील फेटाळण्यात येत आहे असे म्हटलेले आहे. सदरच्या निर्णयाच्या संदर्भातसुध्दा कलम 7 (9) हा तपासून पाहाणे आवश्यक ठरते. ''सार्वजनिक प्राधिकरणाची'' साधनसामुग्री या कामासाठी प्रमाणाबाहेर

वळवावी लागत नसल्यास किंवा प्रस्तुत अभिलेख सुरक्षित ठेवण्याच्या किंवा जतन करण्याच्या दृष्टिने हानीकारक नसल्यास माहिती ज्या स्वरुपात मागण्यात आली असेल त्याच स्वरुपात ती सर्वसाधारणपणे पुरविण्यात येईल असे आहे. त्यामुळे वर नमुद केल्याप्रमाणे व माहिती अधिकारी यांनी केलेल्या खुलाशाप्रमाणे सन 2000 ते 2002 च्या कालावधीतील हलबा/हलबी या जमातीच्या उमेदवाराची माहिती ही शोधून तयार करुन देण्यास शासकीय प्राधिकरणाच्या साधनसामुग्रीच्या प्रमाणाबाहेर व माहिती तयार करण्यास बराच कालावधी लागणार असल्याने शासकीय माहिती अधिकारी यांनी आपणास माहिती देण्याचे नाकारले आहे त्या निर्णयास सहमत असून सदरचा निर्णय दिलेला दिसतो. या दोनही निर्णयाच्या संदर्भात पुन्हा अपीलकर्ती हिने द्वितीय अपीलामध्ये जो मुद्या मांडलेला आहे त्यामध्ये असे म्हटले आहे की कायद्यानुसार वैधता प्रमाणपत्रे वितरणाच्या नोंदी ठेवणे बंधनकारक असूनसुध्दा प्रमाणपत्र वितरण केलेल्या उमेदवाराची नोंद नाही किंवा फाईल नाही असे कारण जाणुनबुजुन देणे व माहिती न देणे असे म्हटलेले आहे. माहिती अधिकारी यांनी नोंद नाही किंवा फाईल नाही असा खुलासा केलेला नाही तर नोंदवही मध्ये सर्वच आलेल्या जमातीच्या उमेदवाराच्या अर्जदाराच्या क्रमाने नोंदी असतात. त्यामुळे सदरची माहिती ही अधिनियमाच्या कलम 21 प्रमाणे सद्हेतूने दिलेली दिसून येते. अधिनियमाच्या कलम 8 (त्र) पुन्हा तपासले असता 8 (त्र) ची माहिती प्रकट करणे ही व्यापक लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक अशी यथास्थिती व राज्य जन माहिती अधिका—याची किंवा अपील अधिका—याची खात्री पटली असेल, ती खेरीज करुन ती प्रकट करण्याचा कोणताही सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधाशी काहिही संबंध नाही किंवा जी व्यक्ती ज्या खाजगी बाबत विनाकारण हस्तक्षेप करेल अशी वैयक्तिक तपशिल संबंधित माहिती अशी आहे. या संदर्भामध्ये व्यापक लोकहित किंवा सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधाशी काय संबंध आहे याबाबत अपीलकर्ती यांना विचारले असता त्यांनी सुरुवातील त्यांच्या स्वतःचे मा. उच्च न्यायालयामध्ये रिट पिटिशन प्रलंबित आहे असे सांगितले व त्यानंतर समितीने जी

आतापर्यंत प्रमाणपत्र दिलेली आहेत ती खरोखरच निकषानुसार दिली आहे किंवा नाही व मा. उच्च न्यायालयामध्ये व मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये हजारोनी प्रकरण प्रलंबित आहे त्याबाबत त्यांना पी. आय. एल. दाखल करण्याच्या दृष्टीने माहितीची आवश्यकता वाटते व सार्वजनिक समितीने जरी (त्यांना त्याबाबत निश्चित माहित नाही) अवैध प्रमाणपत्रे दिले असले तरी तो सार्वजनिक निधीचा अपव्यय आहे व त्यामुळेच त्यांना असा अपव्यय मा. उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्याच्या दृष्टीने सार्वजनिक हितार्थ ही माहिती त्यांनी मागितलेली आहे असे त्यांचे म्हणणे आहे.

4. यावर प्रमाणपत्र तपासणी समितीची कार्यपध्दती काय आहे याबाबतची माहिती माहिती अधिकारी यांचेकडून समजून घेण्याचा प्रयत्न केला व त्यातून त्यांनी असे सांगितले की आलेला प्रत्येक अर्ज हा त्या त्या उमेदवाराच्या गुणवत्तेवर तपासली जाता त्याची सर्वांगीण निकषाप्रमाणे छाननी केली जाते व समिती (सदस्य 5) प्रमाणे त्याबाबतचा निर्णय देते. समितीने दिलेल्या निर्णयाच्या विरुध्द मा. उच्च न्यायालयामध्ये त्या त्या वैयक्तिक उमेदवारास रिट पिटीशन दाखल करता येतो व पुन्हा मा. उच्च न्यायालय त्या त्या वैयक्तिक प्रमाणपत्राच्या संदर्भात छाननी करुन निर्णय देत असते. एका उमेदवाराच्या प्रमाणपत्रासाठी लावलेले निकष दुस–या उमेदवारास लागू पडतीलच असे होत नाही. अशा प्रकारची जरी कार्यपध्दती असली तरी अपीलकर्ती हिस त्यांच्या स्वतःच्या प्रलंबित रिट पिटिशनच्या संदर्भात पुरावे देवूनच न्याय मागून घेता येईल. इतरांच्या प्रमाणपत्राच्या संदर्भामध्ये फारसा उपयोग होवू शकणार नाही अस धारणा व्यक्त करण्यास हरकत नाही. व त्यामुळे अपीलकर्ती यांनी मागितलेली माहिती ही सार्वजनिक हितार्थ आहे असे नसून त्यांच्या वैयक्तिक हितार्थ त्यांनी ही मागितलेली माहिती आहे असे दिसून येते. असे असले तरी एखाद्या व्यक्तीवर कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणातून अन्याय झाला असेल तर त्यांना त्या सार्वजनिक प्राधिकरणातून वैयक्तिक न्यायाचे निराकरण करणेसाठी माहिती उपलब्ध करुन घेता येते. परंतु त्याकरीता माहितीच्या अधिकाराच्या तरतुदींचा माहिती मागतांना निश्चित पण काटेकोर व

थोडक्यात असा उपयोग करुन घ्यावयास पाहिजे. परंतु माहिती अधिकारी यांनी सदरच्या अपीलाच्या संदर्भामध्ये आयोगाकडे खुलासा दाखल करतांना डॉ. देवराव विठोबा नंदनवार अपील क्र. 228/2007 यामध्ये दि. 18.7.2007 रोजी याच आयोगाने दिलेला निर्णय हा निदर्शनास आणला आहे. सदरच्या निर्णयाच्या मधील विवेचनावरुन असे दिसून येते की डॉ. देवराव विठोबा नंदनवार हे विद्यमान अपीलातील अपीलकर्ती यांचे पती आहेत व त्यांनीसुध्दा आतापर्यंत अनेक अर्ज या समित्यांकडे केलेले आहेत व असे एकुण दोघांनी मिळून 20 अर्ज तरी दाखल केलेले आहेत. असेही निर्णयात आलेले आहे त्यावेळेस सुध्दा समिती दरवर्षी किमान 6000 ते 7000 प्रमाणपत्र वैध ठरवीत असतात व अशा एकुण 6 वर्षाची माहिती द्यावयाची लागल्यास सार्वजनिक प्राधिकरणाची साधनसामुग्री या कामासाठी प्रमाणाबाहेर वळवावी लागली असती व त्यामुळे माहिती नाकारलेली आहे असे दिलेले होते. वर नमुद केल्या प्रमाणे अपीलकर्ती यांच्यावर समितीने अन्याय केलाच असेल तर तेवढीच माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे शक्य होते. परंतु तसे न करता वर नमुद केल्याप्रमाणे त्यांनी समितीकडे अनेक अर्ज केलेले दिसून येते. व त्यातून निश्चितच व्यापक जनहित किंवा सार्वजनिक कामाशी संबंधित माहिती मागितलेली आहे असा निष्कर्ष काढता येत नाही. निव्वळ त्यांना समितीने प्रमाणपत्र दिले नाही व त्यामुळेच त्यांनी व त्यांच्या पतीने असे अनेक अर्ज अनेक समित्यांकडे दाखल करुन माहिती मिळणेसाठी अर्ज केलेले दिसून येतात. अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे अर्जदारास माहिती विचारण्याचे कारण विचारता येत नाही हे जरी खरे असले तरी सुध्दा अधिनियमाच्या इतर कलमाच्या अनुषंगाने अर्जाची छाननी करणे आवश्यक ठरते व यावरुनच माहिती मागण्याच्या अर्जावरुन निश्चितच हेतू हा निदर्शनास येतो. व अशा प्रकारे या समितीकडे अनेक अर्ज करुन वेगवेगळया प्रकारे एकाच जमातीची माहिती मागणे यातून ते मा. उच्च न्यायालयात प्रकरण प्रलंबित असतांना समित्यांना त्रस्त करणे असाही हेतू असण्याचा निष्कर्ष काढण्यास हरकत नाही आणि अशा प्रकारे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चा उद्येशपण नाही. व त्याचा तसा

वापरपण करता कामा नये या करणाकरीता एवढे संपूर्ण विश्लेषण हे करण्यात आलेले आहे अन्यथा माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य किंवा अयोग्य एवढाच निर्णय देवून हे विवेचन संपवता आले असते.

5. वरील विवेचनाचा विचार करता माहिती अधिकारी यांनी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय हा योग्य असून अपीलकर्ती यांचे अपील हे फेटाळण्यात येत आहे. कारण माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय हा दुष्ट हेतूने दिलेला आहे असे दिसून येत नाही. त्यांनी अधिनियमाच्या तरतुदींचे अर्थउकल करुनच निर्णय देण्याचा प्रयत्न केलेला आहे. व त्यामुळेच तो योग्य किंवा अयोग्य हा कलम 20 प्रमाणे खात्री करुन घेणे आयोगाचे कर्तव्य ठरते व त्याप्रमाणे वरील विवेचन केले आहे. अपीलकर्ती हिने द्वितीय अपील हे अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे केलेले आहे. परंतु अपील मेमोचे शेवटी प्रतीलिपी मा. पद्मश्री अन्नासाहेब हजारे, अध्यक्ष, भ्रष्टाचार समिती निर्मूलन नागपूर महाराष्ट्र यांचेकडे पाठविलेले दिसते यावरुन अपीलकर्ती हिस अधिनियमाचे तरतुदींचे स्वतःचे सोयीनुसार अर्थ लावण्याचे ज्ञान किंवा अज्ञान तरी दिसून येते किंवा आयोगावरसुध्दा एकप्रकारे दबाव आणण्याचा अपीलकर्ती हिचा उद्येश त्यातून दिसून येतो.

## आ दे श

1) अपीलकर्ती यांनी दि. 22.6.2006 रोजी केलेल्या माहितीच्या अर्जाच्या संदर्भात माहिती अधिकारी यांनी दिलेला दिनांक 10.7.2006 चे उत्तर व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. 19.8.2006 रोजी दिलेला निर्णय हा योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे फेटाळण्यात येत आहे.

2) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 6.10.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 483/2007.**

1) कु. ज्याती साहेबराव अढाऊ
द्वारा अनंत प्रल्हादराव कडू,
मु.पो.शिरजगाव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) श्री सुनिल वामनराव वारे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
अमरावती, लक्ष्मीनारायण संस्थान बिल्डींग,
मोर्शी रोड अमरावती ता.जि.अमरावती

2) कु. अरुणा रामकृष्ण गुरवे
जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापिका,
पुण्यश्लोक वीर अहिल्यादेवी (वि.जा.भ.ज.)
प्राथमिक आश्रमशाळा बोराळा, ता.चांदूर बाजार जि.अमरावती..... **उत्तरवादी**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ती यांनी दिनांक 11/5/2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ती हिने दिनांक 11.2.2006 रोजी माहिती अधिकारी यांचेकडे 1) शिक्षक हजेरीपटाच्या छायांकित सत्यप्रती माहे जुलै 2000 पासून माहे जानेवारी 2006 पर्यंत 2) शिक्षकांची प्रपत्र अ प्रमाणे माहिती माहे आक्टोबर 1996 पासून माहे जानेवारी 2006 पर्यंतचा 3) वर्गवार जातिनिहय पटसंख्या (30 सप्टेंबरची) 5 वर्षाची सन 2001, 2002, 2003, 2004, 2005 चा वर्षाच्या (30 सप्टेंबरच्या स्थितीवर) 4) शाळेतील निवासी व अनिवासी विद्यार्थ्यांची नावासह यादी. सत्र 2002–2003, सत्र 2003–2004, सत्र 2004–2005, सत्र 2005–2006, 4 वर्षाची. 5) कु. ज्याती अढाऊ यांचा संस्थेनी पाठविलेला नेमणुकीस मान्यतेचा प्रस्ताव सत्यप्रत. माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या संदर्भात दि. 13.3.2006 रोजी माहिती अधिकारी यांनी उत्तर दिलेले दिसून येते. सदरच्या उत्तराच्याबाबत अपीलकर्ती हिने दि. 8.3.2006 रोजी स्मरणपत्र पाठविलेले दिसून येते. त्यानंतर सदरच्या निर्णयाने व्यथित होवून दिनांक 18.3.2006 रोजी प्रथम अपील प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलीच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची कारवाई झालेली आढळून न आल्यामुळे अपीलकर्ती हिने दि. 19.4.2006 रोजी अपीलीय अधिकारी यांना स्मरणपत्र पाठविलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी दि. 18.4.2006 रोजी ठेवण्यात आली होती. त्याप्रमाणे दि. 24.4.2006 रोजी माहिती अधिकारी हया कार्यालयात उपस्थित झाल्यात व दि. 27.4.2006 ला पुन्हा सुनावणीस मागणी केलेल्या संपूर्ण माहितीसह उपस्थित राहण्याच्या सुचना देण्यात आल्या होत्या. सदरची सुनावणीमध्ये अर्जदारानी मागणी केलेली माहिती 10 मे 2006 पर्यंत मागणी केलेल्या मुदतीप्रमाणे अपीलार्थीस माहिती देण्याचे आदेश करण्यात आला व पुढील सुनावणी 15 मे 2006 रोजी ठेवण्यात आली. पुन्हा दि. 9.5.2006 रोजी माहिती अधिका–याने पत्र श्री गोबरखेडे यांचे निधनामुळे माहिती सुनावणीच्या वेळेस देता येणार नाही असे कळविले. परंतु माहिती देण्यात यावे याकरीता दि. 18.5.2006 ला कळविण्यात आले. दरम्यान प्रथम अपीलाच्या सुनावणीमधून माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 11.5.2006 रोजी अपीलकर्ती हिने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ती हिने दि. 14.2.2006 चे जन माहिती अधिका–यास मागणी केलेल्या अर्जदाराचे संदर्भात माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ती हिने कोरे कागदपत्र पाठविले असे दि. 13.3.2006 च्या पत्राने अपीलकर्ती हिस कळविले होते. त्याकरीता अपीलकर्ती हिने सदरच्या पाकीटात कोरे कागदपत्र मिळाले याकरीता श्री राजेश गावणेर (अधिक्षक) या दोघांच्या साक्षीने पाकिट उघडले होते अशा त्यांच्या सहया घेतलेला पंचनामा पुरावा म्हणून दाखल केला. परंतु अपीलकर्ती हिने राजेश सुभाषराव गावणेर यांनी दिनांक 6.10.2007 रोजी अपीलकर्ती हयांच्या संदर्भात संस्थेनी जे आतापर्यंत वर्तन केलेले आहे त्याबद्यल व दि. 14.2.2006 रोजीचा माहिती मागणेचा अर्ज व त्यानंतर 15 दिवसानी यु. पी. सी.नी आलेले स्मरणपत्र मुख्याध्यापिकेने स्वतः सोडवले होते त्यांनी मात्र सदर पाकिटात कोरे कागद असल्याचे मुख्याध्यापिकेने खोटे कळविले असे रु. 50 च्या स्टम्प पेपरवर ॲफिडव्हीट दाखल केले आहे. यावरुन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांनी अपीलकर्ती हिच्या अर्जाच्या संदर्भात माहिती देण्याच्या दृष्टीने टाळाटाळ केलेली आहे असा निष्कर्ष काढण्यास हरकत नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेतल्यानंतर सुध्दा या ना त्या कारणाने माहिती उपलब्ध करुन देण्याचे माहिती अधिकारी यांनी टाळाटाळ केल्याचे दिसून येते. दि. 23.5.2006 च्या पत्रा नुसार पुन्हा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मधील नियम 7 (5) प्रमाणे अर्जदारानी मागणी केलेली माहिती सेवा अभिलेखाच्या संदर्भात असल्याने पुरवता येणार नाही असे कळविले व 24.5.2006 चे तारखेवर उपस्थित झाले नाही. पुढील सुनावणी दिनांक 31.5.2006 रोजी ठेवण्यात आली होती. अपरिहार्य कारणामुळे दि. 7.6.2006 रोजी सुनावणीची तारीख निश्चित करण्यात आली. परंतु तारखेवर माहिती अधिका–याचे नियम 7 व त्यातील उपनियम तपासण्यात आले. या नियमात 7 (ड) (च) अंतर्भूत असल्याने मागणीदारास विनाविलंब माहिती देण्याचे माहिती अधिका–यास सुचीत करण्यात आले. त्यानंतर दि. 9.6.2006 रोजी मुख्याध्यापिकेने माहिती अधिका–याना माहिती अपीलीय कार्यालयात आणून दिली. सदरची माहिती घेवून जाण्याबाबत अपीलार्थीना 13.6.2006 रोजी पोष्टाचा दाखला देवून पत्र देण्यात आले. त्यानंतर दि. 20.6.2006 रोजी अर्जदाराने

माहिती नेलेली आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनीसुध्दा अपीलार्थीच्या अर्जाप्रमाणे संपूर्ण माहिती देण्याचे माहिती अधिका—यास सुचना देवूनही वारंवार माहिती अधिका—यास ताकीद देवूनही माहिती उपलब्ध करुन देण्यास मुद्याम विलंब करुन वेळखाऊ धोरण अवलंबून माहिती देण्यास कसूर केलेली आहे असा निष्कर्ष काढून खुलासा दाखल केलेला आहे. पुन्हा खुलासा करतांना कर्मचा—याची नियुक्ती प्रक्रिया ही संस्थेच्या धोरणावर राबवली जाते त्यामुळे त्या संबंधिची कागदपत्रे संस्था प्रमुखाच्या कार्यालयात असतात. कर्मचा—याचे नियुक्ती आदेश, त्यासंबंधाने घेतलेले ठराव त्यांचे राजीनामे किंवा सेवा विषयक, शिस्तभंग विषयक कागदपत्रे संस्था आपले कार्यालयात ठेवतात. शाळेसंबंधीचा लेखा परिक्षण झालेला अभिलेख, जेस लेजर, कॅशबुक व्हाउचर व अन्य महत्वाचे दस्तऐवज ते सुध्दा संस्थेकडे ठेवले जातात. व त्यामुळे अपीलीय अधिकारी म्हणून अशी प्रकरणे प्रविष्ठ झाल्याप्रकरणी संबंधित अपीलार्थीस संबंधित माहिती अधिका—याकडून म्हणजे मुख्याध्यापकाकडून प्राप्त करुन देणे अपीलीय अधिका—यास अडचणीचे आणते. माहिती अधिकारी म्हणून संबंधित मुख्याध्यापकाना अडचण निर्माण होते कारण ते संस्था चालकाच्या अधिनस्त येतात व बहुधा संस्था चालकाच्या निर्देशा प्रमाणे त्यांना काम करावे लागते व अशा प्रकारच्या माहितीची मागणी झाल्यास संबंधित मुख्याध्यापकांची सुध्दा कांडी होते ही वास्तविकता आहे आणि ती विद्यमान आयोगाने विचारात घ्यावी अशी विनंती आहे.

4. अपीलकर्ती हयांना दि. 20.6.2006 रोजी ती माहिती उपलब्ध झालेली आहे ती माहिती त्यांच्या म्हणण्यानुसार अपूर्ण व दिशाभूल करणारी आहे. मात्र त्याबाबत निश्चित असा खुलासा केलेला नाही. तरी सुध्दा एकुण संपूर्ण प्रकरणाच्या संदर्भात असे दिसून येते की माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली दिसून येत आहे व त्यामुळे त्या माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 प्रमाणे शास्तीस पात्र दिसून येतात. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्या खुलाशात म्हटल्याप्रमाणे व एकुणच अपीलकर्ती यांच्या प्रकरणामध्ये ज्या प्रकारे मुख्याध्यापिका यांचे वर्तन दिसून येते ते सुध्दा संचालकाच्या संमतीशिवाय असणे शक्य

नाही व असे असले तरी मुख्याध्यापिका यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली असल्यामुळे रु. 5000/– ही शास्ती लादणे संयुक्तिक राहिल. त्याच बरोबर प्रथम अपीलीय अधिकारी यांनीसुध्दा संस्थेच्या अशा प्रकारच्या एकुणच कामकाजाबाबत चौकशी करुन संस्थेचे वेतनोत्तर अनुदान बंद करण्याच्या संदर्भामध्ये निर्णय घेणे आवश्यक राहिल जेणेकरुन संस्था चालक हे मुख्याध्यापकाच्या माध्यमातून इतर कर्मचा–यांना अशा प्रकारे वेठीस धरु शकरणार नाहीत. अपीलकर्ती हिने विभागीय समाज कल्याण अधिकारी यांचेकडे त्यांच्या सेवेच्या संदर्भात अपील दाखल केले होते परंतु माहिती विहित मुदतीत उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांचे सदरचे अपील हे फेटाळले गेले होते त्यानंतर मा. उच्च न्यायालयामध्ये त्यांनी अपील दाखल केले होते पुन्हा माहिती मुदतीत मिळाली नाही म्हणून परत घेतले व पुन्हा त्यांनी नवीन अपील मा. उच्च न्यायालयामध्ये दाखल केलेले आहे. यावरुन अपीलकर्ती हिस विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे सदरची माहिती ते विभागीय समाज कल्याण अधिकारी यांचेकडे अपीलाच्या सुनावणी दाखल करु शकले नाही. तसेच मा. उच्च न्यायालयामध्ये सुध्दा कागदपत्राच्या अभावी दाखल केलेले अपील त्यांना परत घ्यावे लागले मात्र माहिती उपलब्ध झाल्यानंतर त्यांनी पुन्हा अपील दाखल केले. तरी सुध्दा दिलेली माहिती अपूर्ण व खोटी असल्यामुळे व त्याकरीता माहिती अधिकारी यांनी पत्र दिलेले असून सुध्दा त्या पत्राची सुध्दा त्यांनी दखल घेतली नाही व त्याकरीता अधिनियमाच्या कलम 19 (8) (ख) प्रमाणे त्यांची हानी झाल्याबद्यल अपीलकर्ती हिने जी मागणी केली आहे ती मागणी ही संयुक्तिक वाटते व त्यामुळे त्यांच्या झालेल्या नुकसानीबद्यल त्यांना सार्वजनिक प्राधिकरण म्हणजे पुण्यश्लोक वीर अहिल्यादेवी (वि.जा. भ.ज.) प्राथमिक आश्रमशाळा बोराळा यांचे संचालकांनी रु. 5000/– नुकसानभरपाई अपीलकर्ती हिस देणे हे न्यायोचित राहिल.

## आ दे श

1) अपीलकर्ती हिचे अपील हे मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 5 दिवसाचे आंत अपीलकर्ती हिस त्यांनी दि. 11.2.2006 (14.2.2006) च्या अर्जाप्रमाणे मागितलेली खरी माहिती उपलब्ध करुन द्यावी.

2) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांनी निरनिराळया सबबी दाखवून माहिती देण्याची जी टाळाटाळ केलेली आहे त्या करीता त्यांना रु. 5000 ही शास्ती कलम 20 (1) प्रमाणे लादण्यात येत आहे.

3) अपीलकर्ती हिस विहित मुदतीत मागितलेली खरी माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे त्यांचे जे मा. उच्च न्यायालयात आर्जाचे संदर्भात नुकसान झालेले आहे त्या नुकसानीच्या संदर्भात आश्रम शाळा संस्थेच्या संचालकानी रु. 5000 नुकसानभरपाई माहिती अधिका—यास निर्णय मिळाल्याच्या 5 दिवसाच्या आंत देण्यात यावी व तशी त्यांचेकडून पोच घेण्यात यावी.

4) विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी सदरच्या संस्थेच्या कारभाराच्या संदर्भात पुन्हा एकवार चौकशी करुन वेतनोत्तर अनुदान बंद करणे आवश्यक आहे अशा निर्णयास आल्यास तशा प्रकारचा प्रस्ताव शासनाकडे पाठवावा.

5) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 8.10.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 486/2007.**

1) श्री राजेंद्र श्रीधरराव मोहोड
रा. करजगाव ता. चांदुर बाजार
जि. अमरावती ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) श्री एस. के. कुळकर्णी
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संवर्ग विकास अधिकारी,
पंचायत समिती चांदुर बाजार (उच्च श्रेणी)
ता. चांदुर बाजार जि.अमरावती

2) श्री बी. एस. गि–हे
जन माहिती अधिकारी तथा
ग्राम विकास अधिकारी
ग्रामपंचायत कार्यालय करजगाव
ता.चांदूर बाजार जि.अमरावती ..... **उत्तरवादी**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक 8/9/2005 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 8.9.2005 रोजी महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम 2002 अन्वये माहिती मिळण्यासाठी अर्ज केला होता. सदरच्या अर्जाच्या संदर्भात दिनांक 17.9.2005 रोजी त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आली होती परंतु अर्जात मागितलेल्या प्रमाणे फेरफार रजिस्टरची नकल मात्र उपलब्ध करुन दिली नव्हती. सदरच्या निर्णयाने व्यथित होवून दि. 29.10.2005 रोजी प्रथम अपील दाखल केले होते. परंतु तांत्रिक कारणामुळे सदरचा अपील अर्ज हा 8.3.2006 रोजी विचारात घेण्यात आलेला दिसतो. प्रथम अपीलाच्या नंतर सचिवानी माहिती उपलब्ध करुन देण्याचे पत्र दिले होते. सदरच्या निर्णयातून सुध्दा अपीलकर्ता यांना फेरफार रजिस्टरची नक्कल न मिळाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केली.

3. अपीलकर्ता यांचा अर्ज हा दि. 8.9.2005 रोजीचा असल्यामुळे महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम 2002 च्या अन्वये आहे. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 हा केंद्रिय अधिनियम असून 12.10.2005 रोजी मिळालेला आहे व 11.10.2005 रोजी महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम 2002 हा निरसित करण्यात येवून निरसित अधिनियमाच्या कलम 2 प्रमाणे महाराष्ट्राच्या अधिनियमाखाली प्रलंबित अर्ज व अपीले पूर्वीप्रमाणेच मा. लोक आयुक्त यांचेकडे दाखल करुन निरसित कायद्याच्या तरतुदीप्रमाणेच त्याचा निर्णय केला पाहिजे अशी तरतुद करण्यात आली आहे. परंतु सदरची बाब तांत्रिक असल्यामुळे व सर्वसामान्य नागरीकांना ती कळण्यासारखी नसल्यामुळे राज्य माहिती आयोग अस्तित्वात आल्यानंतर राज्य माहिती आयोगाकडे अपीले दाखल करण्यात आलेली आहे. परंतु राज्य माहिती आयोगास महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम 2002 च्या अंतर्गत असल्यामुळे अर्ज व अपीले याबाबतचा अधिकार नाही व त्यामुळे राज्य माहिती आयोग हा सदरच्या अर्जाचे कामकाज चालविता येत नाही. असे असले तरी अपीलाच्या सुनावणीस फारच विलंब झालेला असल्यामुळे आता पुन्हा अपीलकर्त्यास मा. लोक आयुक्त यांचेकडे अपील दाखल करा असे सांगणे सुध्दा योग्य नाही.

4. अपीलकर्त्याचा माहितीच्या अर्जाप्रमाणे छाननी केली त्या छाननीमध्ये मागितलेल्या माहितीपैकी फेरफार रजिस्टरची नक्कल ही उपलब्ध करुन दिलेली नव्हती. फेरफार रजिस्टरचे अवलोकन केले असता संबंधित प्रकरणातील नोंद घेतलेली दिसून येते. नंतर ती नोंद रद्य करण्यात आली असाही शेरा त्यात दिसून येतो. त्यामुळे ते नियमित किंवा अनियमित आहे या तांत्रिक बाबीत न जाता जी काही नोंद ज्या पध्दतीने घेण्यात आलेली आहे त्याबाबतचे झेराक्स प्रत अपीलकर्ता यास उपलब्ध करुन दिल्यास अपीलकर्त्याच्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिल्यासारखी होईल.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम 2002 च्या तदतुदीप्रमाणे केलेल्या दिनांक 8.9.200 च्या अर्जाच्या विरुध्द असल्यामुळे सदरचे अपील दाखल करुन घेणेचा सुध्दा अधिकार नसल्यामुळे अपील निकाली काढण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 8.10.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 491/2007.**

1) श्री विठ्ठलदास बुलीदानजी बाहेती
रा. नेहरु मैदान, धामनगाव रेल्वे ता. धामनगाव रेल्वे
जि. अमरावती ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) श्री गजानन वासुदेवराव सुरंजे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी चांदुर रेल्वे
ता. चांदुर रेल्वे जि.अमरावती

2) जन माहिती अधिकारी तथा
तहसिलदार
तहसिल कार्यालय धामनगाव रेल्वे
ता. धामनगाव रेल्वे जि.अमरावती ..... **उत्तरवादी**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक 30/3/2006 रोजी महाराष्ट्र माहितीचा अधिकार अध्यादेश 2005 च्या कलम 19 (3) अन्वये अपील सुचना व माहितीचा अधिकार 2005 महाराष्ट्र नियम 5 (2) अशा रितीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 4.10.2005 रोजी महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम 2002 अन्वये अर्जाचा नमुना जोडपत्र अ प्रमाणे 4 मुद्यांमध्ये माहिती मिळण्यासाठी अर्ज केला होता. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक 18.10.2005 रोजी तहसिलदार धामणगाव रेल्वे यांनी अपीलकर्ता यांना उत्तर दिलेले आहे. सदरच्या अर्जाच्या उत्तराच्या संदर्भात अपीलकर्ता यांनी प्रथम अपील हे दि. 5.12.2005 रोजी उपविभागीय अधिकारी तहसिल कार्यालय यांच्याकडे दाखल केलेले दिसून येते व त्या अपीलाच्या संदर्भात त्यांना दिनांक 21.12.2005 ला उत्तर देण्यात आलेले आहे. सदरच्या निर्णयाच्या विरुध्द द्वितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे करण्यात आले आहे.

3. महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम 2002 हा दिनांक 11.10.2005 रोजी महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम (निरसित 2005) प्रमाणे निरसित करण्यात आला. (महा. 2006 चा 1) सदरच्या निरसित अधिनियमाच्या कलम 2 प्रमाणे त्या अधिनियमाखाली प्रलंबित असलेले अर्ज व त्यावरील अपीले ही निरसित अधिनियमाच्या तरतुदींप्रमाणेच मा. लोक आयुक्त यांचेकडे दाखल करावयास पाहिजे होती. व त्याप्रमाणेच लोक आयुक्त यांनी निर्णय द्यावयास पाहिजे होते. परंतु सदरची तांत्रिक बाब ही सर्वसामान्य नागरिकांना अवगत असणे शक्य नसल्यामुळे त्या अधिनियमाखाली दाखल झालेल्या अर्जाच्या निर्णया विरुध्दची अपीले ही राज्य माहिती आयोगाकडे दाखल करण्यात आलेली आहे. परंतु राज्य माहिती आयोग हा केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम 2005 तरतुदींच्या अन्वये दि. 12.10.2005 रोजी मिळालेला असल्यामुळे व केंद्रिय अधिनियमामध्ये महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम 2002 च्या अन्वये दाखल केलेले अपील व अर्जाच्या संदर्भात कोणतीही तरतुद केलेली नसल्यामुळे सदरचे अर्ज व अपीलांबाबत राज्य माहिती आयोगास निर्णय देण्याचा अधिकार नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे. असे असले तरी महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम 2002 व माहितीचा अधिकार अधिनियम 2005 या दोनही अधिनियमाचा उद्येश हा माहिती उपलब्ध करुन देणे असल्यामुळे अपीलकर्ता यांना त्यांनी

केलेल्या अर्जानुसार माहिती उपलब्ध झाली किंवा नाही याबाबत माहिती घेण्याचा प्रयत्न केला. अपीलकर्ता यांना काही मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे परंतु एक मुद्या क्र. 4 वर माहिती उपलब्ध झालेली नाही. व तसे त्यांनी दि. 16.12.2006 च्या अर्जावर लिहुन सुध्दा दिलेले आहे. त्यामुळे लोकशाही दिनामाध्ये दिलेले अर्जानुसार निर्णय उपलब्ध करुन देण्याची प्रथा आहे किंवा नाही हा मुद्या अनुत्तरीत जरी असला तरी त्या मुद्याच्या संदर्भामध्ये विद्यमान माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांना विचारले असता तशी प्रथा नाही असे त्यांनी सांगितले व त्यामुळे तांत्रिक बाब एकच शिल्लक राहिली की त्याबाबत अपीलकर्ता यास माहितीच्या अधिकाराच्या अर्जात कळविले नाही त्याबाबत आज आयोग कोणत्याही प्रकारचा निर्णय देवू शकत नाही

.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेले द्वितीय अपील हे महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम 2002 च्या तदतुदीप्रमाणे केलेल्या दिनांक 4.10. 2005 च्या अर्जाच्या निर्णयाच्या संदर्भात असल्यामुळे राज्य माहिती आयोग त्याबाबत कोणत्याही प्रकारचा निर्णय देवू शकत नाही व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 9.10.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 492/2007, 617/2007, 618/2007.**

1) श्री मो. अब्दुल सलीम अब्दुल कदीर
न. प. उर्दु प्रयमरी शाळेजवळ, हिरापूर
मु. पो. अचलपूर सिटी जि. अमरावती ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद अमरावती जि. अमरावती

2) रहिमा बानू अब्दुल अजीज
जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापिका,
अलखैर उर्दु हायस्कुल, तळेगाव मोहना,
ता. चांदुर बाजार जि. अमरावती ..... **उत्तरवादी**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक 23/3/2006, दि. 18.8.2006 व 10.1.2006 रोजी अनुक्रमे अपील क्र. 492/2007, 617/2007, 618/2007 माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 5.12.2006 रोजी माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांचेकडे 4 मुद्यांवर माहिती मिळण्याकरीता रजिष्टर पोष्टाने अर्ज केलेला होता. परंतु सदरचा रजिस्टर पोष्टाचे पत्र हे माहिती अधिकारी यांचेकडे न स्विकारता अपीलकर्ता यास परत आलेले आहे व त्याबाबतचा पुरावा त्यांनी दाखल केलेला आहे. सदरचे पत्र दिनांक 8.12.2005 ते 13.12.2005 ऐवढे दिवस ठेवलेले असून सदर इसमाची भेट नाही करीता रजिस्टर पोष्टात ठेवण्याची मुदत संपली सेंडरला रवाना असा 14.12.2005 रोजी शेरा दिलेला दिसून येतो. त्याबाबत माहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की त्या कालावधीत त्या रजेवर होत्या. त्यानंतर अपीलकर्ता यांनी दि. 26.12.2005 रोजी अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद अमरावती यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. पुन्हा दि. 16.1.2006 रोजी माहितीचा अर्ज माहिती अधिकारी म्हणून शिक्षणाधिकारी (माध्यमिक) विभाग यांचेकडे केलेला दिसून येतो. सदरच्या नस्तीमध्ये पुन्हा 10.5.2006 रोजी मुख्य माहिती आयुक्त यांचेकडे अपील केलेले दिसून येते. प्रथम अपीलाची सुनावणीला 13.2.2006 ला हजर राहण्याकरीता दि. 27.1.2006 च्या पत्रानुसार कळविण्यात आले होते. सुनावणी दरम्यान अर्जदाराने मागितलेल्या माहिती विषयी मुख्याध्यापिकेने दि. 24.2.2006 ला माहिती देण्याचे आदेश देण्यात आले व 24.2.2006 ला कार्यालयात जमा करण्यात आले. सुनावणी दरम्यान अर्जदारास माहिती घेवून जाण्यास कळविण्यात आले होते. अर्जदार न आल्यामुळे कार्यालयाने दि. 16.1.2006 ला दस्तऐवज रक्कम अर्जदाराने रु. 157/— भरणा करुन अर्जदारास माहिती देण्यात आली. संपूर्ण माहिती मिळाल्याबाबतची दप्तरी नोंद घेण्यात आली असा खुलासा दिला आहे. सदरची माहिती दि. 16.3.2006 ला प्राप्त झालेली आहे असे अपीलकर्ता यांनी मान्य केले आहे. परंतु सदरची माहिती अपूर्ण असल्यामुळे त्यांनी द्वितीय अपील मेमोमध्ये तसे नमुद केलेले आहे. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे व पुन्हा त्यांना माहिती जी मिळाली नाही ती माहिती उपलब्ध करुन देण्यास तयार आहे असे माहिती अधिकारी यांनी सांगितले. माहिती

अधिकारी यांनी अपीलकर्ता यांचा मुळ अर्ज रजिस्टर पोष्टाने स्तिकारला नव्हता त्याबद्यलचा खुलासा माहिती अधिकारी यांनी जरी केलेला असला तरी अपीलकर्ता यास माहिती ही विलंबाने मिळालेली आहे व त्याकरीता अपीलकर्ता यांनी माहितीच्या खर्चाकरीता जे रु. 157/– भरलेले आहे ते प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडे भरणा केलेला आहे. सदरचे खर्चाची रक्कम ही त्यांना माहिती विलंबाने उपलब्ध झालेली असल्यामुळे परत करणे संयुक्तिक राहिल.

## <u>आ दे श</u>

1) अपीलकर्ता यांची अपीले ही मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी त्यांच्या दि. 5.12.2006 च्या अर्जामध्ये मागितलेली माहिती व न मिळालेली माहिती जी त्यांनी द्वितीय अपील मेमोमध्ये नमुद केले आहे ती त्यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत रजिस्टर पोष्टानी विनामुल्य माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे व त्या माहिती करीता अपीलकर्ता यांनी रु. 157 चा भरणा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचे कार्यालयात केलेला आहे ते रु. 157 हे अपीलकर्ता यास निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत परत करावे.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 9.10.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 494/2007.**

1) श्री विठ्ठलदास बुलीदानजी बाहेती
रा. नेहरु मैदान, धामनगाव रेल्वे ता. धामनगाव रेल्वे
जि. अमरावती ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
आयुक्त, अमरावती विभाग,
विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती

2) श्री एच. डी. टाकरखेडे,
जन माहिती अधिकारी तथा
मुख्याधिकारी, नगर परिषद, धामनगाव रेल्वे
ता. धामनगाव रेल्वे जि. अमरावती ..... **उत्तरवादी**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक 2/6/2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 25.11.2005 रोजी 3 मुद्यांवर माहिती मागितली होती. 1) स्वास्थ वि. मे 28.1.2004 से आजतक निवेदन दिये व फाईल देखना है 2) 16.3. 2004 और दो बार मुख्याधिकारी चिंचोळकर के साथ सा.भा.वि. मुलकलवार टॅकर भरने वास्ते जगह है क्या दिखाने आये थे उसकी माहिती 3) दुसरे लोगोके टॅकर साफ करने वास्ते कितने मजदूर भेजे थे संडास टॅक साफ करनेबाबत 28.1.2004 से 15.11.2005 तक पत्र क्र. धानपा/साबावी/148/2005 दि. 29.6.2006 के मुताबीक मै सही माहिती मांग रहा हॅ. माहिती व्यक्तिशः घेणार नमुद केले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 2.12.2005 रोजी नियमानुसार आवश्यक रक्कम भरुन फाईल संबंधी छायांकित प्रती प्राप्त करुन घ्याव्यात तसेच कार्यालयाच्या पूर्वीच्या 5 प्रती प्रमाणे माहिती पुरविली आहे असे कळविलेले दिसते. सदरच्या उत्तराने व्यथित होवून अपीलकर्ता यांनी दि. 9.12. 2005 रोजी प्रादेशिक संचालक नगर परिषद तथा आयुक्त, आयुक्त कार्यालय अमरावती यांचे कडे प्रथम अपील दाखल केले होते. दि. 22.12.2005 रोजी दि. 28.1.2004 ते आजपावेतो दिलेले निवेदन फाईल आज दि. 22.12.2005 रोजी दु. 1.00 वा. आपणास स्वास्थ विभागात दाखविण्यात आली व आपल्या मागणीनुसार आपणास एकुण 157 छायांकित प्रती देण्यात आल्या. तसेच योग्य शुल्क पा.क. 2645 दि. 22.12.2005 रोजी एकुण 124 रु. न. प. फंडात आपण भरले आहे त्याची रितसर पावती आपणास मिळाली. दि. 16.4.2004 रोजी मुख्याधिकारी श्री चिंचाळकर व श्री मुलकलवार कनिष्ठ अभियंता सर्व्हिस लाईन मधील रस्ता पाहण्याकरीता आले होते. दुस–या लोकांचे टाके साफ करण्याकरीता 3 मजुर पाठविण्यात आले होते. दि. 28.1.2004 ते 15.1.2005 पर्यंत पत्र क्र. धानपा/साबावी/148/2005 दि. 29.6.2006 पर्यंत आपणास संपूर्ण फाईल आज दि. 22.12.2005 ला दाखवून खरी माहिती दाखविण्यात आली आहे असे दिसून येते. सदरच्या पत्रावर माहिती मिळाली याबाबतची पोचसुध्दा दिसून येते. असे असले तरी अपीलकर्ता यांनी द्वितीय अपीलामध्ये टॅकर भरण्यास जागा आहे किंवा नाही अशी माहिती मागितली होती. त्यांनी फक्त आले होते असा उल्लेख केला आहे. संपूर्ण माहिती

देण्याकरीता स्व. वि. खडेझाडे यांना विनंती करुनसुध्दा माहिती दिली नाही. याआधीसुध्दा 5.10.2005 ला माहिती मागितली होती तेव्हा सुध्दा त्यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली आहे. 5.10.2005 च्या प्रश्नाबाबत योग्य ती कारवाई करण्यात यावी अशी विनंती केलेली आहे.

3. अपीलकर्त्याच्या माहितीच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 2.12.2005 रोजी त्यांना पत्र पाठविलेले दिसून येते. व त्यात अपीलकर्ता यांना पूर्वी सर्व माहिती पुरविली आहे त्याबद्यलचा उल्लेख दिसून येतो. त्यानंतर नियमानुसार आवश्यक रक्कम भरुन फाईल संबंधी छायांकीत प्रती प्राप्त करुन घ्याव्या हेही नमुद केले आहे. वास्तविक अपीलकर्ता यांनी पूर्वी कितीही अर्ज केलेले असले व त्यांना माहिती पुरविलेली असली तरी सुध्दा माहितीचा अधिकार अधिनियमाप्रमाणे जो अर्ज केलेला असतो व त्यात जी माहिती मागितलेली असते ती माहिती ही विहीत मुदतीत पुरवणे आवश्यक असते. पूर्वी माहिती पुरविलेली आहे म्हणून आता देता येत नाही असे म्हणता येत नाही व त्यामुळेच अपीलकर्ता यांना त्या निर्णयाच्या विरुध्द प्रथम अपील करावे लागले असे दिसते. असे असले तरी प्रथम अपील करण्याकरीता माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी यांनी दिनांक 21.12.2005 ला प्रादेशिक संचालक तथा आयुक्त, अमरावती यांना त्यांच्या 16 डिसेंबर 2005 च्या पत्राप्रमाणे माहिती अधिका–यान्वये माहिती बाबत अवधी संपायच्या आधीच दि. 22.12.2005 रोजी दु. 1.00 वा. श्री बाहेती यांना फाईल दाखविण्यात येईल व आवश्यक सर्व कागदपत्रे देण्यात येतील याची सुचना आज दि. 22.12.2005 रोजी वर नमुद केल्याप्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली आहे. जी माहिती दि. 22.12.2005 रोजी उपलब्ध करुन दिली त्याच प्रकारे 2.12.2005 रोजी उपलब्ध करुन दिली असती तर अपीलकर्ता यास अपील करण्याची आवश्यकता वाटली नसती. असे असले तरी अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील मेमोमध्ये जी माहिती मिळाली नाही असे म्हटले आहे ती त्यांच्या विनंती मध्ये माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 2 (च) व (त्र) मध्ये ''माहिती'' व ''माहितीचा अधिकार'' या संज्ञांच्या व्याख्येत येते किंवा

नाही हे तपासून पाहणे आवश्यक ठरते. ''माहिती'' या संज्ञेच्या व्याख्येत कोणत्याही स्वरुपातील साहित्य असा असून त्यामध्ये अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ईमेल, अभिप्राय, सुचना, प्रसिध्दीपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवहया, संविधा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही ईलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामुग्री यांचा समावेश होतो. तसेच ''माहितीचा अधिकार'' याचा अर्थ कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली किंवा त्याच्या नियंत्रणात असलेली व आधी नियमान्वये मिळवता येण्याजोगी माहिती मिळवण्याचा अधिकार असा आहे व त्यात (एक) एखादे काम, दस्तऐवज, अभिलेख (दोन) दस्तऐवजाच्या किंवा अभिलेख्याच्या टिपण्या किंवा उतारे किंवा प्रमाणीत प्रती घेणे (तिन) सामुग्रीचे प्रमाणित नमुने घेणे (चार) डिस्केटस्, फ्लॉपी, टेप, व्हिडीओ कॅसेटस् इत्यादी ईलेक्ट्रॉनिक प्रकारातील माहिती त्याबाबत मुद्रीत प्रती मार्फत माहिती मिळविणे याबाबतच्या अधिकाराचा समावेश होतो. यावरुन अपीलकर्ता यांनी मुद्या क्र. 2 मध्ये जी माहिती विचारली आहे ती माहिती ही माहितीच्या अधिकाराच्या व्याख्येत येत नाही व त्यामुळे सदरचे रस्ता पाहण्याकरीता आलेले होते हे ते उत्तर दिलेले आहे ते योग्य दिसून येते. सदरची माहिती ही 16.6.2004 रोजीची असल्यामुळे त्यावेळेस मुख्याधिकारी श्री चिंचोळकर व श्री मुलकलवार कनिष्ठ अभियंता यांनी पाहणी करुन काय निष्कर्ष काढला तो अभिलेख्यामध्ये असता तर तो पुरवणे आवश्यक होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनीच आता दाखवले की त्यांना उपलब्ध झालेल्या छायांकित प्रतीमध्ये प्रत्यक्ष पाहणीच्या संदर्भात तात्कालीन मुख्याधिकारी व कनिष्ठ अभियंता निरीक्षण नमुद करुन ठेवले आहे. याच्या विरुध्द अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती ही त्यांनी मागितल्या प्रमाणे विहीत मुदतीत उपलब्ध करुन देण्यात आलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक 25.11.2006 च्या अर्जा प्रमाणे दिनांक 22.12.2005 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे व मुद्या क्र. 2 ची माहिती ही माहिती या व्याख्येत येत नसल्याने सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 9.10.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 585/2007 व 586/2007.**

1) सौ. चित्रा ललितराव पाटील
न्यु कॉलोनी, कार्पोरेशन शाळेमागे,
नागपूर 440 001. ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अपर आयुक्त,
नागपूर महानगर पालिका नागपूर.

2) जन माहिती अधिकारी तथा
सहा. संचालक,
नगर रचना, महानगर पालिका, नागपूर ..... **उत्तरवादी**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक 27/10/2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय दाखले केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे कोणताही प्रतिनिधी हजर नाहीत.

2. अपील क्र. 585/2007 अपीलकर्ती हिने दिनांक 5.7.2006 रोजी 2 मुद्यांवर माहिती मागितली होती. तत्कालीन माहिती आयुक्त यांचे दि. 13.6.1994 चे अंतिम आदेशाची व हायकोर्टाचे दि. 10.10.1995 चे आदेशाची अंमलबजावणी करुन त्या कार्यवाहीची माहिती मिळणेबाबत अर्जदाराने मा. आयुक्त मनपा यांना दि. 31.5.2006 रोजी अर्ज सादर केला होता हा अर्ज आपले कार्यालयात प्राप्त झाला. 1) उपरोक्त अर्जावर मा. आयुक्त मनपा यांनी घेतलेल्या निर्णयासहीत केलेल्या कार्यवाहीची साक्षांकित प्रती.

2) उपरोक्त अर्जावर मा. आयुक्त मनपा यांनी कार्यवाही केली नसल्यास व निर्णयही घेतला नसल्यास त्याची कारणे सविस्तर माहितीसह अर्जदारास पुरवावी.

सदरची माहिती ही नोंदनीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या संदर्भात दि. 31.7.2006 रोजी माहिती अधिकारी यांनी उत्तर दिलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी दि. 2.9.2006 रोजी प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपीलाचा निर्णय दि. 30.9.2006 रोजी देण्यात आलेला असून प्रथम अपीलाच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केले आहे.

3. अपीलकर्ती हिचे अर्जात मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की दि. 31.7.2006 रोजी जे उत्तर देण्यात आलेले आहे ते उत्तर हे अर्जात मागितलेल्या माहितीच्या पेक्षा वेगळे असून विसंगत दिसून येते. अपीलकर्ती हिने निरनिराळया सहित केलेल्या कार्यवाहीच्या साक्षांकीत प्रती अशी माहिती मागितलेली होती परंतु उत्तरामध्ये थोडक्यात कार्यवाही काय केली याबाबतची माहिती तयार करुन देण्यात आलेली आहे. व त्यामुळे अपीलकर्ती हिने मागितलेली माहिती ही त्यांना मिळालेली नाही असाच निष्कर्ष काढावा लागत आहे. अपीलकर्ती हिने मुद्या क्र. 3 मध्ये कार्यवाही केली नसल्यास व निर्णय केला नसल्यास त्याची माहिती सविस्तर माहिती सहीत अर्जदारास पुरवावी. ही जी माहिती मागितलेली आहे तर कार्यवाही काय केली

याबाबतची माहिती ही उत्तरात दिलेली आहे व त्यामुळे कार्यवाही केली नसल्यास वगैरे जे उत्तर देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. असे असले तरी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकारणात कारवाई का झाली नाही किंवा कशी झाली नाही याबाबतची कारणे देणे अपेक्षित नाही व त्यामुळे अर्जातील मुद्या क्र. 3 हा निकालात निघतो.

प्रथम अपीलाच्या निर्णयातसुध्दा मुद्या क्र. 3 बद्यल दिलेला निर्णय योग्य आहे परंतु मुद्या क्र. 2 प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नाही याबद्यल कोणत्याही प्रकारचे भाष्य केलेले नाही किंवा तसा निर्णयसुध्दा दिलेला नाही. व त्यामुळे अपीलाचा निर्णय देतांना कोणत्याही प्रकारे अपीलार्थी हिने केलेला अर्ज व माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर दिलेले दिसून येत नाही व त्यामुळेसुध्दा अपीलार्थी हिस त्यांना अर्जातील मागितलेली माहिती ही मिळालेली नाही हे त्यांचे म्हणणे संयुक्तिक वाटते. अपीलार्थी व त्यांचे पती श्रीयुत ललितराव पाटील यांनी अपीलार्थी तर्फे जो युक्तिवाद केलेला आहे त्यांनी आता पर्यंत एकाच प्रकरणाच्या संदर्भात अनेक अर्ज महानगर पालिकेकडे केलेले दिसून आलेले आहे. यापूर्वी सुध्दा आयोगाने त्याबाबतचे निर्णय दिलेले आहे व त्यामुळे माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याचा प्रयत्न केलेला असला तरी माहितीच्या अधिकारातील अर्ज आल्यानंतर त्या अर्जातील मागितलेल्या माहितीचे वाचन करुन त्याप्रमाणे तंतोतंत माहिती दिली असती तर अपीलकर्ती हिस तक्रार करण्याची जागा राहिली नसती व माहितीच्या अर्जाच्या संदर्भात कनिष्ठ कर्मचा—यावर अवलंबून राहून जर माहिती अधिकारी कोणत्याही प्रकारची तपासणी न करता व प्रथम अपीलीय अधिकारी कोणत्याही प्रकारची चौकशी न करता निर्णय देत असले तर त्यामुळे सर्व प्राधिकरणाचे कामकाज व आयोगाच्या पुढे शास्तीस सामोरे जाण्याचे प्रकार हे माहिती अधिकारी आढवून घेतील व या प्रकरणात सुध्दा अशा प्रकारे घडलेले दिसून येत आहे अन्यथा मागितलेल्या माहितीप्रमाणे जर माहिती उपलब्ध करुन दिली असती तर प्रथम अपीलातसुध्दा येण्याची आवश्यकता अपीलार्थीस वाटली नसती. व त्यामुळे सदरच्या

अर्जाच्या माहिती पुरवण्याच्या संदर्भात तात्कालीन माहिती अधिकारी हे दोषी आहेत व अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे शास्तीस पात्र आहेत. अपील क्र. 586/2007 मध्ये दिनांक 5.6.2006 रोजी अपीलकर्ती हिने क्र. मनपाना/नरवि/माअअ/1946 दिनांक 17.10.05 चे पत्रातील मुद्या क्र. 1 अन्वये दिलेल्या माहिती नुसार मा. अतिरिक्त आयुक्त यांचा निर्णय दि. 17.10.2005 पुर्वी कोणत्या प्रकारचा आहे याची निश्चित माहिती अर्जदारास पुरवावी. माहिती साठी दि. 17.10.2005 चे पत्र व माहितीच्या अधिकारा अंतर्गत दि. 28.9.2005 ला दिलेले अर्ज हे अपीलकर्ती हिने संदर्भ दिलेला असून माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केले आहे. सदरच्या अर्जाच्या संदर्भात दिनांक 22.6.2006 रोजी माहिती अधिकारी यांनी जे उत्तर दिलेले दिसून येते त्या उत्तराच्या निर्णयाच्या विरुध्द दि. 5.7.2006 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दि. 29.7.2006 रोजी दिलेला असून सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ती हिने द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

4. अपीलकर्ती हिने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात दि. 22.6.2006 रोजी दिलेल्या उत्तराचे अवलोकन केले असता उत्तर हे संदर्भरहीत आहे असे दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ती यांचे समाधान झालेले दिसून येत नाही. प्रथम अपीलाच्या निर्णयातसुध्दा अपीलकर्ती हिने दि. 5.6.2006 रोजी 2 वेगवेगळे अर्ज केलेले असल्यामुळे नजरचुकीने अशा प्रकारची माहिती दिली गेली आहे असा निष्कर्ष काढलेला दिसून येतो.तसेच रिव्हीजन केस नं. जीए/52/8/04–05 या प्रकरणात अतिरिक्त आयुक्तांचे आदेश दि. 16.11.2005 रोजी झालेले आहे त्यामुळे त्या आदेशाची प्रत मिळण्यासाठी जरी 25.10. 2005 रोजी आवश्यक शुल्क भरले असले तरी आदेश पारीत न झाल्यामुळे त्यांना प्रत मिळालेली नाही व दि. 17.10.2005 पुर्वी आदेश झालेले नाही हे स्पष्ट होते हा निष्कर्ष काढलेला असल्यावर सुध्दा नजरचुकीने असे झाले हा माहिती अधिकारी याचा युक्तीवाद पटण्या सारखा आहे हा योग्य वाटत नाही. रिव्हीजन केस नं. जीऐ/52/8/84–05 या प्रकरणात दि. 17.10.2005 रोजी आदेशच झालेले नसतांना अतिरिक्त आयुक्त यांच्या

निर्णयाची प्रत आपण योग्य शुल्क भरुन या आयोगाकडून प्रत प्राप्त करुन घ्यावी असे कळविले हे मुळात दिशाभूल करणारे आहे व आदेश झालेला आहे असे गृहीत घरुनच अपीलकर्ता यांनी दि. 25.10.2005 रोजी आवश्यक शुल्क भरलेले दिसून येते. यावरुन अपीलकर्ती हिच्या माहितीच्या अर्जाप्रमाणे माहिती जी उपलब्ध करुन दिलेली आहे ती दिशाभूल करणारी आहे असे दिसून येते व त्याकरीता माहिती अधिकारी हया दोषी आहेत व अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे शास्तीस पात्र आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (1) प्रमाणे जी प्रथम अपीलाची तरतुद करण्यात आलेली आहे त्या तरतुदीचा उद्येश असा आहे की ज्या सार्वजनिक प्राधिकरणामधून माहिती मागितलेली आहे त्या सार्वजनिक प्राधिकरणाच्या माहिती अधिका–यानी योग्य रितीने माहिती उपलब्ध करुन दिली नसली तर त्याची छाननी करणे हे त्याच सार्वजनिक प्राधिकरणात वरिष्ठ पदावर कार्यरत असणा–या अधिका–यास संयुक्तिक राहील व त्यातून अर्जदारास त्यांनी मागितलेली माहिती ही सार्वजनिक प्राधिकरणाच्या स्तरावरुन उपलब्ध होवू शकेल व त्यास पुन्हा आयोगापुढे द्वितीय अपील दाखल करण्याचा प्रसंग येणार नाही असा आहे. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी हे एकतर सुनावणी घेत नाही व सुनावणी घेतली तर त्या प्रकरणातील सखोल अशी छाननी न करता त्रोटक असा निर्णय देत असतात व त्यामुळेच अर्जदार यांना राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपीले सादर करण्याची वेळ येते. याबाबत सार्वजनिक प्राधिकरणातील प्रथम अपीलीय अधिकारी यांनी यापुढे तरी अपीलाची सुनावणी घेवून त्याबाबतची योग्य ती छाननी करुन सार्वजनिक प्राधिकरणाचे स्तरावर अर्जदारास माहिती उपलब्ध होईल हे पाहणे आवश्यक ठरते. अन्यथा अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन करणारे ठरु शकते. त्याही पेक्षा अर्जदाराचा आलेला माहितीचा अर्ज हा काळजीपूर्वक वाचला व त्याप्रमाणे तंतोतंत माहिती उपलब्ध करुन दिली तर अर्जदारास प्रथम अपीलसुध्दा दाखल करावे लागणार नाही. परंतू माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी हे अर्जदाराचे अर्ज वाचत सुध्दा नाहीत असेच वरील दोनही अपीलाच्या संदर्भातील दिलेल्या माहिती वरुन दिसून येते.

**आ दे श**

1) अपील क्र. 585/2007 मध्ये जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती माहिती ही दि. 5.7.2006 मधील मागितलेल्या माहितीप्रमाणे नसल्यामुळे विद्यमान माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी व तात्कालीन माहिती अधिकारी हया दोषी असल्यामुळे त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 1000/- शास्ती लादण्यात येत आहे व सदरची शास्ती ही दरमहाच्या वेतनातून वसूल करण्यात येवून तशा प्रकारचा अहवाल हा आयुक्त महानगर पालिका नागपूर यांनी आयोगास सादर करावा.

2) अपील क्र. 586/2007 मध्ये अपीलकर्ती हिने दि. 5.7.2006 चे अर्जामध्ये मागितलेल्या माहितीचे उत्तर दि. 22.6.2007 ला जे दिलेले आहे दिशाभूल करणारे असल्यामुळे तात्कालीन माहिती अधिकारी हया दोषी आहेत व त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 1000/- शास्ती लादण्यात येत असून सदरची शास्ती ही त्यांच्या दरमहाच्या वेतनातून वसूल करण्यात येवून तशा प्रकारचा अहवाल हा आयुक्त महानगर पालिका नागपूर यांनी आयोगास सादर करावा. तसेच विद्यमान माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यास त्यांनी मागितलेली माहिती ही शुल्क भरलेले असल्यामुळे उपलब्ध करुन देण्यात यावे व तशाप्रकारची पोच त्यांचेकडून घ्यावी.

3) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 10.10.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 133/2007.**

1) श्री विनय कमलाकर कुंटे
रा. फ्लॅट बी–6, वृंदावन, भरत नगर
(द्वारका कोऑप. हाऊसिंग सोसायटी)
अमरावती रोड नागपूर 440 033. ..... **तक्रारकर्ता**

**विरुध्द**

1) श्री प्रविण वानखेडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपनिबंधक, सहकारी संस्था,
(शहर–1) नागपूर.

2) श्री एम. बी. पेंडसे
जन माहिती अधिकारी तथा
सचिव, द्वारका कोऑप. हाऊसिंग सोसायटी,
भरत नगर, अमरावती रोड
नागपूर 440 033. नागपूर. ..... **गैरतक्रारदार**

**<u>नि र्ण य</u>**

तक्रारकर्ता यांनी दिनांक 2.10.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम 18 (1) नुसार तक्रार दाखल केलेली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. तक्रारदार व गैरतक्रारदार हजर आहेत.

2. तक्रारदार यांनी दिनांक 15.5.2006 रोजी दि. 30.6.2001 चे रिझर्व्ह बॅंकेस मॅनेजिंग कमिटीने व श्री विजय कुंटे यांनी सौ. सप्रे कर्जाच्या बद्यल दिलेले पत्र व त्यासंदर्भातील नाहरकत प्रमाणपत्राची प्रत व्यक्तीशः घेणार म्हणून तसेच झेराक्स कॉपी

(पत्र क. नागपूर नंबर 3317/03/13(एमआयएससी) 01—02) कालावधी 18.12.2001 अशा प्रकारच्या दोन पत्राच्या प्रती त्यांनी मागितलेल्या होत्या. सदरच्या अर्जाप्रमाणे त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती विहित मुदतीत उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 16.6.2006 रोजी प्रथम अपील दाखल केले होते. सदरच्या अपीलाचा निर्णय दि. 17.6.2006 रोजी देण्यात आलेला असून सचिव, द्वारका कोऑप. हाऊसिंग सोसायटी यांनी तक्रारदार यास माहिती उपलब्ध करुन द्यावी म्हणून आदेश दिलेला दिसून येतो. सदरच्या अपीलाच्या निर्णयाच्या प्रमाणे तक्रारदार यांना माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे त्यांनी आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे.

3. तक्रारदार यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये पूर्णपणे विवेचन करण्यात आलेले आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी म्हणून आदेशपण दिलेले आहेत. सदरच्या आदेशाच्या संदर्भात गैरतक्रारदार तथा सचिव द्वारका कोऑप. हाऊसिंग सोसायटी यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की सदरच्या पत्राच्या मुळ प्रती हया सोसायटीच्या रेकॉर्डमध्ये नाहीत. झेराक्स प्रत उपलब्ध आहे. परंतु तक्रारदार यांना मुळ प्रत हवी आहे. दोन वर्षापूर्वी सोसायटीचे सचिव झाल्यानंतर त्यांनी सोसायटीच्या माजी सचिवांकडून रेकॉर्ड ताब्यात घेतले. परंतु रेकॉर्ड घेतांना प्रत्येक नस्तीमधील प्रत्येक कागद हा तपासून घेतला जात नाही व ही प्रथा आहे. त्यांच्या आधीच्या सचिवांनी सुध्दा त्यांच्या आधीच्या सचिवाकडून रेकॉर्ड घेतले होते व त्यांना तक्रारदार यांनीच रेकॉर्ड हस्तांतर केले होते. दरम्यान प्रशासक सुध्दा नियुक्त करण्यात आले होते. प्रशासकाकडे सुध्दा सदरच्या प्रत्राची मागणी केली होती परंतु ती उपलब्ध झाली नाही असे तक्रारदार यांनी स्वतः सांगितले. प्रथम अपीलीय अधिकारी यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की विद्यमान सचिवानी मागच्या सचिवाना विचारावयास पाहिजे होते व त्याप्रमाणे गैरतक्रारदार यांनी एका सोसायटीत राहात असल्यामुळे त्यांना तक्रारदार यांच्या मागणीप्रमाणे तोंडी विचारणा करण्यात आली होती. त्यांनी सुध्दा सदरचे पत्र उपलब्ध होते किंवा नाही याबद्यलची असमर्थता

दाखविली. सदरच्या प्रकरणात उपनिबंधक सहकारी संस्था नागपूर यांनी दाखल केलेल्या खुलाशासोबत कागदपत्रे दाखल केलेली आहेत. सदरच्या कागदपत्राच्या मध्ये अपीलाच्या सुनावणीच्या संदर्भात काढलेल्या नोटिसी किंवा टिपणीच्या प्रती आहेत. तसेच दि. 7.7. 2006 रोजी सोसायटीचे सचिव श्री पेंडसे यांनी उपनिबंधक सहकारी संस्था यांना लिहिलेले पत्र दिसून येते. व त्यातही रेकॉर्डचा तपास चालू आहे व मिळाले तरी त्याची सर्टिफाईड कॉपी तक्रारदार श्री व्हि. के. कुंटे यांना देण्यात येईल असे नमुद केलेले आहे. पत्र क्र. दोन च्या संदर्भामध्ये पत्र आरबीआय नागपूर (हाऊसिंग सेक्शन) ने श्रीमती सी. ऐ. सप्रे (आमचे सभासद) यांनी लिहिलेले आहे (सोसायटीला किंवा) तेव्हा त्याची झेराक्स प्रत श्री कुंटे यांना देण्याचा प्रश्नच येत नाही तसेच पूर्व सचिव श्री पी. एस. खामगावकर यांना श्री कुंटे यांना पूर्वीच कळविलेले आहे. तसेच दि. 11.7.2007 चे पुन्हा एक पत्र श्री पेंडसे सचिव यांनी उपनिबंधक सहकारी संस्था यांना लिहिलेले दिसून येते. त्यात आमचे सभासद श्री विनय क. कुंटे यांनी त्यांच्या दि. 10.2.2006 व 22.2.2006 पत्राद्वारे दोन पत्राची झेराक्स कॉपीची मागणी केली होती त्यांना अनुक्रमे 14.2.2006 व 25.2.2006 पत्रा द्वारे उत्तर पाठविण्यात आले आहे. व त्याची पत्राच्या प्रतीची नोंद आमचे दप्तरी नोंद आहे. ''यासंदर्भात एक गोष्ट आपले निदर्शनास आणतो की विनय कुंटे यांनी सप्टेंबर 2002 पासून सोसायटीमधील मेंटेनन्स/सर्व्हीस चार्जेस/स्पेशल लेव्ही कॉल चे पेमेंट केले नाही. अेरिअर्सची रक्कम (ॲज ऑन डेट) जवळ जवळ 18000 रु. होते. यासंदर्भात सोसायटीने कोऑपरेटिव्ह कोर्टामध्ये त्यांचे विरुध्द केस दाखल केली आहे. व तिचे हिअरींग चालू आहे. तेव्हा असे काहीतरी कुरापट काढून पदाधिका–यां विरुध्द खोटया तक्रारी करणे इत्यादी त्यांचे उद्योग चालू आहेत कोऑपरेटिव्ह डिपार्टमेंट/पोलीस/ सोसायटीचे पदाधिकारी यांनाच यावरुन त्रास होत आहे'' असे पत्र लिहिलेले दिसून येते. त्यासंदर्भात सुध्दा 19.8.2006 रोजी तक्रारदार यांना उपनिबंधक शहर 1 सहकारी संस्था यांनी त्यांच्या विरुध्द केलेल्या आरोपामध्ये खुलासा दाखल केलेला दिसून येतो. सदरच्या खुलाशात सुध्दा त्यांनी सोसायटीच्या

संपूर्ण कामकाजा विषयी तक्रारी केलेल्या दिसून येत आहेत व त्याची चौकशी करतांना असे उपनिबंधक यांना त्यांनी विनंती केलेली आहे. या एकुणच संपूर्ण प्रकरणा वरुन असे दिसून येते की सोसायटीतील पदाधिका–यांच्या आपसातील वादाकरीता माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदींचा वापर केला जात आहे. वास्तविक अशा प्रकारे वापर करण्याचा अधिनियमाच्या तरतुदींमध्ये तरतुद दिसून येत नाही. अर्जदारास जरी माहिती विचारण्याचे कारण विचारता येत नसले तरी सुध्दा जेव्हा शास्तीची मागणी केली जाते त्यावेळेस यामागील सर्व शक्याशक्यतेचा व कागदपत्राचा व त्यामागील हेतूचा विचार करुन खात्री करुन घेणे आवश्यक ठरते. तक्रारकर्त्यास माहितीच्या अर्जाच्यापूर्वी सुध्दा संस्थेच्या पदाधिका–याकडून सदरचे पत्र उपलब्ध नाही असे असे कळविण्यात आलेले आहे. वास्तविक ज्या पत्राच्या प्रती ते मागत आहेत ती पत्रे ही त्रयस्थाशी संबंधित आहे व त्यामुळे यात कोणतेही सार्वजनिक हित दिसून येत नाही. असलेच तर दि. 11.7.2007 रोजी उपनिबंधक सहकारी संस्था यांना सचिव श्री पेंडसे यांनी निदर्शनास आणलेल्या बाबींप्रमाणे स्वहितच दिसून येते. अशा प्रकारे कोणत्याही प्रकारचा सार्वजनिक हिताचा मुद्या नसतांना सार्वजनिक प्राधिकरण, शासकीय संस्था व त्याचप्रमाणे आयोग यांचेकडे वेगवेगळे अर्ज करणे याचा अर्थ माहितीच्या अधिकाराच्या अधिनियमाच्या तरतुदींचा गैरवापर आहे असे दिसून येते. निर्णय सुरु असतांना तक्रारदार यांनी दि. 21.4.2004 रोजी इन्स्पेक्टर अंबाझरी पोलीस स्टेशन नागपूर यांचेकडे सोसायटीच्या कार्यकारी समितीच्या सभासदांच्या विरुध्द तक्रार दाखल केलेली प्रत त्यांनी आता दाखल केलेली आहे. अर्थातच सदरच्या तक्रारीच्या संदर्भामध्ये पुढे काय झाले याबद्यल माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे चौकशी करण्याचे कारण नाही कलम 18 (1) प्रमाणे जी तक्रार करुन मागितलेली कागदपत्रे मिळालेली नाही त्याबद्यल करण्यात आलेली आहे त्याप्रमाणे संस्थेच्या रेकॉर्डची तपासणी ही तक्रारदार यांना करता येईल. त्याकरीता उपनिबंधक सहकारी संस्था यांनी त्यांच्या कनिष्ठ अधिका–यास नियुक्त करुन त्यांच्या हजेरीत तक्रारदाराच्या सोबत कागदपत्राची

तपासणी करणे संयुक्तिक राहिल. सदरच्या कागदपत्राची तपासणीच्या अंती जर मागितलेल्या मुळ पत्राच्या प्रती उपलब्ध झाल्यास त्या प्रती त्यांना उपलब्ध करुन देण्यास हरकत नाही. उपलब्ध नसेल तर त्याप्रमाणे लेखी तक्रारदारास त्याचवेळेस कळवुन त्यांची पोच घेणे आवश्यक राहील. सदरची तपासणी ही विद्यमान कार्यकारी सभासदांच्या हजेरीत करणे योग्य होईल.

## आ दे श

1) तक्रारकर्ता यांची तक्रार ही अंशतः मंजुर करण्यात येत असून तक्रारदार यांनी उपनिबंधक सहकारी संस्था यांनी नियुक्त केलेल्या अधिका–याच्या सोबत सोसायटीच्या संपूर्ण कागदपत्राची तपासणी विद्यमान कार्यकारी सभासदांच्या हजेरीत करावी.

2) तक्रारदार सचिव यांनी सोसायटीची कागदपत्रे ही तक्रारदार व उपनिबंधक सहकारी संस्था यांचे प्रतिनिधी यांच्या समवेत व विद्यमान कार्यकारी सभासदांच्या हजेरीत तपासणीसाठी उपलब्ध करुन द्यावी. तपासणी ही कोणत्याही रविवारी करण्यात यावी जेणेकरुन सर्व विद्यमान कार्यकारी सभासद हजर राहू शकतील. उपनिबंधक सहकारी संस्था यांनी अधिकारी नियुक्त केल्यानंतर कोणत्याही रविवारच्या दिवशी वेळ तक्रारदार व गैरतक्रारदार यांना कळवावी.

3) तक्रारकर्ता व माहिती अधिकारी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 10.10.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 498/2007.**

1) श्री नामदेव सुर्यभानजी शिरभाते
रा. शनीवारपेठ, वरुर
ता. वरुड जि. अमरावती. ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) श्री अ. रा. देशमुख
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसंचालक,
अमरावती विभाग अमरावती (नगर रचना कार्यालय)
त. जि. अमरावती

2) श्री ज. म. धूत
जन माहिती अधिकारी तथा
सहा. संचालक,
नगर रचना, अमरावती त. जि. अमरावती ..... **उत्तरवादी**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 26/2/2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 13.10.2006 रोजी (1) दि. 9.10.2006 ला शाहा इंतिनिअरची नकल (2) 14.9.2006 चा अपील मधील 9.10.2006 चे रेकॉर्डची नकल (3) 21.8.2006 च्या रिपोर्टची नकल (4) 11.9.2006 च्या रिपोर्टची नकल (5) 14.9.2006 च्या

रिपोर्टची नकल. सदरची माहिती स्वतः घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या संदर्भात दि. 20.10.2006 रोजी सहा. संचालक नगर रचना अमरावती तथा माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यास सदर पत्रात मागणी केलेल्या माहितीचा सविस्तर तपशिल उदा. स.नं.मौजा, प्रकरणाचा विषय तारीख इत्यादीची सविस्तर माहिती दिल्यास त्याचा अपीलात शोघ घेवून माहिती उपलब्ध असल्यास नियमानुसार शुल्क भरुन देता येईल तरी सविस्तर तपशिल कळवावा. सदरचे पत्र अपीलकर्ता यास दि. 27.10.2006 रोजी मिळाल्याची पोच त्यांनी दिलेली दिसते. त्यानंतर दि. 26.10.2006 रोजी अपीलकर्ता यांनी उपसंचालक अमरावती विभाग अमरावती यांचेकडे प्रथम अपील केलेले दिसून येते. प्रथम अपीलातसुध्दा पुन्हा स्पष्टपणे कोणत्याही प्रकारचा तपशिल न देता पुन्हा माहिती मागण्याचा अर्जाप्रमाणेच 4 मुद्यांवर लिहून प्रथम अपील केलेले दिसून येते. दि.7.11.2006 रोजी उपसंचालक नगर रचना यांनी सदरचे अपील हे अपील अर्जात ज्या आदेशा विरुध्द अपील केले आहे तसेच आदेश मिळाल्याचा दिनांक उक्त अर्जात नमुद केलेले नाही. विषयांकित माहिती संबंधीत माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त करुन घेण्याबाबत आपण सहा. संचालक नगर रचना अमरावती यांचेकडे दि. 13.10.2006 अन्वये अर्ज केल्याचे सोबतच्या सहपत्रामध्ये दिसून येते. माहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त करुन घेण्याचा अवधी अर्ज प्राप्त झाल्यानंतर 30 दिवसाच्या आत उक्त अधिनियमामध्ये कलम 7 (1) मध्ये अंतर्भूत आहे. उक्त माहिती/आदेश प्राप्त करुन घेण्याचा अवधी संपण्यापूर्वीच आपण अपील दाखल केल्याचे प्रयोजन समजून येत नाही. वरील करणास्तव आपले अपील खारीज करण्यात येत आहे. सदरचा निर्णय दि. 10.11.2006 रोजी पोष्टाने मिळाला असे अपीलकर्ता यांनी त्यावर नमुद केलेले दिसून येते. पुन्हा दि. 21.11.2006 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्यामध्ये सुध्दा कोणत्याही प्रकारचा माहितीच्या बद्यलचा तपशिल दिलेला दिसून येत नाही. परंतु सदरच्या अपीलाच्या संदर्भात दि. 7.12.2006 रोजी पत्राने दि. 13.12.2006 रोजी सुनावणीस हजर राहावे असे पत्र दिलेले दिसून येते. पुन्हा दि. 15.12.2006 रोजी सुनावणीस हजर राहण्यास पत्र दिलेले दिसून येते. पुन्हा दि. 28.12.2006 रोजी सुनावणीस उपस्थित

राहण्याकरीता पत्र दिलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दि. 6.1.2007 रोजी दिलेला असून अपीलकर्ता यांनी अपेक्षिलेल्या माहितीचा तपशिल अपुरा असल्याने व अपीलकर्ता यांनी सदर माहिती पुरविण्याचे कबूल केल्याप्रमाणे अपीलकर्त्याने सविस्तर माहितीचा तपशिल माहिती अधिकारी यांना पुरविण्यात यावा व माहिती अधिकारी यांनी उक्त माहिती यथाशिघ्र पुरवावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. दि. 22.12.2006 रोजी सहा. संचालक नगर रचना अमरावती यांना पुन्हा माहितीचा तपशिल उपलब्ध करुन देण्याकरीता लिहिलेले दिसून येते. दि. 9.1.2007 रोजी अपीलकर्ता यांनी दि. 5.1.2007 ला असलेल्या अपीलामध्ये जी चर्चा झाली त्याबाबत एक पत्र उपसंचालक नगर रचना यांनी लिहिलेले दिसून येते. त्यामध्ये सुध्दा कोणत्याही प्रकारचा माहितीचा तपशिल दिलेला दिसून येत नाही. दि. 13.2.1007 रोजी पुन्हा सहा. संचालक नगर रचना अमरावती यांनी माहितीचा तपशिल सादर केला नाही त्यामुळे आपण केलेली मागणी या कार्यालयाच्या अभिलेखात ठेवता येत नाही आता या कार्यालयाने अपेक्षिलेल्या माहितीचा तपशिल पुरविण्यात यावा म्हणजे माहिती पुरविता येईल व आपणास सर्वोतपरी सहकार्य करता येईल असे पत्र दिलेले दिसून येते. दि. 26.2.2007 रोजी आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपीलातसुध्दा अर्जातील विचारलेल्या माहितीप्रमाणेच माहिती नमुद केलेली दिसून येते. त्यातही विचारलेल्या माहितीबद्यल संदर्भ दिलेला दिसून येत नाही. व सहा. संचालक नगर रचना व उपसंचालक नगर रचना यांनी खोटी माहिती दिली अशा प्रकारचे नमुद केलेले असून पुन्हा 9.1.2007 ला माहिती दिली नाही असे म्हटले आहे.

3. अपीलकर्ता यांनी माहितीच्या अर्जामध्ये जी काही माहिती मागितलेली आहे त्याबद्यल स्पष्टता नसल्यामुळेच माहितीचा तपशिल उपलब्ध करुन द्यावा म्हणजे माहिती शोधून देता येईल असे जे माहिती अधिका–याने पत्र दिलेले आहे ते योग्य दिसून येते. द्वितीय अपील मेमोमध्ये सुध्दा स्वतत्रपणे मागितलेल्या माहितीचे जरी वर्णन वाचले तर त्यातून कोणताही अर्थबोध होत नाही असे दिसते. (माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 6 अन्वये) माहिती मागण्याचा जो अर्ज असेल त्या अर्जात माहितीचे वर्णन हे

तपशिलतात द्यावे अन्यथासुध्दा मागितलेल्या माहितीचा संदर्भ जर दिला नसेल तर कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणास माहिती उपलब्ध करुन देणे अशक्य होईल. अर्जदारानी जर स्वतःची समजूत करुन घेतली की सार्वजनिक प्राधिकरणामध्ये त्याचे एकटयाचेच प्रकरण आहे व त्याचे नावावरुन माहिती उपलब्ध करुन द्यावी हेही शक्य नाही. कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणामध्ये रोज शेकडयानी पत्रव्यवहार होत असतो व त्यातून संदर्भ असल्याशिवाय माहिती किंवा त्याबद्यलची नस्ती शोधणेसुध्दा अशक्य असते. वास्तविक अपीलकर्ता यांना जर खरोखरीच माहितीची आवश्यकता असती तर दि. 20.10.2006 च्या पत्राच्या अनुषंगाने तातडीने माहितीचा संदर्भ हा माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध करुन दिला असता व त्याना त्याच वेळेस विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली असती. परंतु अशा प्रकारे माहितीचा तपशिल किंवा संदर्भ उपलब्ध करुन न देता पुन्हा प्रथम अपील करणे त्यातही मुदतीच्या आत करणे त्यातही कोणताही माहितीचा संदर्भ उपलब्ध करुन न देणे निर्णय दिल्यावर सुध्दा संदर्भ उपलब्ध करुन न देणे व द्वितीय अपील दाखल करेपर्यंत सुध्दा त्याचा तपशिल उपलब्ध करुन न देणे याचे कारण अर्थातच अपीलकर्ता यांना माहिती असावे. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदींप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे हे महत्वाचे आहे. परंतु आतासुध्दा सदरच्या निर्णयात माहिती उपलब्ध करुन द्यावी असा आदेश जरी दिला तरी माहिती अधिकारी यांची तपशिला अभावी माहिती उपलब्ध करुन देण्याचे अडचणच होईल असे दिसते. आता सुनावणीच्या वेळेस अपीलकर्ता यांना माहितीच्या अधिकारात त्यानंतर त्याच सार्वजनिक प्राधिकरणाकडून आवक जावक रजिस्टरच्या नोंदीच्या झेरॉक्स दाखल केलेल्या आहेत व त्यावरुन त्यांनी दिलेल्या रिपोर्टच्या तारखा दिसून येत आहेत. परंतु ही माहिती त्यांना द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळेस उपलब्ध करुन दिलेली आहे. हीच माहिती माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी तिन वेळा पत्र लिहून तपशिल उपलब्ध करुन द्यावा त्यावेळेस दिला असता तर त्यांना त्याच वेळेस ही माहिती

मिळाली असती. माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी व आयोगाचा वेळ त्यांनी का घेतला हेही सांगणे अवघड आहे व त्याकरीता पुन्हा एक वर्षाचा साधारणतः कालावधी का घालविला हेही सांगणे अवघड आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी त्यांना खरोखरच माहिती हवी असल्यास माहिती अधिकारी यांना माहितीचा सखोल तपशिल उपलब्ध करुन द्यावा व त्यानंतर त्यांनी दिलेल्या तपशिलाप्रमाणे माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही उपलब्ध करुन द्यावी.

2) सदरची माहिती उपलब्ध करुन घेतांना महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या नियमाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याचा जो खर्च येईल तो खर्च अपीलकर्ता यांना त्यांनी माहितीचा तपशिल उपलब्ध करुन दिल्यानंतर कळविण्यात यावा व सदरच्या खर्चाचा भरणा झाल्यावरच त्यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी.

3) अपीलकर्ता यांनी सुध्दा सदरचा निर्णय मिळाल्याच्या नंतर माहिती अधिकारी यांना रजिस्टर पोष्टाने माहितीचा तपशिल हा कळवावा जेणेकरुन माहिती उपलब्ध करुन देणे शक्य होईल.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 11.10.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 501/2007.**

1) श्री अशोक वासुदेवराव पळसपगार

रा. गनोरी पो. दहीहांडा

ता. अकोला जि. अकोला ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा

गट विकास अधिकारी

पंचायत समिती अकोला ता. जि. अकोला

2) जन माहिती अधिकारी तथा

पंचायत समिती अकोला ता. जि. अकोला ..... **उत्तरवादी**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक 14/8/2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी हे विनाअनुमती गैरहजर आहेत. त्यांनी खुलासासुध्दा दाखल केलेला नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनीसुध्दा कोणत्याही प्रकारची कागदपत्रे दाखल केलेली नाहीत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 8.5.2006 रोजी मौजे गनोरी (गट ग्रामपंचात हिंगणी बु.) पं. स. अकोला येथील सिमेंट रस्त्याबाबत प्लान ईस्टीमेट संपूर्ण माहिती तसेच मौजे गनोरी येथील सर्वशिक्षा अभियान योजना अंतर्गत शाळा खोलीचे बांधकामाबाबत संपूर्ण माहिती प्लान ईस्टिमेट, सिमेंट रस्त्याचे लांबी रुंदी कुठुन कुठपर्यंत अंदाजित खर्च,

शाळेचा बांधकामास लागणारा अंदाजित खर्च, बांधकामाचे जागा प्लान ईस्टिमेट प्रमाणे सविस्तर माहिती देण्यात यावी. माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केले आहे. सदरच्या अर्जाच्या संदर्भात विहीत मुदतीत माहिती न मिळाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक 21.6.2006 रोजी अपीलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपीलाचीसुध्दा सुनावणी घेतली नाही असे अपीलकर्ता यांनी त्यांच्या खुलाशात दिलेले आहे व त्यामुळे त्यांनी सदरचे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. सदरचे द्वितीय अपीलाचे सुनावणीस उत्तरवादी हजर नाहीत व त्यांनी गैरहजर राहण्याच्याकरीता कोणत्याही प्रकारची अनुमती मागितली नाही हा आयोगाचा अवमान आहे. तसेच अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही माहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत उपलब्ध करुन दिलेली नाही असे अपीलकर्ता यांचे म्हणणे असल्यामुळे माहिती अधिकारी हे अधिनियमाच्या कलम 20 प्रमाणे शास्तीस पात्र आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा अपीलाची सुनावणी घेतली नाही असे अपीलकर्ता यांनी सांगितल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनीसुध्दा अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केलेले दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी दिनांक 8.5.2006 च्या अर्जामध्ये मागितलेली माहिती हा निर्णय मिळाल्या पासून त्यांना 10 दिवसात जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यास विहीत मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे ते कलम 20 प्रमाणे दोषी आहेत व त्यांना त्यांचे विरुध्द कलम 20 (1) प्रमाणे शास्ती कां लादण्यात येवू नये याबाबतचा खुलासा त्यांनी सदरचा निर्णय त्यांना मिळाल्या पासून 10 दिवसात आयोगाकडे करावचाचा आहे. अन्यथा

माहिती अधिका–यांचे काही म्हणणे नाही असे समजुन शास्तीचा निर्णय एकतर्फी देण्यात येईल.

3) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलाची सुनावणी घेतली नसल्यामुळे त्यांनीसुध्दा अधिनियमाच्या तरतुदींप्रमाणे उल्लंघन केलेले असल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अकोला यांनी त्यांचे विरुध्द योग्य ती कारवाई करावी. सदरच्या निर्णयाची प्रत ही मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अकोला यांना पोष्टाने पुढील कारवाई करण्याकरीता पाठविण्यात यावे.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 11.10.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

क्र. रामाआ/विक्षेना/ /2007
राज्य माहिती आयोगाचे कार्यालय,
रुम नं. 17/20, सिव्हली लाईन्स,
नागपूर
दिनांक 12 आक्टोबर, 2007.

प्रति,
डॉ. सुरेश जोशी,
मुख्य माहिती आयुक्त,
13 वा मजला, नविन प्रशासन भवन,
मंत्रालयासमोर मादाम कामा रोड,
मुंबई – 32.

विषय :– मुख्य माहिती आयुक्त व माहिती आयुक्त यांची दिनांक 17 ऑक्टोबर 2007 ला दिल्ली येथे होणारी परिषद.

सदर परिषदेच्या संदर्भात दिनांक 9.10.2007 रोजी पोष्टाने सचिव, महाराष्ट्र राज्य आयोग यांचेकडून सचिव, केंद्रिय माहिती आयोग यांना पाठविलेल्या दिनांक 5.10.2007 च्या व राज्य माहिती आयोग कार्यालय नागपूर, अमरावती, औरंगाबात, नाशिक, पूणे यांना पाठविलेल्या दि. 5.10.2007 च्या पत्रांच्या प्रती मिळाल्या.

2. राष्ट्रीय स्तरावर कोणत्याही परिषदेचे चर्चा सत्र आयोजित करतांना कमीत कमी तिन महिने तरी त्याची तयारी सुरु असते. केंद्रिय सुचना आयोगाकडून आलेल्या सर्व कार्यक्रमाच्या संदर्भात कागदपत्रे पाहिली असता देशातील महाराष्ट्र सोडून सर्व राज्यातील माहिती आयोगाकडून निरनिराळया सुचना किंवा प्रश्न उपस्थित केल्याचे नमुद केले आहे. त्यावरुन अशा सुचना किंवा प्रश्न मागण्याचा पत्रव्यवहार हा ब–याच आधी केंद्रिय सुचना आयोगानी मागवलेल्या असाव्यात. त्यातही दि. 17.10.2007 रोजी केंद्रिय सुचना आयोगाचा जो कार्यक्रम करण्यात आलेला आहे त्या कार्यक्रमामध्ये दुपारच्या सत्रामध्ये डॉ. सुरेश जोशी मुख्य माहिती आयुक्त महाराष्ट्र व मि. विजय कुवळेकर माहिती आयुक्त पुणे यांचे पॅनलीस्ट म्हणून नाव दिलेले दिसून येते. याचा अर्थ केंद्रिय सुचना आयोगाकडून जो पत्रव्यवहार झालेला आहे तो पत्रव्यवहार हा ब–याच

पूर्वी राज्य माहिती आयोगाकडे आलेला असल्याशिवाय पॅनलीस्ट म्हणून नावे पाठविलेली दिसून येत नाही. तसेच आयोगाची जुन 2007 पासून दर महिन्याला मुंबई येथे बैठक झालेली आहे त्याबाबतचा विषय किंवा माहिती ही आयोगाच्या बैठकीपुढे केंव्हाच मांडण्यात आला नाही किंवा त्याबाबतची पुसटशी कल्पनासुध्दा देण्यात आली नाही. मात्र डॉ. जोशी व श्री पुळेकर यांची नावे ज्याअर्थी पाठविण्यात आलेली आहे त्याअर्थी विलास पाटील व श्रीयुत व्ही. बी. बोरगे या दोन राज्य माहिती आयुक्तांपासून सदरची माहिती लपविलेली दिसून येते. राज्य माहिती आयुक्त म्हणून दि. 27.12.2006 पासून मी व श्रीयुत बोरगे हे अनुक्रमे नागपूर व औरंगाबाद येथे कार्यरत असून महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातून माहिती मागण्याचे अर्ज येतात त्यातून वेगवेगळे बरेच अनुभव येतात. व त्या अनुभवातून अधिनियमातील तरतुदींप्रमाणे निर्णय देतांना बरेचसे प्रश्न उपस्थित होतात. याबद्यलचे आमचे अनुभव आम्ही सदरच्या परिषदेमध्ये इतर राज्याच्या माहिती आयुक्तांनी पाठविल्याप्रमाणे आम्हीही पाठविले असते. परंतु राज्य माहिती आयोगाने ही माहिती या दोन आयुक्तांपासून लपवून ठेवल्यामुळे आम्ही त्या संधीपासून या वर्षी तरी वंचित राहिलो आहोत.

3. जून किंवा जुलै महिन्यामध्ये पुणे येथे अशीच एक परिषद आयोजित करण्यात आली होती असे मध्यप्रदेशचे मुख्य माहिती आयुक्त भोपाळ येथे परत जातांना त्यांनी नागपूर येथील कार्यालयाचे कामकाजाची माहिती करुन घेण्याकरीता भेट दिली होती व त्याच वेळेस त्यांनी तुम्ही काल पुणे येथील परिषदेला कसे नव्हता असे विचारले होते. परंतु मुख्य माहिती आयुक्त डॉ. जोशी व श्री विजय कुवळेकर हे हजर होते ही माहिती त्यांनीच दिली. परंतु मुख्य माहिती आयुक्त म्हणून डॉ. जोशी यांनी केव्हाही सदरच्या परिषदेबद्यल काहीही आज पर्यंत श्री बोरगे व मला पुसटशी कल्पना सुध्दा मला दिली नाही. दिल्ली येथील परिषदेला डॉ. जोशी व श्रीयुत कुवळेकर, पुणे येथील परिषदेला डॉ. जोशी व श्रीयुत पुळेकर हयांची नावे होती परंतु श्रीयुत बोरगे व श्रीयुत पाटील हयांना पुसटशी कल्पना सुध्दा दिली जात नाही. यावरुन महाराष्ट्र राज्य माहिती आयोगामध्ये कशा प्रकारची पारदर्शकता कशाच्या आधारावर भेदभाव केला जातो आहे हे दिसून येते.

4. न्युझिलंड येथे सुध्दा दि. 26 ते 29 नोव्हेबर 2007 रोजी जी आंतराष्ट्रीय परिषद आहे त्या परिषदेच्या बाबत सुध्दा महा. राज्य माहिती आयोगाचे कार्यालयाने कोणत्याही प्रकारची कल्पना ही राज्य माहिती आयोगाच्या दर महिन्याला होणा–या बैठकीत केव्हाही दिली नाही. मात्र डॉ. सुरेश जोशी यांनी दि. 1.6.2007 रोजी सामान्य प्रशासन विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडे अर्ध शासकीय पत्र सदरच्या परिषदेला उपस्थित राहण्याच्या परवानगी करीता लिहीलेले दिसून येते. याचा अर्थ डॉ. जोशी यांना या कॉन्फरन्सची माहिती आधीच मिळाली असून सुध्दा त्यांनी सदरची माहिती ही आयोगाच्या सदस्यांपासून लपवून ठेवलेली दिसते. सामान्य प्रशासन विभागाने शासन आदेश क्र. एसआयसी–2007/सीआर 51/05 मंत्रालय, मुंबई दि. 24 सप्टेंबर 2007 प्रमाणे ही परवानगी दिलेली दिसून येते.

5. मी व श्रीयुत बोरगे यांनी आयोगाचे सदस्य म्हणून नियुक्ती झाल्या नंतर आयोगाचे कामकाजामध्ये कशा प्रकारे सुधारणा करण्याची गरज आहे याबद्यलचे वेळोवेळी जानेवारी 2007 पासून ते सप्टेंबर 2007 पर्यंत अनेक पत्रे लिहून व आयोगाच्या बैठकीत सुचना मांडलेल्या आहेत. अपील कार्यपध्दतीचे नियम, आयोगाच्या कामकाज पध्दतीचे नियम करण्याकरीता मसुदे सुध्दा तयार करुन दिलेले होते. परंतु मुंबई कार्यालयानी याबाबत कोणत्याही प्रकारची प्रगती अद्याप पर्यंत केलेली दिसून येत नाही. आयोगाचे मुंबई येथील कार्यालय स्वतःहून कार्यपध्दतीत सुधारणा करण्याकरीता प्रयत्न करीत आहे असे दिसून येत नाही. व तशाप्रकारची गरज आहे अशी आकलनशक्ती दिसून येत नाही. तसेच अपील, तक्रारीवर निर्णय देतांना जे प्रश्न उपस्थित होतात त्याबद्यलही कोणतीही चर्चा किंवा विचारांचे आदानप्रदान हे आयोगाच्या बैठकीत किंवा अन्यथा होतांना दिसत नाही. आयोगाच्या कामकाज प्रशासनिक असो किंवा वैधानिक, कामकाजाच्या संदर्भात, अर्धन्यायिक कामकाजाच्या संदर्भात प्रत्येक मुद्या हा आयोगाच्या बैठकीत एकमताने किंवा बहुमताने मान्यता घेवूनच अंमलबजावणी करता येते. त्याकरीता मी T. N. Sheshan V/s Union of India (1995 Vol.(4) Sec. 611,

Dhanoa V/s Union of India (AIR 991 SC 1745) व Subramniyam Swamy's Case मधील तेही मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावरुन वेळोवेळी दाखवून दिले असतांना सुध्दा त्याबाबतची दखल वरील उदाहरणांवरुन घेतली जात नाही असे दिसून येते व अधिनियमाच्या कलम 15 (2) कडे सोयीस्कर दुर्लक्ष केले जाते. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 हा मुळात प्रशासनामध्ये पारदर्शकता आणण्याच्या दृष्टीने संसदेत पारीत केलेला अधिनियम आहे. व त्याची अंमलबजावणी योग्य रितीने होते आहे किंवा नाही याबाबतची जबाबदारी ही प्रामुख्याने राज्य माहिती आयोगावर टाकली असतांना राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयात पारदर्शकता नसेल तर राज्य माहिती आयोग हे केंद्रिय सुचना आयोगाच्या सचिव श्रीमती रिटा सिन्हा यांनी श्रीयुत अपूर्वचंद्र निवासी आयुक्त महा. शासन नवी दिल्ली यांना दि. 28.9.2007 च्या पत्रावरुन दिसून येते. यापुढे तरी राज्य माहिती आयोगात वरीलप्रमाणे भेदभाव होणार नाही अशी अपेक्षा करणे वावगे ठरणार नाही.

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

प्रतिलीपी माहिती करीता : –

1) मा. राज्यपालांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई – 35.
2) मा. मुख्यमंन्र्याचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई – 32.
3) मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई – 32.
4) मा. विरोधीपक्ष नेता यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई – 32.
5) मा. मुख्य सचिव महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई – 32.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 515/2007.**

1) श्री प्रकाश मुकुंदराव पंत
रा. प्लॉट नं. 862, कुकडेवाडा, धन्वंतरी हॉस्पीटल समोर
खरे टाऊन, धरमपेठ नागपूर 440 010. ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) श्री एस. एच. डोंगरे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
महाव्यवस्थापक (नि.)
औष्णिक विद्युत केंद्र, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,
खापरखेडा ता. सावनेर जि. नागपूर.

2) श्री आत्माराम चौव्हान
जन माहिती अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता (नि.) प्रशासन,
औष्णिक विद्युत केंद्र, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,
खापरखेडा ता. सावनेर जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक 9/10/2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 27.6.2006 रोजी खालीलप्रमाणे 4 मुद्यांवर माहिती मागितली होती. 1) पत्र दि. 23.9.2004 वर अधिक्षक अभियंता (नि.) प्रशासन यांनी नोंदविलेल्या अभिप्रायाची सत्यप्रत व कार्यवाहीची माहिती द्यावी.

2) उपमुख्य अभियंता (नि.) पत्र क्र. 71 दि. 9.5.2005 अन्वये कोणत्या कामांची चौकशी केली. त्या कामांचे नावे व सविस्तर माहिती द्यावी.

3) उपमुख्य अभियंता (नि.) यांनी केलेल्या कामांच्या चौकशी अहवालाची सत्यप्रत पुरवावी.

4) ई–11 बिल्डींग जवळ (परिसरात) ट्रान्सफारमर व यार्ड नसतांना तेथे काम दर्शवून बिल दिले. दि. 10.1.2006 रोजी दक्षता विभागाने पंचनामा केला. कार्यालयातर्फे उपकार्य अभियंता (स्था) साक्षीदार हजर होते. यांच्या अहवालावर केलेल्या कार्यवाहीची माहिती व अभिप्राय अहवालाची सत्यप्रत द्यावी.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 29.6.2006 रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरच्या माहितीच्या अनुषंगाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 2.8.2006 रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी न घेता दि. 10.8.2006 रोजी अधिक्षक अभियंता यांना अपीलकर्ता यांचे प्रथम अपीलाच्या संदर्भात योग्य ती कार्यवाही करा अशा प्रकारचे पत्र दिलेले दिसून येते. सदरच्या पत्राच्या अनुषंगाने दि. 14.8.2006 रोजी माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांस मुद्या क्र. 3 च्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसते. त्यानंतर अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे सदरचे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये सुनावणी घेतांना त्यांनी असे सांगितले की त्यांना मुद्या क्र. 1 मधील अभिप्रायाची फक्त प्रत मिळाली नाही त्याचप्रमाणे 9.5.2005 अन्वये चौकशी केलेल्या कामाची नावे व उपमुख्य अभियंता यांचे चौकशी अहवालाची प्रत दिली नाही. त्याचप्रमाणे मुद्या क्र. 4 मधील चौकशी अहवाची

प्रत सुध्दा उपलब्ध करुन दिली नाही ती मिळावी. उत्तरवादी यांना आता विचारले असता त्यांनी असे सांगितले की तात्कालीन माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी यांना त्यावेळेस मागितलेली माहिती उपलब्ध कां करुन दिली नाही हे सांगता येणार नाही परंतु आता त्यांचेकडे अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहिती प्रमाणे माहिती आहे व ती माहिती त्यांना उपलब्ध करुन देता येईल. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की त्या माहितीचा त्यांना आता उपयोग नाही. त्यांचेवर चार्जशिट त्यावेळेस दाखल केली होती. परंतु आयोगाकडे दाखल केलेल्या अपील मेमोमध्ये माहिती उपलब्ध करुन द्यावी त्यापेक्षा त्यांची कोणतीही वेगळी मागणी नाही. त्यामुळे उत्तरवादी यांनी म्हटल्याप्रमाणे उपलब्ध असलेली माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी त्यांच्या दिनांक 27.6.2006 च्या अर्जात मुद्या क्र. 1, 2 व 3 आणि 4 यामध्ये मागितलेली माहिती हा निर्णय मिळाल्यापासून 5 दिवसात नोंदणीकृत टपालाद्वारे विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 15.10.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Dear

I received the copy of D.O.letter No.10.3.2007-CIC/ADMN, dated 12 th October, 2007 addressed to you by Smt. Rita Sinha, Secretary, Central Information Commission, New Delhi. The time for calling on Madam President is 5.15 p.m. for the members of the Central Information Commission and State Information Commission of all the States in India. It is expected that the registration numbers of vehicles that are going to be used by (provided by the Maharashtra Sadan) by SCIC and SICs for entry into Rashtrapati Bhawan may be communicated to Mr. Pankaj Pandey Shreyaskar at his e-mail address-pkp.shreyaskar@nic.in and the necessary formalities may be completed from the reception counter mentioned in paragraph 4 of the D.O. letter.

With regards and thanks.

Yours

( Vilas Patil )

To

Shri Apoorva Chandra
Resident Commissioner,
Govt of Maharashtra
New Delhi.

विषय :– मुख्य माहिती आयुक्त व माहिती आयुक्त यांची दिनांक 17 ऑक्टोबर 2007 ला दिल्ली येथे होणारी परिषद.

सदर परिषदेच्या संदर्भात दिनांक 9.10.2007 रोजी पोष्टाने सचिव, महाराष्ट्र राज्य आयोग यांचेकडून सचिव, केंद्रिय माहिती आयोग यांना पाठविलेल्या दिनांक 5.10.2007 च्या व राज्य माहिती आयोग कार्यालय नागपूर, अमरावती, औरंगाबात, नाशिक, पूणे यांना पाठविलेल्या दि. 5.10.2007 च्या पत्रांच्या प्रती मिळाल्या.

2. राष्ट्रीय स्तरावर कोणत्याही परिषदेचे चर्चा सत्र आयोजित करतांना कमीत कमी तिन महिने तरी त्याची तयारी सुरु असते. केंद्रिय सुचना आयोगाकडून आलेल्या सर्व कार्यक्रमाच्या संदर्भात कागदपत्रे पाहिली असता देशातील महाराष्ट्र सोडून सर्व राज्यातील माहिती आयोगाकडून निरनिराळया सुचना किंवा प्रश्न उपस्थित केल्याचे नमुद केले आहे. त्यावरुन अशा सुचना किंवा प्रश्न मागण्याचा पत्रव्यवहार हा ब–याच आधी केंद्रिय सुचना आयोगानी मागवलेल्या असाव्यात. त्यातही दि. 17.10.2007 रोजी केंद्रिय सुचना आयोगाचा जो कार्यक्रम करण्यात आलेला आहे त्या कार्यक्रमामध्ये दुपारच्या सत्रामध्ये डॉ. सुरेश जोशी मुख्य माहिती आयुक्त महाराष्ट्र व मि. विजय कुवळेकर माहिती आयुक्त पुणे यांचे पॅनलीस्ट म्हणून नाव दिलेले दिसून येते. याचा अर्थ केंद्रिय सुचना आयोगाकडून जो पत्रव्यवहार झालेला आहे तो पत्रव्यवहार हा ब–याच पूर्वी राज्य माहिती आयोगाकडे आलेला असल्याशिवाय पॅनलीस्ट म्हणून नावे पाठविलेली दिसून येत नाही. तसेच आयोगाची जुन 2007 पासून दर महिन्याला मुंबई येथे बैठक झालेली आहे त्याबाबतचा विषय किंवा माहिती ही आयोगाच्या बैठकीपुढे केंव्हाच मांडण्यात आला नाही किंवा त्याबाबतची पुसटशी कल्पनासुध्दा देण्यात आली नाही. मात्र डॉ. जोशी व श्री पुळेकर यांची नावे ज्याअर्थी पाठविण्यात आलेली आहे त्याअर्थी विलास पाटील व श्रीयुत व्ही. बी. बोरगे या दोन राज्य माहिती आयुक्तांपासून सदरची माहिती लपविलेली दिसून येते. राज्य माहिती आयुक्त म्हणून दि. 27.12.2006 पासून मी व श्रीयुत बोरगे हे अनुक्रमे नागपूर व औरंगाबाद येथे कार्यरत असून महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातून माहिती मागण्याचे अर्ज येतात त्यातून वेगवेगळे बरेच अनुभव येतात. व त्या अनुभवातून अधिनियमातील तरतुदींप्रमाणे निर्णय देतांना बरेचसे प्रश्न उपस्थित होतात.

याबद्यलचे आमचे अनुभव आम्ही सदरच्या परिषदेमध्ये इतर राज्याच्या माहिती आयुक्तांनी पाठविल्याप्रमाणे आम्हीही पाठविले असते. परंतु राज्य माहिती आयोगाने ही माहिती या दोन आयुक्तांपासून लपवून ठेवल्यामुळे आम्ही त्या संधीपासून या वर्षी तरी वंचित राहिलो आहोत.

3. जून किंवा जुलै महिन्यामध्ये पुणे येथे अशीच एक परिषद आयोजित करण्यात आली होती असे मध्यप्रदेशचे मुख्य माहिती आयुक्त भोपाळ येथे परत जातांना त्यांनी नागपूर येथील कार्यालयाचे कामकाजाची माहिती करुन घेण्याकरीता भेट दिली होती व त्याच वेळेस त्यांनी तुम्ही काल पुणे येथील परिषदेला कसे नव्हता असे विचारले होते. परंतु मुख्य माहिती आयुक्त डॉ. जोशी व श्री विजय कुवळेकर हे हजर होते ही माहिती त्यांनीच दिली. परंतु मुख्य माहिती आयुक्त म्हणून डॉ. जोशी यांनी केव्हाही सदरच्या परिषदेबद्यल काहीही आज पर्यंत श्री बोरगे व मला पुसटशी कल्पना सुध्दा मला दिली नाही. दिल्ली येथील परिषदेला डॉ. जोशी व श्रीयुत कुवळेकर, पुणे येथील परिषदेला डॉ. जोशी व श्रीयुत पुळेकर हयांची नावे होती परंतु श्रीयुत बोरगे व श्रीयुत पाटील हयांना पुसटशी कल्पना सुध्दा दिली जात नाही. यावरुन महाराष्ट्र राज्य माहिती आयोगामध्ये कशा प्रकारची पारदर्शकता कशाच्या आधारावर भेदभाव केला जातो आहे हे दिसून येते.

4. न्युझिलंड येथे सुध्दा दि. 26 ते 29 नोव्हेबर 2007 रोजी जी आंतराष्ट्रीय परिषद आहे त्या परिषदेच्या बाबत सुध्दा महा. राज्य माहिती आयोगाचे कार्यालयाने कोणत्याही प्रकारची कल्पना ही राज्य माहिती आयोगाच्या दर महिन्याला होणा–या बैठकीत केव्हाही दिली नाही. मात्र डॉ. सुरेश जोशी यांनी दि. 1.6.2007 रोजी सामान्य प्रशासन विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडे अर्ध शासकीय पत्र सदरच्या परिषदेला उपस्थित राहण्याच्या परवानगी करीता लिहीलेले दिसून येते. याचा अर्थ डॉ. जोशी यांना या कॉन्फरन्सची माहिती आधीच मिळाली असून सुध्दा त्यांनी सदरची माहिती ही आयोगाच्या सदस्यांपासून लपवून ठेवलेली दिसते. सामान्य प्रशासन विभागाने शासन आदेश क्र.

एसआयसी–2007/सीआर 51/05 मंत्रालय, मुंबई दि. 24 सप्टेंबर 2007 प्रमाणे ही परवानगी दिलेली दिसून येते.

5. मी व श्रीयुत बोरगे यांनी आयोगाचे सदस्य म्हणून नियुक्ती झाल्या नंतर आयोगाचे कामकाजामध्ये कशा प्रकारे सुधारणा करण्याची गरज आहे याबद्यलचे वेळोवेळी जानेवारी 2007 पासून ते सप्टेंबर 2007 पर्यंत अनेक पत्रे लिहून व आयोगाच्या बैठकीत सुचना मांडलेल्या आहेत. अपील कार्यपध्दतीचे नियम, आयोगाच्या कामकाज पध्दतीचे नियम करण्याकरीता मसुदे सुध्दा तयार करुन दिलेले होते. परंतु मुंबई कार्यालयानी याबाबत कोणत्याही प्रकारची प्रगती अद्याप पर्यंत केलेली दिसून येत नाही. आयोगाचे मुंबई येथील कार्यालय स्वतःहून कार्यपध्दतीत सुधारणा करण्याकरीता प्रयत्न करीत आहे असे दिसून येत नाही. व तशाप्रकारची गरज आहे अशी आकलनशक्ती दिसून येत नाही. तसेच अपील, तक्रारीवर निर्णय देतांना जे प्रश्न उपस्थित होतात त्याबद्यलही कोणतीही चर्चा किंवा विचारांचे आदानप्रदान हे आयोगाच्या बैठकीत किंवा अन्यथा होतांना दिसत नाही. आयोगाच्या कामकाज प्रशासनिक असो किंवा वैधानिक, कामकाजाच्या संदर्भात, अर्धन्यायिक कामकाजाच्या संदर्भात प्रत्येक मुद्या हा आयोगाच्या बैठकीत एकमताने किंवा बहुमताने मान्यता घेवूनच अंमलबजावणी करता येते. त्याकरीता मी T. N. Sheshan V/s Union of India (1995 Vol.(4) Sec. 611, Dhanoa V/s Union of India (AIR 991 SC 1745) व Subramniyam Swamy's Case मधील तेही मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावरुन वेळोवेळी दाखवून दिले असतांना सुध्दा त्याबाबतची दखल वरील उदाहरणांवरुन घेतली जात नाही असे दिसून येते व अधिनियमाच्या कलम 15 (2) कडे सोयीस्कर दुर्लक्ष केले जाते. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 हा मुळात प्रशासनामध्ये पारदर्शकता आणण्याच्या दृष्टीने संसदेत पारीत केलेला अधिनियम आहे. व त्याची अंमलबजावणी योग्य रितीने होते आहे किंवा नाही याबाबतची जबाबदारी ही प्रामुख्याने राज्य माहिती आयोगावर

टाकली असतांना राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयात पारदर्शकता नसेल तर राज्य माहिती आयोग हे केंद्रिय सुचना आयोगाच्या सचिव श्रीमती रिटा सिन्हा यांनी श्रीयुत अपूर्वचंद्र निवासी आयुक्त महा. शासन नवी दिल्ली यांना दि. 28.9.2007 च्या पत्रावरुन दिसून येते. यापुढे तरी राज्य माहिती आयोगात वरीलप्रमाणे भेदभाव होणार नाही अशी अपेक्षा करणे वावगे ठरणार नाही.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 519/2007.**

श्री निळकंठ जयराम कुंभरे
रा. सावरटोला (बोरटोला)
ता. अर्जुनी (मोर.) जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यपालन अधिकारी,
जिल्हा परिषद गोंदिया

2) जन माहिती अधिकारी तथा
शासकीय माहिती अधिकारी मुख्य कार्यपालन अधिकारी,
जिल्हा परिषद गोंदिया ..... **उत्तरवादी**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक 21/10/2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व अधिक्षक ग्रामपंचायत विभाग जिल्हा परिषद गोंदिया हे हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 7.3.2006 रोजी शासकीय माहिती अधिकारी म्हणून मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद गोंदिया यांचेकडे ग्रामपंचायत सावरटोलाकडे दि. 10.10.2005, दि. 24.10.2005, दि. 20.11.2005 आणि दि. 29.11.2005 ला सादर केलेल्या अर्जावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही केली नाही म्हणून कलम 39 अन्वये सरपंच ग्रामपंचायत सावरटोला यांचेवर मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 39 नुसार कारवाई करावी व त्याबद्यल काय झाले अशाप्रकारची माहिती त्यांनी विचारली होती. सदरची

माहिती त्यांना विहीत मुदतीत उपलब्ध न झाल्यामुळे त्यांनी दि. 29.8.2006 रोजी पुन्हा प्रथम अपीलीय अधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालय जिल्हा परिषद गोंदियाकडे प्रथम अपील दाखल केले होते. सदर प्रथम अपीलाची सुनावणी सुध्दा विहीत मुदतीत न झाल्यामुळे त्यांनी सदरचे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात सदरची माहिती ही ग्रामपंचायत सावरटोला यांचेकडे केलेल्या अर्जाच्या संदर्भात असल्यामुळे दि. 15.5.2006 रोजी खंड विकास अधिकारी यांनी अर्जदारस माहिती देण्याच्या अनुषंगाने दि. 19.5.2006 ला कळविण्यात आले आहे असे दिसून येते. त्यानंतर 29.8.2006 च्या अपील अर्जान्वये दि. 20.9.2006 ला अपीलकर्ता यास उपस्थित राहण्यास कळविण्यात आलेले दिसून येते. माहिती विलंबाने देण्याचे कारण अर्जदाराने त्यांचे दि. 7.3.2006 चे अर्ज सादर करुन मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 चे कलम 39 नुसार सावरटोला येथील सरपंच आदींना अपात्र घोषीत करण्याच्या संबंधाने गैरअर्जदारावर कोणती कार्यवाही केली व कशी केली व नाही केली तर का नाही केली याची लेखी माहिती मिळावी असा अर्ज सादर केला होता. सदर संदर्भाने झालेली कारवाई हया कार्यालयात उपलब्ध नव्हती. त्यामुळे खंड विकास अधिकारी पंचायत समिती अर्जुनी मोरगाव यांचेकडून सदर प्रकरणा संबंधीत आणि अर्जदाराच्या अर्जाच्या माहितीच्या अनुषंगाने चौकशी अहवाल मागविण्यात आला. दि. 29.8.2006 च्या प्रथम अपील अर्जाच्या चौकशीस दि. 20.9.2006 ला पत्र देवून जिल्हा परिषदेच्या कार्यालयात सुनावणीसाठी उपस्थित राहण्यास कळविण्यात आले होते. परंतु अर्जदार हे अनुपस्थित होते. मात्र दिनांक

10.10.2006 नुसार दि. 11.10.2006 ला माहिती पुरविण्यात आलेली आहे असा खुलासा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद गोंदिया यांचेकडून करण्यात आलेला दिसून येतो. सदरच्या अर्जाच्या संदर्भाने दि. 15.5.2006 रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा

परिषद गोंदिया यांनी खंड विकास अधिकारी पंचायत समिती अर्जुनी मोरगाव यांना ग्राम पंचायत सरपंचाच्या विरुध्द तात्काळ चौकशी करुन चौकशी अहवाल उलट टपाली सादर करावे म्हणून पत्र लिहिलेले दिसून येते.

3. थोडक्यात अपीलकर्ता यांनी अर्जात संदर्भाधीन अर्ज हे ग्रामपंचायत सावरटोलाकडे केले होते. त्यावर कार्यवाही ही ग्रामपंचायतीने करावयाची होती त्या अर्जावर काय कार्यवाही केली ही माहिती त्यांना माहिती अधिकारी ग्रामसेवक ग्रामपंचायत सावरटोला यांचेकडून विहीत मुदतीत मिळू शकली असती परंतु अर्जदार यांनी ग्रामपंचायत स्तरावर माहिती न मागता ती मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद गोंदिया यांचेकडे मागितली. जिल्हा परिषद किंवा पंचायत समिती अर्जुनी मोरगाव यांचेकडे कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध नसल्यामुळे त्यांना ती सावरटोला ग्रामपंचायतीकडे मागावी लागली असे दिसते. त्यातही दि. 10.10.2006 रोजी उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अर्जदारास कळविल्या वरुन असे दिसते की अर्जदार दि. 10. 10.2005, दि. 24.10.2005, दि. 20.11.2005 आणि दि. 29.11.2005 ला सादर करुन श्री शिवदास जैराम कुंभरे या नावात बदल करुन श्री शिवदास शिवराम बारापात्रे असे करावे अशी मागणी ग्रामपंचायत सावरटोला यांचेकडे केली. खंड विकास अधिकारी अर्जुनी मोरगाव यांच्या चौकशी अहवालावरुन असे निदर्शनास येते की, श्री शिवदास जैराम कुंभरे यांचे मुळनाव शिवदास शिवराम बारापात्रे असे असल्याचे तक्रारकर्त्याचे म्हणणे आहे. हे नाव बदलविण्याबाबत तक्रारकर्त्यांनी अर्ज केले. परंतु ग्रामपंचायत सावरटोलाने कोणतीही कार्यवाही केली नाही. म्हणून सरपंच व इतर सदस्यांना अपात्र ठरविण्यात यावे अशी तक्रारकर्त्याची मागणी होती. ग्रामपंचायत रेकॉर्ड वर शिवदास जैराम कुंभरे हे नाव आहे. ग्रामपंचायतीला कोणाच्याही नावात बदल करण्याचे कोणतेही अधिकार नाहीत. असे सदर अहवालात म्हटले आहे. सरपंचाने आपल्या कर्तव्यात कसुर केल्याचे आढळुन न आल्याने सदर सरपंचावर कार्यवाही करता येत नाही. त्यामुळे सदर तक्रार नस्तीबध्द करण्यात आली आहे असे अपीलकर्त्यास कळविलेले दिसून येते. यावरुन अपीलकर्त्यास त्यांनी मागितलेल्या माहिती प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. विलंबाने माहिती

उपलब्ध करुन दिली याचे कारण अर्जदाराने ज्या स्तरावर माहिती आहे त्या स्तरावर अर्ज न करता थेट जिल्हा परिषदेकडे अर्ज केल्यामुळे व त्या कार्यालयामध्ये अर्जदाराने केलेल्या अर्जाच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची माहिती नसल्याने माहिती अधिकारी जिल्हा परिषद यांना तिन स्तरावर पत्रव्यवहार करावा लागला. व त्यामुळे विलंबा झालेला आहे तो समर्थनीय दिसत आहे. त्यामुळे शास्ती लादण्यास कोणत्याही प्रकारचे कारण दिसत नाही. अर्जदाराने ज्या स्तरावर माहिती उपलब्ध आहे त्या स्तरावर माहितीचा अर्ज केला असता तर त्यांना विहीत मुदतीत माहिती मिळाली असती. त्यामुळे माहिती विलंबाने मिळण्यास अर्जदार स्वतः जबाबदार आहे. त्यामुळे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अर्जाप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे निकाली काढण्यात येत आहे.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दिनांक 15.10.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 522/2007.**

श्री पांडुरंग महादेव डेकाटे
कार्यालय राष्ट्रीय हत्तीरोग नियंत्रण पथक
धानोरा ता. धानोरी जि. गडचिरोली ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसंचालक,
आरोग्य सेवा नागपूर मंडळ, नागपूर
माताकचेरी परिसर, श्रध्दानंदपेठ नागपूर.

2) जन माहिती अधिकारी तथा
वैद्यकीय अधिक्षक,
प्रादेशिक मनोरुग्णालय मानकापूर
कोराडी रोड, नागपूर ..... **उत्तरवादी**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 13/12/2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 8.3.2006 रोजी माहिती अधिकारी म्हणून वैद्यकीय अधिक्षक मनोरुग्णालय मानकापूर यांचेकडे पगारी रजा करण्यासाठी दोन हजाराची लाच मागितल्याचे खोटे व बनावट वृत्तांत वर्तमानपत्रातून प्रकाशित करुन चारिन्र्यहनन करणे

व त्यांचे मानवी हक्क व हितसंबंध गमावण्याचे प्रकरणी श्री प्रकाश देशभ्रतार वाहन चालक यांनी दि. 28.8.2006 रोजी देशान्नती वर्तमानपत्रात पगारी रजा करण्यासाठी दोन हजाराची लाच मागितल्या प्रकरणी छापलेल्या वृत्तांता संबंधीत अनुसुची नुसार माहिती मागितली होती. माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 16.10.2006 रोजी अपीलकर्ता यांना श्री प्र. वि. देशभ्रतार वाहन चालक यांनी पाठविलेले माहितीचे उत्तर माहिती अधिकारी यांनी कळविलेले दिसते. सदरच्या निर्णयाने व्यथित होवून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दि. 17.10.2006 रोजी दाखल केलेले दिसून येत आहे. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भात दि. 3.11.2006 रोजी उत्तर दिलेले दिसून येते. सदरच्या दि. 3.11.2006 च्या उत्तराने समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांनी वर नमुद केल्याप्रमाणे जी माहिती मागितली आहे ती प्रादेशिक मनोरुग्णालय मानकापूर या सार्वजनिक प्राधिकरणाशी किंवा त्या सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामकाजाशी संबंधित माहिती नाही व प्रकाश देशभ्रतार हे सुध्दा त्याच कार्यालयात पूर्वी वाहन चालक म्हणून सेवेत होते. प्रकाश देशभ्रतार हे सुटीवर गेल्यामुळे अपीलकर्ता हे वरिष्ठ लिपीक असल्यामुळे त्यांचे रजेच्या संदर्भातील प्रकरणे अपीलकर्ता यांचेकडे होते. त्यानंतर दि. 28.8.2006 रोजी दैनिक देशोन्नतीमध्ये धानोरा हत्तीरोग विभागातील वाहन चालकाच्या पगारात कपात याप्रमाणे दैनिक देशोन्नतीमध्ये बातमी देवून त्यामध्ये बिनपगारी रजा मंजुर करण्यात आल्यामुळे वरिष्ठ लिपीक पी. एम. डेकाटे यांचेकडे विचारणा केली असता डेकाटे यांनी पगारी रजा करण्यासाठी दोन हजाराची लाच मागितली असे वृत्त प्रसिध्द झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रकाश देशभ्रतार हे प्रादेशिक मनोरुग्णलय येथे त्यांची बदली झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी माहिती अधिकारी म्हणून वैद्यकीय अधिक्षक प्रादेशिक मनोरुग्णालय यांचेकडे माहिती मागितलेली दिसून येते. वास्तविक अपीलकर्ता व प्रकाश देशभ्रतार हे कार्यालय हत्तरोग अधिकारी राष्ट्रिय हत्तीरोग नियंत्रण पथम धानोरा येथे कार्यरत असतांना घडलेली घटना आहे. त्यामुळे

रजेच्या संदर्भात माहिती त्यांनी माहिती अधिकारी तथा हत्तीरोग अधिकारी यांचेकडे मागावयास पाहिजे होती परंतु तसे न करता वृत्तपत्राचे बातमीवरुन ज्या वैद्यकीय अधिक्षक प्रादेशिक मनोरुग्णालय यांचा काहीही संबंध नसतांना व कोणत्याही प्रकारची कार्यालयीन माहिती नसतांना माहिती मागितली व त्यामुळे वैद्यकीय अधिक्षक प्रादेशिक मनोरुग्णालय यांनी अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात प्रकाश देशभ्रतार यांना खुलासा मागितला व तीच खुलाशाची प्रत ही अपीलकर्ता यास उपलब्ध करुन दिलेली दिसते. एकुणच या प्रकरणावरुन मागितलेली माहिती ही दोनही सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामकाजाशी संबंधित नाही. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 2 (च) ''माहिती'' व ''माहितीचा अधिकार'' ''सार्वजनिक प्राधिकरण'' ''अभिलेखे'' या संज्ञांच्या व्याख्येमध्ये येत नाही. कोणत्याही वृत्तपत्रात आलेल्या बातमीच्या विषयी सार्वजनिक प्राधिकरणाच्या माहिती अधिकारी यांचा काहीही संबंध नसतांना माहिती मागणे हा अधिनियमाच्या तरतुदींचा गैरवापर आहे. वास्तविक वैद्यकीय अधिक्षक प्रादेशिक मनोरुग्णालय यांना त्याच वेळेस मागितलेली माहिती ही अधिनियमाच्या तरतुदींप्रमाणे नाही असे उत्तर द्यावयास पाहिजे होते. अपीलकर्ता हे वरिष्ठ लिपीक आहेत त्यांना सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामकाजाची संपूर्ण माहिती आहे व त्यामुळेच त्यांनी मागितलेल्या माहितीच्या स्वरुपावरुन त्यांनी कारण नसतांना शासकीय कार्यालयांना माहितीच्या अधिकाराच्या अधिनियमाप्रमाणे वेठीस धरुन माहिती मागण्याचा प्रयत्न केला. प्रमोद देशभ्रतार यांनी जे उत्तर दिलेले आहे त्यावरुन अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही असे त्यांचे म्हणणे आहे. अपीलकर्ता यांना हयाबाबत कोणत्या माहितीची अपेक्षा आहे हे सांगणे कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणास शक्य नाही. प्रथम अपीलातसुध्दा अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या स्वरुपावरुन ती माहिती नाकारावयास पाहिजे होती. परंतु त्यांनी सुध्दा माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने कार्यवाही केलेली दिसून येते. यावरुन सार्वजनिक प्राधिकरणाच्या अधिकारी व कर्मचारी यांना माहितीचा

अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदींच्या संदर्भात प्रशिक्षण मिळणे आवश्यक आहे. व त्याबाबत आरोग्य संचालनालयातील वरिष्ठ अधिकरी यांनी दखल घेवून सदरच्या अधिनियमाच्या तरतुदींबाबत प्रशिक्षण देणे संयुक्तिक राहिल.

4. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही जरी अधिनियमाच्या तरतुदींप्रमाणे नाही तरी सुध्दा त्यांना उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे त्यांना माहिती मिळालेली आहे व म्हणून त्यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 16.10.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 524/2007.**

श्री भानुदास सुर्यभार उंबरकार

मु. पो. बेलखेड ता. तेल्हारा जि. अकोला ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद अकोला ता. जि. आकोला.

2) जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक/प्राचार्य,
नूतन विद्यालय बेलखेड,
ता. तेल्हारा जि. अकोला ..... **उत्तरवादी**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 29/6/2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. प्रथम अपीलीय अधिकारी व अपीलकर्ता हे हजर आहेत. आयोगाच्या कार्यालयाने दिनांक 25.9.2007 रोजी नोटिस काढलेली आहे. सदरची नोटिस ज्याअर्थी अपीलकर्ता व प्रथम अपीलीय अधिकारी यांना मिळाली व ते हजर झालेत त्याअर्थी मुख्याध्याप्रक नुतन विद्यालय बेलखेड यांना सुध्दा मिळाली असेल असे गृहीत धरण्यास हरकत नाही.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 15.4.2006 रोजी 1) नुतन विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय यांच्या अंकेक्षण अहवालाची सत्यप्रत सन 1998 ते 2006 2) नुतन विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाची (Assessment) मुल्य निर्धारण मिळण्याबाबत मुल्य निर्धारण केव्हा केले त्याचे स्पष्टीकरण. 3) उच्च माध्यमिकच्या अंकेक्षण अहवालाची सत्यप्रत
4) प्रत्येक वर्षीचे कॅशबुकच्या सत्यप्रती सन 1998 पासून आजपर्यंत अशी माहिती मागितली होती.

3. सदरच्या अर्जाच्या संदर्भात अपीलकर्ता यांना विहीत मुदतीत कोणतीही माहिती उपलब्ध करुन न दिल्यामुळे त्यांनी दि. 15.5.2006 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले होते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक 22.5.2006 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.) यांनी मुख्याध्यापक नुतन विद्यालय यांना 7 दिवसाचे आत अर्जदार यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन द्यावी असे पत्र दिलेले दिसून येते. सदरच्या पत्राची प्रतिलिपी ही अपीलकर्ता अर्जदार यांना दिलेली आहे. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी दि. 25.5.2006 ला सकाळी 8.45 वाजता मुख्याध्यापकाची भेट घेतली असे सदरच्या पत्रावरील नोंदी वरुन दिसून येते. परंतु तरीसुध्दा माहिती मिळाली नाही असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. मुख्याध्यापक दि. 25.5.2006 रोजी श्री एस. एस. सदाफळे होते असे अपीलकर्ता यांनी सांगितले. प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.) यांनी आयोगाच्या कार्यालयात खुलासा करतांना मुख्याध्याप्रक नुतन विद्यालय बेलखेड यांचेशी वेळोवेळी व दि. 11.10.2007 रोजी या कार्यालयाच्या क्षेत्रीय अधिका–यानी विद्यालयाला भेट दिली असता मुख्याध्याप्रक नुतन विद्यालय बेलखेड यांनी या कार्यालयाने दिलेल्या निर्णया प्रमाणे संबंधित अर्जदारास माहिती पुरविल्याचे चर्चेमध्ये सांगितले. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना ती माहिती मिळाली नाही. अपीलकर्ता यांना माहिती

मिळाली नाही म्हणून ते उपोषणास बसणार होते असे त्यांनी जाहीर केल्यामुळे दिनांक 27.7.2007 रोजी उपोषणापासून परावृत्त व्हावे म्हणून शिक्षणाधिकारी (माध्य.) यांनी व दि. 28.7.2007 रोजी मुख्याध्याप्रक नुतन विद्यालय बेलखेड यांनी अपीलकर्ता यांना नियोजित उपोषणापासून परावृत्त व्हावे करीता पत्रे लिहिलेले आढळून येतात. परंतु तरीही दि. 15.4.2006 च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नाही.

4. वरील वस्तुस्थितीवरुन असे दिसून येते की अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक 15.4.2006 च्या अर्जाप्रमाणे माहिती न मिळाल्यामुळे उपोषणाची नोटिस दिली होती व त्या उपोषणाच्या नोटिसीच्या संदर्भात प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सदरच्या संस्थेच्या व शाळेच्या संबंधात दि. 11.10.2007 रोजी चौकशी केलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांना मात्र कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झाली नाही ही वस्तुस्थिती कायम राहाते व त्यामुळे माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात व माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) प्रमाणे ते शास्तीस पात्र आहेत असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. परंतु अपीलकर्ता यांनी ज्यावेळेस माहिती मिळण्याचा अर्ज केला होता ती माहिती त्यांना 30 दिवसात उपलब्ध करुन द्यावयास पाहिजे होती परंतु ती न मिळाल्यामुळे तात्कालीन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात असे दिसते. तरीसुध्दा शिक्षणाधिकारी (माध्य.) यांनी पुन्हा माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात कोणते मुख्याध्यापक हे दोषी आहेत हे निश्चित ठरवून त्यांना या निर्णयाप्रमाणे जी शास्ती लादण्यात येत आहे ती त्यांच्या दरमहिन्याच्या वेतनातून किंवा निवृत्ती वेतनातून वसूल करणे संयुक्ति राहिल.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक 15.4.2006 च्या अनुषंगाने त्यांना माहिती ही विहीत मुदतीत उपलब्ध करुन

दिलेली नसल्यामुळे जे माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक दोषी असतील त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन त्यांच्या दरमहा वेतनातून किंवा निवृत्ती वेतनातून सदरची शास्तीची रक्कम रु. 500/- ही वसूल करावी व तसा अहवाल आयोगास सादर करावा.

2) सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यास व्यवस्थापकीय मंडळाने जर माहिती अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन देवू नये अशा प्रकारचा दबाव आणला असेल तर सदरच्या संस्थेच्या विरुध्द कारवाई करुन वेतनोत्तर अनुदान हे थांबविण्यात यावे व तशाप्रकारची शिफारस ही शासनाकडे करावी किंवा सदरच्या संस्थेवर प्रशासक नियुक्तीची शिफारस करण्यात यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

आताच सदरचा निर्णय सांगून झाल्याच्या बरोबर माहिती अधिकारी हे त्यांची गाडी उशिरा पोहोचल्यामुळे ते वेळेवर येवू शकले नाही परंतु आता आल्याच्या नंतर त्यांनी अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात कशा प्रकारे माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केलेला आहे त्याबद्यलचे कागदोपत्री पुरावा सादर केला आहे. तात्कालीन मुख्याध्यापक यांनी सदरच्या माहितीच्या बद्यल दि. 18.4.2006 रोजी व्यवस्थापक शिक्षण प्रसारक मंडळ बेलखेडा यांना अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात दि. 18.4.2006 रोजी पत्र लिहिलेले दिसून येते. सदरच्या प्रत्राप्रमाणे श्री उंबरकर यांनी मागितलेली माहिती ही त्यांना तात्काळ पुरवावी परंतु यातील शाळा व महाविद्यालयाच्या अंकेक्षणाबद्यल, मुल्यनिर्धारणाबद्यल तसेच कॅशबुक बद्यल त्यांना तूर्त माहिती देवू नये कारण याबद्यलचा खुलासा मी स्वतः पत्राद्वारे कळवीन असे दि. 19.4.2006 रोजी अध्यक्ष पी. बी. उंबरकर यांनी मुख्याध्यापक नूतन विद्यालय बेलखेड यांना कळविलेले दिसून येते. दि. 20.4.2006 रोजी तात्कालीन

मुख्याध्यापक सदाफळे यांनी मा. शिक्षणाधिकारी (माध्य.) यांना दिलेल्या पत्रावरुन असे दिसून येते की दि. 22.3.2006 नुसार श्रीयुत भा. सु. उंबरकर माजी शिक्षक मु. पो. बेलखेड ता. तुल्हारा यांना आवश्यक ती माहिती पुरविली आहें तरीसुध्दा त्यांनी दिनांक 15.4.2006 ला पुन्हा रजिष्टर करुन हीच माहिती व नविन माहिती मागविली आहे. श्रीयुत भा. सु. उंबरकर हे वारंवार माहिती मागत आहे त्यांच्या या वागणूकीमुळे शाळेच्या दैनंदिन कामकाजात अडथळा येत आहे. त्याचप्रमाणे लोकमत व देशोन्नतीमध्ये सुध्दा त्याबद्यल माहिती देत आहे. माझी मुख्याध्यापक म्हणून नेमणूक 1 मार्च 2006 पासून झाली आहे. मुख्याध्यापक या पदावर नवीन असल्यामुळे श्रीयुत उंबरकर यांचेकडून मला मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. माझे मानसिक स्वास्थ बिघडण्याची शक्यता आहे. तरी यावर मार्ग काढून सहानुभूती पूर्वक विचार करावा ही विनंती. श्री वा. सु. उंबरकर यांना आतापर्यंत पुरविलेल्या माहितीचा कोणताही खर्च त्यांनी दिलेला नाही. पुन्हा दि. 2.5.2006 रोजी तात्कालीन मुख्याध्यापक यांनी अपीलकर्ता यांना पत्र लिहिलेले दिसून येते. पुन्हा दि. 3.5.3006 रोजी, 27.5.2006 रोजी, 30.5.2006 रोजी पत्र लिहिलेले दिसून येत आहे. यावरुन अपीलकर्ता हे वारंवार माहिती मागत आहे व तात्कालीन मुख्याध्यापक व विद्यमान मुख्याध्यापक यांचे म्हणणे असे आहे की त्यांना आम्ही वेळोवेळी माहिती उपलब्ध करुन दिली आहे. एकमात्र नक्की दिसून येते की तात्कालीन मुख्याध्यापक यांनी संस्थेच्या व्यवस्थापनाला दि. 15.4.2006 च्या अर्जाच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन देण्याबद्यल अवगत केले होते व त्यांनीच माहिती उपलब्ध करुन देण्याबद्यल नंतर पत्राने कळवून असे सांगितले होते त्यामुळे तात्कालीन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येत नाही असे दिसते. अपीलकर्त्यानी सुध्दा वेळोवेळी जो पत्रव्यवहार माहिती अधिकारी यांना केलेला दिसून येतो तो अपील सुनावणीच्या वेळेस दाखल केला नाही किंवा सांगितले नाही व माहिती मिळाली नाही असेच त्यांनी आतापर्यंत सांगितले. त्यामुळे सदरच्या प्रकरणी वरील दिलेला निर्णय हा स्थगीत करण्यात येवून विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी सदरच्या अपीलकर्ता यांच्या अर्जाच्या

संदर्भात स्वतंत्रपणे चौकशी अधिकारी नियुक्त करुन संपूर्ण प्रकरणाचा दि. 15.4.2006 च्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता, तात्कालीन माहिती अधिकारी व विद्यमान माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक व संस्थेचे अध्यक्ष व व्यवस्थापक यांचा प्रत्यक्ष रेकॉर्ड बोलावून चौकशी करावी व त्यातून सत्य बाहेर काढून तसा अहवाल हा निर्णय मिळाल्यापासून 1 महिन्याचे आंत आयोगास सादर करावा. सदरच्या निर्णयाची एक प्रत ही विभागीय शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग, अमरावती पुढील कार्यवाहीस पाठविण्यात यावी.

नागपूर

दिनांक 16.10.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 525/2007.**

श्री अरुण देवनारायण तिवारी

सहारा चौकाजवळ, चापमनवाडी,

यवतमाळ, ता. जि. यवतमाळ 445001 ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा

अधिक्षक,

भूमी अभिलेख यवतमाळ

2) जन माहिती अधिकारी तथा

तालुका निरीक्षक

भूमी अभिलेख यवतमाळ ..... **उत्तरवादी**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 23/6/2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. अपीलकर्ता यांनी गैरहजर राहण्याची अनुमती घेतली नाही किंवा पुढील तारीख देण्याची विनंती केलेली नाही. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 20.4.2006 रोजी कार्यालयात प्राप्त 26.4.2006 नझुल शिट नं. 50 डी अंतर्गत 1) भुखंड 118 चा मुळ नकाशा प्रमाणे (ले आऊट) जाण्या येण्याचा मार्ग कोणत्या दिशेला आहे/होता नंतर कोणाच्या आदेशाने बदलला. 2) भुखंड 116 ची हद्द जेथे संपते तेथुन भुखंड 118 किती फूट अंतरावर सुरु होतो. 3) भुखंड

118 च्या पश्चिम दिशेला असणारा रस्ता किती फूट रुंदीचा आहे व माहिती व्यक्तीशः घेणार असे नमुद केले. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 29.4.2006 रोजी माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांनी अर्जातील माहिती क्र. 1 या कार्यालयाशी संबंधित नाही तरी नगर पालिका कार्यालयामधून सदरची माहिती प्राप्त करुन घ्यावी. माहिती क्र. 2 व 3 बाबत आपण या कार्यालयात रितसर मुद्ये सादर करुन नियमानुसार मोजणी फीचा भरणा करावा. मोजणी झाल्यावर आपणास मापे कळविण्यात येईल.सदरच्या माहितीमुळे व्यथीत होवून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील हे उपसंचालक भूमी अभिलेख अमरावती यांचेकडे दाखल केलेले दिसून येते त्याबाबत तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांचेकडून अधिक्षक भूमी अभिलेख यवतमाळ हे प्रथम अपीलीय अधिकारी असल्याने तुमच्याकडे रितसर अपील दाखल करावी असे दि. 19.5.2006 रोजी कळविण्यात आल्याचे दिसते व त्यावरुन अपीलकर्ता यांनी प्रथम अपील हे दि.13.6.2006 रोजी दाखल केल्याचे दिसून येत आहे. सदरच्या अपीलाची सुनावणी दि. 29.6.2006 रोजी घेण्यात येवून अपीलकर्ता यांना माहिती पुरविण्यात आली प्रकरण निकाली काढण्यात यावे असा निर्णय अधिक्षक यांनी दिली व तो नोटशिटवर अपीलकर्ता यांची सही आहे. सदरचा आदेश दि. 30.6.2006 रोजी निर्गमीत केल्याचे दिसून येते व तसे अधीक्षक भूमी अभिलेख यांचे म्हणणे आहे. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय 29.6.2006 रोजी झाल्यापूर्वीच दि. 23.6.2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले होते. परंतु दि. 29.6.2006 रोजी अपीलकर्ता हे प्रथम अपीलाच्या सुनावणीस स्वतः हजर होते. त्यांनी झालेल्या निर्णयावर सही करुन दिलेली असल्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध झाली आहे असा निष्कर्ष काढण्यास हरकत नाही व त्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली आहे असे दिसून येत असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 16.10.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 533/2007.**

श्री राजू धनराज गिरसावळे
गाडीखाना, राष्ट्रीय विद्यालय मागे
खिरोलाल वाडी नागपूर – 440002 ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसंचालक,
भूमी अभिलेख नागपूर प्रदेश नागपूर

2) जन माहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
उपसंचालक भूमी अभिलेख नागपूर प्रदेश नागपूर ..... **उत्तरवादी**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक 10/10/2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचा माहिती अधिकारी यांच्या माध्यमातूनच खुलासा दाखल करण्यात आला आहे.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 2.9.2006 रोजी अ) लेखी परिक्षेची स्वतःची उत्तरपत्रिकेची झेरॉक्स प्रत, तपासून मिळालेल्या गुणासहित. ब) लेखी परिक्षेतील निवड

यादीतील प्रथम मेरिटचे गुण आणि शेवट मेरिटचे गुण कळविण्याबाबत. शिपायाच्या लेखी परिक्षेत मला माझ्या अपेक्षेप्रमाणे किती गुण मिळाले याबाबत माहिती. परिक्षा बैठक क्रमांक 1042019 माहिती स्वतः घेवून जाईल. ए.पी.एल.(केसरी कार्ड). सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 14.9.2006 रोजी माहिती अधिकारी यांनी विभागातील वर्ग 4 शिपाई पदाच्या भरतीची प्रक्रिया प्रगतीत आहे त्यामुळे आपण मागणी केलेली माहिती देता येणार नाही. आवश्यक असल्यास फेरतपासणीसाठी आपण मा. जमाबंदी आयुक्त व संचालक भूमी अभिलेख (म. रा.) पुणे यांचेकडे अर्ज करावा असे कळविले होते. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी कक्ष अधिकारी, महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरचे प्रथम अपील हे उपसंचालक, भूमी अभिलेख, नागपूर या कार्यालयाकडे दि. 17.11.2006 रोजी हस्तांतरीत केल्यानंतर दि. 21.1.2007, दि. 13.2.2007, दि. 28.2.2007 व दि. 13.3.2007 या तारखेला सुनावणी घेण्यात आली होती. अपीलकर्ता हे सतत गैरहजर राहिल्यामुळे सदरचे अपील दि. 13.3.2007 रोजी निकाली काढण्यात आले. आज द्वितीय अपीलाच्या सुनावणीस सुध्दा अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. परंतु देवराव धनराज गिरसावळे हे अपीलकर्ता यांचे भाऊ असून ते स्वतः सुध्दा सदरच्या परिक्षेस बसले होते व त्यांनीसुध्दा दि. 21.8.2006 रोजी तीच माहिती मागितली होती. ती त्यांना रु. 30 शुल्क भरुन पुरविण्यात आली आहे असे दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येते. यावरुन एकच माहिती दोघा भावांनी मागितल्यामुळे व एका अर्जदारास मिळाल्यामुळे सदरचे अपीलकर्ता हे प्रथम अपीलाच्या सुनावणीस गैरहजर राहिलेले दिसतात व द्वितीय अपीलाच्या सुनावणीस सुध्दा आज गैरहजर राहिलेले दिसतात. व त्यांनी कोणत्याही प्रकारचा खुलासा दाखल केलेला नाही. परंतु त्यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

<u>आ दे श</u>

1) अपीलकर्ता यांना माहिती यांनी विहीत मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 18.10.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 536/2007.**

श्री एस. व्ही. घुगे
द्वारा – श्री एस. पी. सोनोने, वनपाल
यांचे निवासस्थान ता. पातुर जिल्हा अकोला ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) श्री गौतम भालेराव
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, अकोला ''सहकार संकूल''
आदर्श कॉलनी, ता. जि. अकोला

2) जन माहिती अधिकारी तथा
अध्यक्ष,
वनकर्मचारी सहकारी पत संस्था मर्या. अकोला
कार्या.– उपवनसंरक्षक कार्यालय कंपाऊंड अकोला
ता. जि. अकोला ..... **उत्तरवादी**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक 29/6/2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. वन कर्मचारी सहकारी पत संस्थेतर्फे अध्यक्ष हजर असून ॲड. श्रीयुत एन. जी. सुतवणे हे हजर झाले आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचा माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 30.1.2006 रोजी वनकर्मचारी सहकारी पत संस्थाचे अध्यक्ष श्री एम. झेड. बेग यांचेकडे सन 1990 ते 31.3.2005 पर्यंत 1) वार्षीक अहवाल मागील पंधरा वर्षाचा 2) निवडणूक अहवाल व निवडणूक अधिकारी नांव मागील 15 वर्षातील 3) आमसभा ठराव व तपशिल पंधरा वर्षाचा 4) लेखा परिक्षण अहवाल 1990 ते 2005 पर्यंत 5) संचालक मंडळ व सभासद यादी संपुर्ण नावासह. माहिती टपालद्वारे किंवा प्रत्यक्ष घेणार असे नमुद केलेले आहे. परंतु सदरचा अर्ज हा रजिष्टर पोष्टाने पाठवूनसुध्दा अपीलकर्ता यास परत आलेला होता. व त्यामुळे दि. 23.2.2006 रोजी जिल्हा उपनिबंधक तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले होते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भात दि. 31.3.2006 रोजी सहकारी आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र पुणे यांचे कार्यालयीन सुधारीत आदेशक क्र. अवनी/केमाअ/शाप्रअ/2006 दि. 8.2.2006 अन्वये सहकारी पतसंस्थेनी केलेले शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 लागू होत नसल्याबाबत अशा सुचना निर्गमीत केल्या आहेत करीता आपल्या दि. 20.3.2006 च्या पत्रानुसार आपणास कळविण्यात येत आहे असे कळविल्यामुळे अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केले आहे.

3. वनकर्मचारी सहकारी पत संस्था यांचे अध्यक्ष व त्यांचे वकील यांनीसुध्दा हा कायदा लागू नाही. असे असले तरी माहिती उपलब्ध करुन देवून हे मान्य केले आहे. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी सुध्दा माहिती उपलब्ध करुन देता येईल असे मान्य केले आहे. परंतु सहकार आयुक्त यांचे परिपत्रक असल्यामुळे त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना कळविण्यात आले होते. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की मात्र पत संस्थेस कोणतेही शासनाचे सहाय्य नाही व त्यामुळे ते ''सार्वजनिक प्राधिकरण'' या व्याख्येत येत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम 2 (ज) मध्ये ''सार्वजनिक प्राधिकरण'' या संज्ञेची व्याख्या केलेली आहे. ''सार्वजनिक प्राधिकरण'' याचा अर्थ क) संविधानाद्वारे

किंवा तद्न्वये ख) संस्थेने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे ग) राज्य विधान मंडळाने तयार केलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे घ) समुचित शासनाने काढलेल्या अधिसुचनेद्वारे किंवा आदेशाद्वारे स्थापन करण्यात आलेले किंवा करण्यात आलेले कोणतेही प्राधिकरण किंवा निकाय किंवा स्वराज्य संस्था असा आहे आणि त्यात (एक) समुचित शासनाचे मालकी असलेल्या त्याचे नियंत्रण असलेले किंवा त्यांचेकडून विधीद्वारे ज्याला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठया प्रमाणात वित्त पुरवठा केला जातो असा निकाय (दोन) समुचित शासनाकडून निधीद्वारे ज्यांना प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठया प्रमाणात वित्त पुरवठा केला जातो अशी अशासकीय संघटना यांचा समावेश आहे. वरील व्याख्येवरुन व्याख्येवरुन शासनाचे वित्त सहाय्य हा एक निकष आहे. परंतु वेगवेगळे चार निकष त्या व्याख्येत दिले आहे. त्याप्रमाणे राज्य विधान मंडळाने तयार केलेल्या अधिनियमाप्रमाणे हया निकषाचा जर विचार केला तर कोणत्याही सहकारी संस्थेचे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 च्या प्रमाणे पंजीबध्द करणे आवश्यक असते. सहकारी संस्था याचा अर्थ असा की काही सभासद एकत्र येवून ती एक संस्था स्थापन करतात. त्यात सभासदांची वर्गणी, भागभांडवल असते, निधीचा विनिमय हा संस्थेचे सभासद यांचेसाठी असतो, संस्थेचे संचालक मंडळ असते, संचालक मंडळाची नियुक्ती ही निवडणूकीद्वारे होते. उपनिबंधक सहकारी संस्था यांचेकडे नोंदणी झाल्यानंतर संस्थेच्या कर्मचा–यावर त्यांचे संपूर्ण नियंत्रण असते. निवडणूक ही सुध्दा सहा. निबंधक यांचे नियंत्रणाखाली घेतली जाते. सहकारी कायद्याप्रमाणे वार्षिक सभाही घेतली जाते, लेखा परिक्षण हेसुध्दा करावे लागते व गैरव्यवहार असला तर शासनाला प्रशासक सुध्दा नियुक्ता करता येतो. अशा प्रकारचे नियंत्रण हे ती सार्वजनिक संस्था असल्यामुळे व सार्वजनिक निधीचा विनिमय त्यात होत असल्यामुळे व त्यात कोणत्याही एका गटाचे, व्यक्तीचे नुकसान होवू नये हयादृष्टीने नियंत्रण असल्यामुळे सदरच्या संस्थेना शासनाकडून वित्तीय सहाय्य होत नसले तरी राज्य विधान मंडळाने केलेल्या कायद्याच्या प्रमाणे नियंत्रण येत असल्यामुळे ''सार्वजनिक प्राधिकरण'' या संज्ञेच्या

व्याख्येत सहकारी पत संस्था हया निश्चितच येतात. त्यातही वनकर्मचारी सहकारी पतसंस्था या पतसंस्थेस जिल्हा सहकारी बॅकेकडून सुध्दा कर्ज उपलब्ध होते असे जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी सांगितले. व त्यामुळे जरी सदरची सहकारी पतसंस्था ही निश्चितच सार्वजनिक प्राधिकरण आहे व त्या प्राधिकरणातील माहिती एखाद्या नागरीकाने माहितीचा अधिकारी अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे मागितली तर त्या सहकारी संस्थेमध्ये पारदर्शकपणा येण्याच्या करीता आणि जबाबदारी येण्याच्या करीता माहिती उपलब्ध करुन देणे हे आवश्यक ठरते. अर्थात सुरुवातीला अध्यक्ष, वन कर्मचारी सहकारी पतसंस्था यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यास मान्यता दिली असली तरी सदरच्या सहकारी पतसंस्थेत माहिती अधिकारी नियुक्त करणे आवश्यक आहे. माहिती अधिकारी कोणत्या अधिका—यास किंवा पदाधिका—यास नियुक्त करावे याबद्यलचा निर्णय अर्थातच त्या सहकारी पतसंस्थेनी घ्यावा किंवा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी त्यांना मार्गदर्शन करावे.

4. अपीलकर्ता यांचा दि. 30.1.2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये केलेला अर्ज जरी परत आलेला असला तरी अपीलकर्ता यांनी पुन्हा अध्यक्ष, वन कर्मचारी सहकारी पतसंस्था यांचेकडे पुन्हा सादर करणे संयुक्तिक राहिल. सहकारी आयुक्तांच्या परिपत्रकाप्रमाणे सहकारी पतसंस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम 2005 लागू नाही अशी सद्भावना सहकारी पतसंस्थेची असल्यामुळे अपीलकर्ता यांच्या अर्जाची तारीख यापुढे अपीलकर्ता ज्या दिवशी अर्ज करतील ती समजणे संयुक्तिक राहिल. अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती साधारणतः 15 वर्षाच्या कालावधीतील आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांचा अर्ज मिळाल्यापासून 30 दिवसात ती माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे अधिनियमाच्या तरतुदींप्रमाणे राहिल.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून वन कर्मचारी सहकारी पतसंस्था रजि. नं. 162 अकोला या संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम 2005 लागू असून अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेली माहिती अध्यक्ष यांनी अपीलकर्ता यांनी अर्ज केल्याच्या दिवसापासून 30 दिवसात उपलब्ध करुन द्यावी.

2) वन कर्मचारी सहकारी पतसंस्था यांनी माहिती अधिकारी नियुक्त करावा व पत संस्थेत दर्शनी भागात त्याबद्यलची माहिती उपलब्ध करुन द्यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 18.10.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 539/2007.**

श्री प्रेमदास रेकाजी राठोड
बी–8, लिबर्टी एनक्लेव्ह, जेपी नगर रोड
मालवियानगर खामला नागपूर. ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) श्री आर. एस. आगवणे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक,
भूमी अभिलेख नागपूर

2) श्री एन. एच. पाटील,
जन माहिती अधिकारी तथा
नगर भूमापन अधिकारी क. 3,
प्रशासकीय इमारत, 6 वा मजला, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 5/9/2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व विद्यमान उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 10.7.2006 रोजी भूमापन अधिकारी कार्यालय नागपूर यांचेकडे 5 मुद्यांवर माहिती मागण्यासाठी अर्ज केला होता. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 24.7.2006 रोजी माहिती अधिकारी तथा भूमापन अधिकारी यांनी अपीलकर्ता यास

माहिती उपलब्ध करुन दिली आहे. सदरच्या माहितीवरुन समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 7.8.2006 रोजी प्रथम अपील दाखल केले होते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दि. 20.9.2006 रोजी दिलेला आहे. सदरच्या निर्णयाने व्यथित होवून अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील सादर केले आहे. अपीलकर्ता यांनी दि. 25 नोव्हेंबर 2005 रोजी मौजा खामला वार्ड नं. 75 येथील खसरा नं. 76/77/80 1 आराजी 48.50 चौ. मी. या फ्लॅटच्या नामांतराचा अर्ज दिला होता. अर्जावरील कार्यवाहीची माहिती विचारली होती. माहिती अधिकारी यांनी उत्तर देतांना विहीत मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली आहे परंतु अपीलकर्ता यांचे दि. 25.11.2005 च्या नामांतराच्या अर्जासोबत आखीव पत्रिका जोडली नव्हती त्यामुळे आखीव पत्रिका अभावी अंतरीम निकाली काढण्यावर प्रलंबित आहे उर्वरीत माहितीच्या संदर्भामध्ये त्यांनी उत्तर दिलेले आहे त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांनी नामांतराच्या अर्जासोबत आखीव पत्रिका जोडली होती परंतु माहिती अधिकारी यांनी त्यांना चुकीची माहिती दिली म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये अर्जासोबत मिळकतीचे आखिव पत्रिकेची सत्यप्रत जोडलेली नव्हती. जोडलेली प्रत झेरॉक्स होती त्यामुळे अर्ज कार्यवाहीकरीता प्रलंबित होता यावरुन असे दिसून येते की अर्जदाराचे म्हणणे हे बरोबर होते परंतु अर्जदाराचे म्हणणे अर्धसत्य आहे कारण त्यांनी मुळ प्रत जोडलेली नसून झेराक्स प्रत जोडलेली आहे. झेराक्स आधार मानून माहितीवर कार्यवाही होते किंवा नाही याबाबत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी खुलासा केलेला नाही. त्यामुळे याबाबत कोणताही विचार करता येत नाही. मात्र माहिती अधिकारी यांनी त्यांच्या उत्तरात कमीत कमी झेराक्स प्रत जोडलेली आहे व झेराक्स प्रतीवर कार्यवाही करता येते किंवा नाही अशा प्रकारचा खुलासा त्यांनी केलेला नाही. झेराक्स प्रत आहे हा सुध्दा उल्लेख त्यांनी उत्तरात केला पाहिजे होता हा अपीलकर्त्याचा मुद्या ग्राहय ठरतो व त्यामुळे तात्कालीन माहिती अधिकारी यांनी माहिती चुकीची दिली आहे हा निष्कर्ष काढण्यास हरकत नाही. आता प्रश्न उरतो सदरची माहिती ही जाणूनबुजुन चुकीची

दिली आहे किंवा नजरचुकीने चुकीची दिली आहे. हा खुलासा अर्थातच तात्कालीन माहिती अधिकारी यांनी करावयास पाहिजे. परंतु आज ते हजर नाहीत व एक वर्षापूर्वी त्यांची बदली झालेली आहे असे विद्यमान माहिती अधिकारी यांनी सांगितले. जाणूनबुजुन चुकीची माहिती दिली असे सिध्द झाल्यास कलम 20 प्रमाणे शास्ती लादणे हे योग्य ठरते. परंतु शास्ती लादण्यापूर्वी कलम 20 (1) च्या परंतुकाप्रमाणे माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकुन घेणे क्रमप्राप्त ठरते. परंतु अपीलकर्ता यांना विचारले असता अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की कलम 20 प्रमाणे शास्ती लादणे हा त्यांचा उद्येश नाही परंतु सार्वजनिक प्राधिकरणामधील प्रत्येकाचे कामकाज हे वेळेवर होणे हा त्यांचा उद्येश असल्यामुळे तात्कालीन माहिती अधिकारी यांना ताकीद देण्यास हरकत नाही. प्रथम अपीलाच्या निर्णयाच्या इतर मुद्यांबाबत अर्थातच अपीलकर्ता यांनी लक्ष वेधले होते परंतु महाराष्ट्र माहितीचा अधिकार व माहितीचा अधिकार 2005 हया दोनही अधिनियमाच्या शिवाय हा माहिती उपलब्ध करुन देणे असल्यामुळे कदाचित कायदेशीर तांत्रिक बाजू लक्षात न आल्यामुळे सदरचे परिपत्रक हे पुढील अधिनियमाच्या संदर्भात सुध्दा अंमलात आहे असे समजुन त्याबद्यलचे उत्तर दिले गेले असावे. परंतु असा प्रकार हे 2006 मध्ये बहुतांश अर्जाबाबत झालेले आहे. मात्र पुढे केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या प्रमाणे प्रभावी अंमलबजावणी होईल व त्याबाबतचे नागरीकांचे प्रबोधन व सार्वजनिक प्राधिकरणामधील अधिका–याचे प्रशिक्षण हे होत जाईल त्याप्रमाणे त्या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होईल असे म्हणावयास हरकत नाही.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून त्यांना विहीत मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली असली तरी माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली माहिती ही चुकीची आहे असे दिसून येत असल्यामुळे तात्कालीन माहिती

अधिकारी यांनी यापुढे अशा प्रकारची कोणत्याही प्रकारे कमीत कमी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदींच्या अंमलबजावणीच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची चुक जाणूनबुजुन किंवा अनावधानाने सुध्दा होवू नये याबद्यलचा समज अधिक्षक भूमी अभिलेख नागपूर यांनी लेखी द्यावा व तसा अहवाल आयोगास कळवावा.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 19.10.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती / नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 363 / 2007.**

श्री संदिप बद्रीप्रसाद अग्रवाल
''स्मृती'' अग्रसेन रोड,
धरमपेठ, नागपूर. ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अपर आयुक्त,
महानगर पालिका, नागपूर

2) जन माहिती अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता (लोककर्म विभाग)
महानगर पालिका, नागपूर ..... **उत्तरवादी**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 28 / 8 / 2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता दि. 27.8.2007 रोजी हजर होते. परंतु त्यानंतर दि. 6.9.2007 रोजी गैरहजर होते व आज गैरहजर आहेत. माहिती अधिकारी गैरहजर आहेत परंतु माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी म्हणून श्री वारके विकास अभियंता हे हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 7.4.2006 रोजी 6 मुद्यांवर माहिती अधिकारी नागपूर महानगर पालिका यांचेकडे मागितली होती.

1) नागपुर शहर में विभागने कौन–कौन से प्रोजेक्ट बी.ओ.टी. पर लोगों को आवंटित किये है । उसके नाम व जमीन कहां स्थ्ति है। वहॉ क्या बनने जा रहा है। उस बाबत संपूर्ण माहिती दे।

2) शहर में दिये गये बी.ओ.टी. प्रोजेक्ट की लागत मुल्य क्या है। बी.ओ.टी. किन शर्तो पर दी गयी है। उस बाबत किये गये ॲग्रीमेन्ट की कॉपी और अन्य माहिती दी जाय ।

3) पूर्व में दिये गये बी.ओ.टी प्रोजेक्ट में अगर कोई संशोधन किये गये है तो उस बाबत संपूर्ण माहिती, संशोधन करने का करण संशोधीत नक्शे की कॉपी और अन्य माहिती दी जाय ।

4) शहर में चल रहे बी.ओ.टी.प्रोजेक्ट के काम कब दिये गये है। उस बाबत दिये गये विज्ञापनों की कॉपी कितने लोगों ने टेंडर भरे ? कितने लोगों को टेंडर मिले ? कितने रुपये में टेंडर गये ? किन शर्तो पर टेंडर दिये गये ? इस बाबत संपूर्ण माहिती दी जाय ।

5) शहर में कितने बी.ओ.टी.प्राजेक्ट ऐसे है जिन्हे पुरा करने की मुदत खत्म हो गई है और उन्हे टाईम का एक्सटेन्शन दिया गया है। एक्सटेंन्शन देने की वजह क्या है ? उस बाबत संपुर्ण माहिती दि जाय ।

6) आपके विभाग के पास शहर में सार्वजनिक उपयोग की कितनी जमीन उपलब्ध है ? कितनी जमीन संस्थाओं को दी गयी है। किन संस्थाओं को जमीन दी गयी है। किस उपयोग के लिये दि गयी है ? कितनी जमीने खाली है ? नस्शे, जमीन का क्षेत्र के साथ संपूर्ण माहिती दी जाय । सदरची माहिती ही पोष्टाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 24.4.2006 रोजी मागितलेल्या माहिती पैकी काही मुद्यांवर माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु मागितलेली माहिती ही महानगर पालिकेच्या निरनिराळया विभागाशी संबंधित असल्यामुळे संबंधित

विभागानी मुद्या क्र. 1 ते 5 व मुद्या क्र. 6 ची माहिती तपशिलात उपलब्ध करुन देण्याकरीता बाजार अधिक्षक बाजार विभाग व स्थावर अधिकारी स्थावर विभाग यांना निर्देश दिलेले दिसून येतात. सदरच्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 17.7.2006 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलात त्यांना दि. 24.4.2006 पत्राप्रमाणे काही माहिती उपलब्ध झाली याबद्यलचा उल्लेख त्यांनी केलेला नाही. दि. 21.8.2006 रोजी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येतो व त्या अपीलातील निर्णयामध्ये ''अपीलकर्ता यास माहिती प्राप्त झाली आहे व दि. 27.6.2006, दि. 3.8.2006 व दि. 10.8.2006 रोजी सुनावणीस हजर झालेले नाहीत'' त्याकारणास्तव अपील निकाली काढलेले दिसून येते. मुद्या क्र. 6 च्या संदर्भात अपीलार्थीने नव्याने स्वतंत्रपणे अर्ज करावा असा निर्णय दिलेला दिसून येतो व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी त्यांच्या अर्जाच्या अनुषंगाने वर नमुद केल्याप्रमाणे काही माहिती दि. 24.4.2006 च्या प्रमाणे दिलेली आहे. नंतर काही माहिती त्यांना दि. 12.6.2006 च्या विकास अभियंता यांच्या मार्फत पाठविण्यात आलेली दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 7.4.2006 च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली आहे असे दिसून येते. परंतु मुद्या क्र. 6 च्या संदर्भामध्ये स्थावर विभाग यांचेकडे अर्ज पाठविलेला असूनसुध्दा माहिती उपलब्ध झाली किंवा नाही हे उपस्थित अधिका–यांना माहित नाही. वास्तविक अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती माहिती वेगवेगळया विभागाची असल्यामुळे माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांचे अर्ज हे त्या त्या विभागाकडे हस्तांतर तरी करावयास पोहिजे होते किंवा त्या त्या विभागाकडून माहिती संकलिक करुन अपीलकर्ता यांस उपलब्ध करुन द्यावयास पाहिजे होती. जी माहिती ज्या ज्या वेळेस उपलब्ध झाली त्या माहितीच्या संदर्भामध्ये प्रथम अपील किंवा द्वितीय अपीलामध्ये अपीलकर्ता यांनीसुध्दा अपीलीय अधिकारी यांचे निदर्शनास आणणे आवश्यक होते. परंतु माहिती मिळून सुध्दा माहिती उपलब्ध झाली नाही हे अपीलार्थीचे म्हणणे

सुध्दा गैर आहे. प्रथम अपील किंवा द्वितीय अपीलात जी माहिती उपलब्ध झाली नाही त्या संदर्भात अपील करावयाचे असते. त्यामुळे अपीलकर्ता सुध्दा अपीलीय अधिकारी यांचे दिशाभूल करतात असे दिसून येते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देणचे निर्णयाची अंमलबजावणी होते किंवा नाही हे पाहणे आवश्यक असते. माहिती उपलब्ध करुन द्या किंवा पुन्हा वेगळा अर्ज करा असा निर्णय अपील प्रकरणामध्ये देणे हे गैर आहे. असे असले तरी अपीलार्थी यास माहिती उपलब्ध झालेली आहे असेच गृहीत धरुन सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे. मात्र तात्कालीन माहिती अधिकारी अधिक्षक अभियंता यांनी अपीलकर्ता यास मुद्या क्र. 6 ची माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही याबद्यल आयोगाकडे खुलासा करणे संयुक्तिक राहिल.

## <u>आ दे श</u>

1) अपीलकर्ता यांनी मुद्या क्र. 1 ते 5 ची माहिती उपलब्ध झाली आहे असे माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सांगितले असल्यामुळे व अपीलकर्ता यांनी कोणत्याही प्रकारचे माहिती उपलब्ध झाला असल्याचा खुलासा न केल्यामुळे सदरचे अपीली हे निकाली काढण्यात येत आहे. अर्जदारास दि. 7.4.2006 च्या संदर्भामध्ये तात्कालीन माहिती अधिकारी यांनी पुन्हा अपीलकर्ता यास मुद्या क्र. 6 प्रमाणे माहिती उपलब्ध झाली किंवा नाही याबद्यलचा अहवाल हा निर्णय मिळाल्यापासून आयोगास 8 दिवसात करावा व तसे अपीलकर्ता यास सुध्दा कळवावे अन्यथा माहिती अधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) प्रमाणे शास्तीस पात्र राहतील.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 23.10.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 403/2007.**

श्री गंगाधर रामचंद्रराव कैकाडे
द्वारा, आर. जे. कैकाडे, ''यशोदा निवास''
पारडी, भंडारा रोड, नागपूर. ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक,
नागपूर विभाग, नागपूर प्लॉट नं. 90,
शिवाजी नगर, नागपूर 10.

2) जन माहिती अधिकारी तथा
सह जिल्हा निबंधक,
नागपूर ग्रामीण नागपूर
प्लॉट नं. 90, शिवाजी नगर, नागपूर 10. ..... **उत्तरवादी**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 20/9/2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 23.5.2006 रोजी माहिती मिळण्यासाठी माहिती अधिकारी म्हणून Joint District Nagpur Rural यांचेकडे मौदा कार्यालयातील दस्त क्र. 1953/05 च्या नोंदणी संदर्भात 13.3.2006 ते 23.5.2006 या कालावधीतील माहिती मागितली होती. सदरची माहिती ही पोष्टानी घेणार असे नमुद केलेले होते. सदरच्या अर्जाच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना दि. 29.5.2006 रोजी दुय्यम निबंधक मौदा येथील दस्त क्र. 1053/2005 च्या संबंधी तक्रारीच्या अनुषंगाने उपरोक्त कालावधीत कोणताही पत्रव्यवहार या कार्यालयानी केला नाही किंवा कोणताही पत्रव्यवहार या कार्यालयास प्राप्त झाला नाही सबब माहिती निरंक समजावी असे अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. सदरच्या अर्जाच्या संदर्भामध्ये दि. 5.6.2006 रोजी अपीलकर्ता यांनी माहिती अधिकारी यांना एक अर्ज केलेला दिसून येतो व त्या मध्ये माहिती ही दुय्यम निबंधक यांचेकडे उपलब्ध असावी असे कळविलेले दिसून येते व त्यामुळे दि. 16.6.2006 रोजी सह जिल्हा निबंधक वर्ग 1 यांनी सदरचा अर्ज हा मौदा येथील दुय्यम निबंधक यांचेकडे हस्तांतर करुन तसे अपीलकर्ता यांना कळविले. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदरच्या द्वितीय अपील मेमोमध्ये राज्य जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक यांनी मौदा येथील दुय्यम निबंधक यांचेकडे अर्ज न पाठवता माहिती त्यांचेकडून संकलीत करुन अपीलकर्ता यांना कळवावयास पाहिजे होती अशा प्रकारचा मुद्या काढून तक्रार केलेली आहे.

3. अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन देण्यात आली ती विहीत मुदतीत उपलब्ध करुन देण्यात आलेली असून उपलब्ध झालेल्या माहिती बद्यल त्यांची तक्रार नाही. परंतु अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज केल्या नंतर सहा. माहिती अधिकारी यांचेकडे अर्जाचे हस्तांतर करुन घ्यावी हया दिनांक

16.6.2006 च्या अर्जाच्या संदर्भात अपीलकर्ता यांची तक्रार आहे. त्याबाबत अपीलकर्ता यांनी असे सांगितले की सह जिल्हा निबंधक वर्ग 1 हे माहिती अधिकारी आहे व वर्धा येथील दुय्यम निबंधक हे सहा. माहिती अधिकारी आहे व त्यामुळे अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन हे झालेले असल्यामुळे त्यांनी द्वितीय अपील दाखल केलेले आहे. त्यामुळे नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र पुणे या कार्यालयानी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदींप्रमाणे माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी यांचे नियुक्ती बद्यलचे आदेश आहेत काय असे सह जिल्हा निबंधक यांना विचारले असता त्यांनी दि. 5.3.2004 चे शासकीय माहिती अधिकारी म्हणून पदनिर्देशित केलेले आदेश निदर्शनास आणले व सदरच्या आदेशा प्रमाणे अनुक्रमांक 266 वर दुय्यम निबंधक मौदा हे माहिती अधिकारी आहेत असे दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी अधिनियमाच्या तरतुदींचे जे विश्लेषण केले आहे ते जरी बरोबर असले तरी प्रत्यक्षात जे आदेश काढलेले आहे त्या आदेशाप्रमाणेच माहिती अधिकारी हयांची नियुक्ती ग्राहय धरली जाते. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदींप्रमाणे माहिती ही 30 दिवसाचे आत उपलब्ध करुन द्यावयाची असते व त्याकरीता सार्वजनिक प्राधिकारणाची जी व्याख्या केलेली आहे त्या व्याख्येप्रमाणे माहिती ही ज्या ज्या स्तरावर उपलब्ध असेल त्या त्या कार्यालयात माहिती अधिकारी यांची नियुक्ती केलेली आहे जेणेकरुन त्या स्तरावरची माहिती 30 दिवसात उपलब्ध करुन देता येईल व त्याचप्रमाणे शासनाच्या वेगवेगळया विभागानी अगदी ग्रामीण भागातील कार्यालयातसुध्दा ग्रामपंचायत स्तरावर माहिती अधिका–याची नियुक्ती केलेली आहे. तसेच अपीलकर्ता यांनीच माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग 1 त्यांच्या कार्यालयातील माहिती उपलब्ध करुन दिल्याच्या नंतर सदरची माहिती ही मौदा येथील दुय्यम निबंधक यांचेकडे असेल कारण दस्त त्या कार्यालयात नोंदणी झाली आहे हे निदर्शनास आणल्यामुळे सह जिल्हा निबंधक यांनी सदरचा अर्ज हा दुय्यम निबंधक मौदा यांचेकडे त्यांचे कार्यालयाचे माहिती अधिकारी म्हणून हस्तांतर केलेले दिसून येते व त्यामुळे त्याही बाबत अपीलकर्ता यांचा मुद्या हा निकाली निघतो त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 23.10.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 404/2007.**

श्री रमेश कुमार बाली
रा. क्यू/235, फुटाना ओली कामठी,
ता. कामठी जि. नागपूर. ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपआयुक्त (सा.प्र.) नगर पालिका प्रशासन,
नागपूर विभाग, नागपूर,

2) जन माहिती अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नागपूर परिषद कामठी
ता. कामठी जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 19/2/2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 6.11.2006 रोजी ''ड्रॅगन पॅलेस टेंपल की इमारत की बांधकाम की परमिशन दी जबकी इस भुमिपर बगीचा बनाये, उसकी देखरेख करना इसकी जानकारी मिलनेबाबत. अशी माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद करुन

मागितली होती. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 5.12.2006 रोजी अपीलकर्ता यांना माहिती राज्य जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली दिसते. परंतु सदरच्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 15.12.2006 रोजी प्रथम अपील दाखल केले होते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दि. 19.1.2007 रोजी दिलेला असून उभय पक्षाचे ऐकुन घेतल्यानंतर प्रकरणातील कागदपत्राची पडताळणी करुन निर्ष्कषास आलो की अपीलार्थी यांनी केलेली मागणी अद्याप पावेतो प्राप्त झाली नाही परंतु प्रतिवादी यांचा माहिती न देण्याचा हेतू निदर्शनास येत नाही. सबब मुख्याधिकारी तथा माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस मागणी केलेली माहिती सदर आदेश प्राप्त झाल्या पासून सात दिवसाचे आंत विनामुल्य पुरवावी अशा प्रकारचा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांनी त्यांचे दि. 6.11.2006 चे अर्जामध्ये जी माहिती मागितलेली दिसते त्याकरीता त्यांनी ड्रॅगन टेंपल इमारतीस बांधकामाची परवानगी दिल्याबद्यलची माहिती मागितलेली दिसून येते. परंतु जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी यांचे म्हणणे असे आहे की नगर परिषद कामठीने ड्रॅगन टेंपल इमारती बांधकामास परवानगी दिली नव्हती तर Hardas Educational & Cultural Society कामठी या संस्थेस सदरच्या सर्व्हे नं. 36/9 व 36/1/2 या सर्व्हे नंबरवर कायमस्वरुपी लिज तत्वावर परवानगी दिलेली होती व त्याबाबतची सर्व कागदपत्रे ही अपीलकर्ता यास अर्जाप्रमाणे सुध्दा दिली होती व माहितीच्या अर्जाच्या अनुषंगानेसुध्दा दि. 5.12.2006 रोजी माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला होता. परंतु अपीलकर्ता हे कामठी येथे राहात नसल्यामुळे त्यांचे घरी माहिती ही स्विकारली गेली नाही. यातून असे दिसून येते की अपीलकर्ता यांचा समज ड्रॅगन टेंपल इमारतीस बांधकामाची परवानगी बद्यलची आहे व

नगर परिषद यांनी वर नमुद केल्याप्रमाणे Hardas Educational & Cultural Society यांना परवानगी दिलेली आहे व कदाचित ड्रॅगन टेंपल हे नाव त्या इमारतीस नंतर देण्यात आलेले असावे व त्यामुळेच सदरचे प्रथम अपील किंवा द्वितीय अपील हे झालेले दिसून येते. प्रथम अपीलातसुध्दा माहिती उपलब्ध करुन देण्याचे मान्य केले होते. माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की त्यावेळेस सुध्दा माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला होता व आजही माहिती उपलब्ध करुन देण्याचा कोणताही प्रत्यावाद नाही. नगर परिषदेनी बांधकामाचा जो नकाशा मान्य करुन दिलेला आहे त्या नकाशाची प्रत अपीलकर्ता यांचे म्हणण्यानुसार त्यांना आतापर्यंत मिळालेली नाही व ती आतासुध्दा ते स्विकारण्यास तयार आहे. मात्र अपीलकर्ता यांनी त्यांचे माहितीच्या अर्जामध्ये परवानगी कशी दिली असा प्रश्न विचारलेला आहे व त्या संदर्भात माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे तरतुदीप्रमाणे कोणत्याही निर्णय प्रक्रियेचे कारण देणे हे अपेक्षित नाही. कोणत्याही प्रकारणाचे संदर्भात सार्वजनिक प्राधिकरणात उपलब्ध असलेल्या स्वरुपात म्हणजे अभिलेखाचे स्वरुपात किंवा दस्तऐवजाचे स्वरुपात जी माहिती आहे ती उपलब्ध करुन देणे हे अपेक्षित आहे व उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे अपीलकर्ता यांना त्याबद्यल तक्रार असल्यास ती योग्य त्या प्राधिकरणाकडे स्वतंत्रपणे करुन न्याय मिळवून घेता येईल अशी थोडक्यात संकल्पना आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अर्जात मागितलेल्या माहिती प्रमाणे त्यांना केवळ इमारतीच्या बांधकामाच्या संदर्भातील कागदपत्रे नकाशासहीत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे दि. 6.11.2006 च्या अर्जाप्रमाणे ड्रॅगन टेंपल इमारत ज्या सर्व्हे नंबरमध्ये आहे त्या सर्व्हे नंबरवर बांधकाम झालेले आहे त्या बांधकामाच्या संदर्भातील नगर परिषदेने दिलेल्या परवानगीची कागदपत्रे व इमारतीच्या मंजुर केलेल्या नकाशाची प्रत ही अपीलकता यांना उपलब्ध करुन देण्यात यावी. सदरची कागदपत्रे उपलब्ध करुन दिल्यानंतर अपीलकर्ता यांचेकडून पोच घेण्यात यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 24.10.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 402/2007.**

श्री श्रीकांत शालीगराम चौरसिया
महाराष्ट्र बॅक समोर, कुसार ओली कामठी,
ता. कामठी जि. नागपूर. ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) श्री कुळमेथे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी, नागपूर,

2) श्री बडगे
जन माहिती अधिकारी तथा
तहसिलदार कामठी
ता. कामठी जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 19/9/2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 18.3.2006 रोजी शीट क्र. 5 ब्लाक नं. 32 गुजरी बाजार कामठी इस क्षेत्र में आपके विभाग द्वारा सामने की दुकानो के बदले पीछे की जगह आवंटित की गई थी उक्त क्षेत्र में 1) दुकान नं. आर 87 से आर 92 तर

दुकानोके मालिको के नाम व पते 2) एलॉट करे गये मालिको के नाम और पते 3) इनसे संबंधीत कलेक्टर की रिपोर्ट की प्रति 4) तहसीलदार की रिपोर्ट की सत्यप्रती 5) पटवारी की रिपोर्ट की सत्यप्रती 6) किस कारणवश उन्हे पीछे की जगर एलॉट की गई। माहिती व्यक्तीशः घेणार म्हणून नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या संदर्भात विहीत मुदतीत कोणतीही माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 17.7. 2006 रोजी प्रथम अपील अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी तहसिल कार्यालय नागपूर यांचेंकडे दाखल केले होते. परंतु सदरच्या प्रथम अपीलाचीसुध्दा सुनावणी न घेतल्यामुळे अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केले आहे.

3. अपीलकर्ता यांनी दि. 18.3.2006 रोजी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात दिनांक लिहिलेला नाही मात्र सप्टेंबर 2006 मध्ये मात्र सदरची माहिती ही मुख्याधिकारी नगर परिषद कामठी यांचेकडून प्राप्त करावी नझूल परिरक्षण भूमापन कामठी यांचे अहवालाची प्रत या कार्यालयातून घेवून जावी असे कळविलेले दिसते. दि. 8.9.2006 रोजी सदरचे पत्र अपीलकर्ता यांना मिळाले अशी पोच त्यांनी लिहून दिलेली दिसून येते परंतु तरीसुध्दा त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. वास्तविक दिनांक 18.3.2006 च्या अर्जातील माहितीचे बद्यल 30 दिवसामध्ये अपीलकर्ता यांना कळवावयास पाहिजे होते. त्याबद्यल खर्च येणार असेल तर खर्च कळवावयास पाहिजे होता परंतु यापैकी काहीही न करता पाच महिन्यानी अपीलकर्ता यांना एक साधे पत्र दिलेले दिसून येते तेसुध्दा तहसिलदार यांचे सहीचे दिलेले दिसून येते. मात्र त्या पत्रावरुन अधिनियमाच्या तरतुदींचे काही पालन केलेले आहे असे दिसून येत नाही किंवा त्या तरतुदींची माहिती नझुल नायब तहलिसदार यांना आहे असे दिसून येत नाही. जी माहिती तहसिलदार यांचेकडे उपलब्ध नाही त्या माहितीच्या बद्यल सदरच्या अर्जाची प्रत ही विहीत मुदतीत ज्या माहिती अधिका–याकडे माहिती उपलब्ध असेल त्यांचेकडे हस्तांतर करुन तसे अपीलकर्ता यास कळवणे आवश्यक असते. त्याचप्रमाणे जी माहिती

त्यांचेकडे उपलब्ध असेल त्या माहितीच्या बद्यलचा खर्च कळविणे आवश्यक असते व ते स्वतः माहिती अधिकारी यांनी कळवावयाचे असते. कारण माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही ती अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे उपलब्ध करुन दिली किंवा नाही याबाबत अधिनियमाच्या कलम 20 प्रमाणे माहिती अधिकारी जबाबदार आहेत त्यांचेकरीता कोणीही सही केली असेल तर तो जबाबदार नाही. याबाबतची कोणतीही जाणीव माहिती अधिका—यांना दिसत नाही. प्रथम अपील दाखल केल्यानंतर अपील या संकल्पनाचा अर्थ दोनही पक्षकारांना बोलावून त्याबाबतचा निर्णय अपेक्षित असतो परंतु प्रशासकीय आदेश काढून अहवाल मागवणे व त्याकरीता एक पत्र लिहिणे या पलीकडे कोणत्याही प्रकारची कार्यपध्दती अवलंबीलेली दिसत नाही. प्रथम अपीलाच्या निर्णयाकरीता सुध्दा अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे मुदत दिलेली आहे. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांनीसुध्दा आजतागायत कोणत्याही प्रकारची काळजी घेतलेली दिसून येत नाही. अहवाल मागविलेला आहे असे उत्तर एक वर्षानीसुध्दा देणे अपेक्षित नाही. व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनीसुध्दा अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही त्यांना उपलब्ध करुन देणे हे माहिती अधिकारी यांचे जसे कर्तव्य आहे तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचेसुध्दा छाननी करुन माहिती उपलब्ध करुन देणे ही वैधानिक कर्तव्य आहेत. माहिती अधिका—याकडे जी माहिती उपलब्ध नसेल त्या माहितीबद्यल वर नमुद केल्याप्रमाणे सदरचा अर्ज हस्तांतर करुन ही माहिती उपलब्ध करुन देणेसाठी प्रयत्न करणे असे अधिनियमाच्या तरतुदींचे पालन करणे आवश्यक आहे. अपीलकर्ता यांनी व्यक्तीशः माहिती घेणार असे लिहून दिले असल्यामुळे अपीलकर्ता यांचेसुध्दा कर्तव्य ठरते की त्यांनी सदरचे माहिती घेण्याकरीता माहिती अधिकारी यांचे कार्यालयात विहीत मुदतीच्या आत जाणे हे त्यांचे कर्तव्य ठरते. व्यक्तीशः नमुद केल्यामुळे पोष्टानी माहिती उपलब्ध करुन देण्याचे बंधन माहिती अधिकारी यांचे नाही. व त्याकरीता व्यक्तीशः घेणार असल्यास त्याबद्यलचा

पुरावा हा अपीलकर्ता यांनीसुध्दा देणे आवश्यक ठरते. परंतु दि. 18.3.2006 चा अर्ज केल्यानंतर 30 दिवाचे आंत सदरची माहिती घेण्याकरीता अपीलकर्ता गेलेले आहेत असे दिसून येत नाही. तोंडी विचारले हे म्हणणे ग्राहय धरता येत नाही व त्यामुळे माहिती अधिकारी यांचेवर त्यांना माहिती विहीत मुदतीत उपलब्ध करुन दिली नसली तरी त्याबाबत त्यांना दोषी धरता येणार नाही. कारण व्यक्तशः नमूद केल्यावर अर्जदाराने जाणे आवश्यक आहे. टपालाचा प्रश्न उपस्थित होत नाही परंतु असे असले तरी माहिती उपलब्ध करुन दिली ही सिध्द करण्याची जबाबदारी ही माहिती अधिकारी यांची असल्यामुळे सदरचे प्रकरण मात्र त्यांनी अधिनियमाच्या तरतुदीनुसार हाताळले नाही. जी माहिती जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार कामठी यांचेकडे उपलब्ध आहे ती माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल परंतु जी माहिती मुख्याधिकारी नगर परिषद यांचेकडे उपलब्ध आहे त्याकरीता त्यांचेकडे अपीलकर्ता यांचा दि. 18.3.2006 च्या अर्जाची प्रत पाठवून ही माहिती त्यांचेकडून उपलब्ध करुन घेणे हे संयुक्तिक राहिल व त्याकरीता उपविभागीय अधिकारी कामठी यांनी देणे संयुक्तिक राहिल. अपीलकर्ता यांनी माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केले असल्यामुळे सदरची माहिती ही अपीलकर्ता यांना स्वतः माहिती अधिकारी तहसिलदार व माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परिषद कामठी यांचेकडे स्वतः जावून घेणे हे त्यांच्या अर्जाप्रमाणे योग्य राहिल.

## <u>आ दे श</u>

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून माहिती अधिकारी तथा तहसिलदार कामठी यांनी दि. 18.3.2006 च्या अर्जाप्रमाणे जी माहिती त्यांचेकडे उपलब्ध असेल ती माहिती त्यांना हा निर्णय मिळाल्यापासून 30 दिवसाचे आंत विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी व अपीलकर्ता यांनी व्यक्तीशः सदरची माहिती ही माहिती अधिकारी

यांचेकडून उपलब्ध करुन घ्यावी. त्याचप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून दोन दिवसाचे आंत माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परिषद कामठी यांचेकडे अपीलकर्ता यांचा दि. 18.3.2006 च्या अर्जाची प्रत पाठविण्यात येवून अपीलकर्ता यांना त्यांच्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश प्रथम अपीलीय अधिकारी यांनी द्यावे व त्याप्रमाणे माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी यांनी सदरची माहिती अपीलकर्ता यांना 30 दिवाचे आंत उपलब्ध करुन द्यावी अन्यथा अधिनियमाच्या कलम 20 प्रमाणे शास्तीस पात्र राहतील.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 24.10.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 563/2007.**

श्री नारायण शामराव लांडे
रा. सांगवी जोम. ता. बाळापूर
जि. अकोला ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अकोला

2) श्रीमती उषा उभरहांडे,
जन माहिती अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)
जिल्हा परिषद अकोला ..... **उत्तरवादी**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक 6/2/2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी हजर आहेत. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचा खुलासा दाखल केला नाही किंवा त्यांचेतर्फे कोणताही अधिकारी उपस्थित नाही.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 17.10.2006 रोजी एकच माहिती मिळण्यासाठी तिन अर्ज सादर केलेले दिसून येतात. तसेच दि. 19.10.2006 रोजी पुन्हा सदरच्या अर्जास

सुधारणा सुचवणारा पुन्हा अर्ज दाखल केलेला दिसून येतो. सदरची माहिती ही टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक 18.12.2006 रोजी अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहिती प्रमाणे व त्यांनी भरलेल्या रु. 1826/- या खर्चाप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसते. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक 29.12.2006 रोजी अपीलीय शासकीय माहिती अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलामध्ये त्यांनी उपलब्ध झालेल्या माहितीच्या संदर्भामध्ये 7 मुद्यांवर माहिती अपूर्ण किंवा चुकीची आहे अशी हरकत घेवून तक्रार केलेली दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भात दि. 16.1.2006 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांचे ऐवजी जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनीच 7 मुद्यांवर त्यांना उत्तर दिलेले दिसून येते व त्या सदरच्या निर्णयामुळे व्यथित होवून माहिती चुकीची व अपूर्ण दिली व प्रथम अपीलाची सुनावणी घेतली नाही व प्रथम अपीलाचा निर्णय हा माहिती अधिकारी यांनीच दिली या कारणास्तव राज्य माहिती आयोगाकडे सदरचे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांनी दि. 17.10.2006 रोजी एकच माहिती मागण्याकरीता तीन अर्ज सादर केलेले दिसून येतात. त्यातही दि. 19.10.2006 रोजी पुन्हा त्या अर्जास दुरुस्ती सुचवणारा पुन्हा एक अर्ज दाखल केलेला दिसून येतो. वास्तविक अशा प्रकारे एकाच माहिती करीता एका दिवशी तीन अर्ज दाखल करणे ही माहितीचा अधिकारी अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे नाही. वास्तविक अशा प्रकारे अर्ज दाखल केल्यामुळे सार्वजनिक प्राधिकरणामध्ये त्याबाबत संभ्रम निर्माण होतो किंवा केलेल्या अर्जाची गंभीरता कमी होते. हा एकप्रकारे अधिनियमाच्या तरतुदींचा गैरवापर आहे. माहिती मागतांना त्यामध्ये स्पष्टता पाहिजे जेणेकरुन विहीत मुदतीत सार्वजनिक प्राधिकरणास माहिती उपलब्ध करुन देणे

सुलभ होईल. अर्जदाराच जेव्हा वरीलप्रमाणे नियमाचे पालन करीत नाही तेव्हा त्यांना नंतर तक्रार करण्याचा अधिकार राहात नाही. असे असले तरी अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही उपलब्ध करुन देणे हा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीचा उद्देश असल्यामुळे त्यांना मागितलेली माहिती ही उपलब्ध करुन देणे आवश्यक ठरते. जी माहिती अपीलकर्ता यांनी मागितलेली आहे ती माहिती ही सन 1990 ते सप्टेंबर 2006 पर्यंत संवर्गनिहाय कनिष्ठ सहा./वरिष्ठ सहा., कक्ष अधिकारी या पदाची सन 1990 पासून ते 2006 पर्यंत रिक्त पदाची/प्रत्येक पदाची वर्षनिहाय सविस्तर माहिती व सदर रिक्त पदावर केलेल्या कारवाईची सविस्तर व स्वतंत्र अहवाल देण्याची अशी विस्तृत व व्यापक प्रमाणाची माहिती आहे. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 प्रमाणे अर्जदारास माहिती विचारण्याचे कारण जरी विचारता येत नसले तरी सार्वजनिक हिताशी निगडीत आहे किंवा नाही हे लक्षात घेवून त्याबाबतचे कारण निश्चितच विचारात घ्यावे लागते. अर्जदाराने अर्जात कारण लिहिलेले दिसून येते. ही पदे भरतांना हयामध्ये प्रचंड प्रमाणात अनियमितता झाली असल्याने मागितलेल्या माहितीची आवश्यकता आहे असे नमुद केले. 1990 ते 2006 हा आठ वर्षाचा कालावधी आहे. आठ वर्षाच्या कालावधीमध्ये संपूर्ण जिल्हा परिषदेतील कनिष्ठ सहा., वरिष्ठ सहा., कक्ष अधिकारी या पदाच्या संदर्भात जर अनियमितता झालेली असली तर गेल्या आठ वर्षामध्ये याबाबत जिल्हा परिषदेमध्ये कोणत्याही प्रकारची तक्रार किंवा चौकशी झालेली दिसून येत नाही. त्यामुळे सार्वजनिक हिताशी निगडीत व्यापक माहिती मागितली हे निश्चित करता येत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 प्रमाणे माहिती मागण्याचा जो अधिकार दिलेला आहे तो अर्थातच निश्चित आणि ज्या ठिकाणी खरोखर अन्याय झाला असेल त्याबाबत मागणे हा त्याचा उद्देश आहे व तशा प्रकारे ते एक अमोघ असे अस्त्र आहे. परंतु निव्वळ माहिती मागता येते, त्यामुळे विस्तृत प्रमाणात माहिती मागावयाची हे निश्चितच अपेक्षित नाही. व त्यामुळेच उलट हा अधिकार बोथट

होण्याचा धोका जास्त आहे. सार्वजनिक प्राधिकरणाची सुध्दा त्या अर्जाकडे बघण्याची गंभीरता नष्ट होते. अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती माहिती उपलब्ध करुन घेतांनासुध्दा त्याबाबतची काळजी घेतलेली नाही. व त्यांनी जी माहिती मागितलेली नाही ती माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे व जी माहिती त्यांनी मागितलेली होती ती त्यांना उपलब्ध करुन दिलेली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. वास्तविक माहिती जेव्हा व्यक्तिशः उपलब्ध करुन घेतली जाते आणि त्याकरीता खर्चाचा भरणा केलेला असतो त्यावेळेस अर्जदारानी प्रत्येक पृष्ठ व पृष्ठ हे तपासून माहिती घेतली पाहिजे. कारण तसे जर केले नसेल तर पुढे दोन्ही बाजुंच्या तक्रारी तपासणे अवघड होते. उपलब्ध झालेल्या माहितीच्या बाबतसुध्दा असेच झालेले आहे. अपीलकर्ता यांचे म्हणणे वर दिलेलेच आहे. परंतु माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की त्यांना संपूर्ण माहिती ही दिलेली आहे. याबाबत दोन्ही बाजुंकडे पुरावा नाही. व दोन्ही बाजु आपापल्या ठिकाणी ठाम असल्यामुळे त्याबाबत निश्चित निर्णय देणे हे अवघड झाले आहे. प्रथम अपीलामध्ये अपीलकर्ता यांनी जी तक्रार केलेली आहे त्या तक्रारीच्या संदर्भामध्ये मुद्येनिहाय त्यांना दि. 16.1.2007 रोजी निर्णय दिलेला दिसून येतो व त्या निर्णयामध्ये पुन्हा सविस्तर त्यांना खुलासा करण्यात आलेला दिसतो. सदरचा निर्णय हा माहिती अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनीच दिलेला दिसतो. अधिनियमाच्या कलम 19 (1) प्रमाणे माहिती अधिकारी यांच्या निर्णया विरुध्द वरिष्ठ अधिका–याकडे प्रथम अपीलाची तरतूद केलेली आहे. त्याप्रमाणे जिल्हा परिषदेमध्ये उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.) हे जर जन माहिती अधिकारी असतील तर अपर मुख्य कार्यकारी अधिकारी हे प्रथम अपीलीय अधिकारी आहे असे असतांना प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नसल्यामुळे अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केलेले दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 हा दि. 12.10.2005 रोजी अंमलात आला. अपीलकर्ता यांनी प्रथम अपील हे दिनांक 19.12.2006 रोजी दाखल केले. याचा अर्थ 14 महिन्याच्या नंतरसुध्दा जिल्हा परिषद अकोलामध्ये माहितीच्या

अधिकाराच्या अधिनियमाच्या तरतुदींचे कशा प्रकारे पालन व्हावयास पाहिजे याचे प्राथमिक ज्ञान दिसत नाही व त्यास सर्वस्वी मुख्य कार्यकारी अधिकारी हे जबाबदार दिसून येतात. व त्यामुळे सदरच्या जिल्हा परिषदेच्या संदर्भामध्ये सचिव ग्रामविकास विभाग मंत्रालय यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदींच्याबाबत प्रशिक्षण देणे जरुरीचे आहे असे दिसून येते. तसेच जी अनियमितता प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिखविलेली आहे त्याबाबतसुध्दा योग्य ती प्रशासकीय कारवाई त्यांच्या विरुध्द करणे आवश्यक ठरते.

4. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की प्रथम अपीलाचा निर्णय हा माहिती अधिकारी यांनीच दिलेला आहे त्यामुळे त्यांच्यावर दंडनीय कारवाई करावी व असे द्वितीय अपील मेमोमध्येसुध्दा म्हटले आहे परंतु तशी तरतूद अधिनियमाच्या कलम 20 प्रमाणे नाही. अधिनियमाच्या कलम 20 प्रमाणे अर्ज न स्विकारणे, माहिती देण्यास टाळाटाळ करणे, अपूर्ण व चुकीची माहिती देणे, माहिती नष्ट करणे इत्यादी करणाकरीता शास्ती लादता येते. परंतु कार्यपध्दतीच्या अनियमिततेबद्यल ही कारवाई मात्र सार्वजनिक प्राधिकरणाचे प्रमुख यांनाच करता येईल व त्याप्रमाणे त्यांनी ती कारवाई करुन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांना ताकीद देणे किंवा त्यांच्या विरुध्द प्रशासकीय कारवाई करणे हे संयुक्ति राहिल.

5. आता प्रश्न पुन्हा अपीलकर्ता यांनी म्हटल्याप्रमाणे अपूर्ण किंवा चुकीची माहिती दिल्याचा वरील विवेचनाप्रमाणे त्याबाबत दोन्ही बाजू ठाम असल्यामुळे व दोन्ही बाजूंकडे पुरावा नसल्यामुळे किंवा अपीलकर्ता यांनी माहिती घेतली त्यावेळेस ती हरकत घेवून घेतली असती तर त्याबाबतची बाजू हे निश्चित माहिती अधिकारी यांचेवर टाकता आली असती. माहिती अधिकारी यांचे नस्तीमध्ये वर्षनिहाय माहिती ही तयार केलेली दिसून येते. व त्यावरुन त्यांनी सदरची माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिली असली

पाहिजे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही कारण सार्वजनिक प्राधिकरणामध्ये आवश्यक ती माहितीसुध्दा तयार नसते तर कारण नसतांना तयार करुन ठेवणे ही बाब अतिशय जबाबदारीची होवू शकेल कारण संकलीत करतांना उपलब्ध कागदपत्रांबाबत टिप्पणी काढून संकलीत करावी लागेल व हे अपेक्षीत नाही. वास्तविक अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकारची माहिती ही तयार करुन देणे हे अपेक्षित नाही. माहिती व माहितीचा अधिकार व अभिलेखे या तिन संज्ञांच्या व्याख्या दिलेल्या आहेत व तिन्ही संज्ञांच्या व्याख्येप्रमाणे माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध असेल त्या स्वरुपात त्यांच्या छायांकीत प्रती उपलब्ध करुन घेणे किंवा त्या स्वरुपातच ती उपलब्ध करुन देणे हे अपेक्षीत आहे. तरीसुध्दा अर्जदार हे माहिती तयार करुन मागतात व काही सार्वजनिक प्राधिकरणाचे तसे देतातही परंतु अशाप्रकारे तयार करुन दिलेली माहिती उपलब्ध करुन दिल्यावर पुन्हा त्यात चुक झाल्यास त्याबाबत जबाबदारी कोणाची हे ठरवणेसुध्दा अवघड जाते. व त्यामुळेच माहिती तयार करुन देणे अपेक्षित नाही. तरीसुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे प्रथम अपीलाच्या निर्णयात म्हटलेले आहे. परंतु दोन्ही बाजुंचा दावा बाजुला ठेवल्यास अपीलकर्ता यांनी त्यांच्या अर्जाप्रमाणे जी माहिती मागितलेली आहे ती पुन्हा माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना व्यक्तीशः उपलब्ध करुन देणे व ती अपीलकर्ता यांनी स्वतः तपासून घेणे हा एकच मार्ग यामध्ये शिल्लक राहातो.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 17.10.2006 च्या अर्जाप्रमाणे पुन्हा एक वेळ संपूर्ण माहिती हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत व्यक्तीशः उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता यांनीसुध्दा त्यांनी मागितलेली माहिती ही उपलब्ध करुन देतांना तपासून घ्यावी व त्याप्रमाणे खर्चाचा भरणा कमीजास्त असेल तो करावा व कमी असेल तर त्यांनी भरलेल्या रकमेतून त्यांना परतावा द्यावा. सदरच्या निर्णयाची एक प्रत सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अकोला यांचेकडे योग्य त्या कारवाईसाठी पोष्टानी पाठविण्यात यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 25.10.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 564/2007.**

श्री नागोराव मारोतराव पराते
रा. अनंत अपार्टमेंट, टी–2, तिसरा माळा,
68 खरे टाऊन, धरमपेठ, नागपूर 10. ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) श्री जी. एम. गायकवाड,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य महाव्यवस्थापक (मा.स.)
महाराष्ट्र राज्य ऊर्जा निर्मिती कंपनी मर्यादित
प्रकाशगड, दुसरा माळा, प्रा. कानेकर मार्ग,
बांद्रे (पूर्व) मुंबई 51.

2) जन माहिती अधिकारी तथा
महाव्यवस्थापक (मा.स.)
महाराष्ट्र राज्य ऊर्जा निर्मिती कंपनी मर्यादित
प्रकाशगड, दुसरा माळा, प्रा. कानेकर मार्ग,
बांद्रे (पूर्व) मुंबई 51. ..... **उत्तरवादी**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक 6/1/2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी गैरहजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 11.2.2006 रोजी माहिती मिळण्यासाठी एकुण चार अर्ज करुन विविध प्रकारची माहिती मागितलेली होती. त्यापैकी अपीलकर्ता यांनी दिलेले अर्ज क्रमांक 83 व 84 मध्ये त्यांना माहिती मिळालेली आहे असे त्यांनी सांगितले व त्यांचा अर्ज क्रमांक 81 व 82 मध्ये त्यांना माहिती उपलब्ध करुन न देता रु. 5000/– एवढा खर्च येईल कारण मागील वर्षी अतिवृष्टी झाल्यामुळे कंपनीच्या तळघरात ठेवलेले अभिलेख/कागदपत्रे नष्ट झाली आहेत. तरी सर्व माहिती संकलित करण्यासाठी वेळ लागेल तसेच हया सर्व माहिती शोधण्यासाठी लागणारे मनुष्यबळ व इतर बाबींसाठी साधारणतः रु. 5000/– खर्च येईल असे चार अर्जाच्या बाबत कळविलेले दिसून येते. सदरच्या निर्णयाविरुध्द अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दि. 17.10.2006 रोजी दाखल केले होते. सदरच्या अपीलाच्या निर्णयामध्ये माहिती अधिकारी यांनी रु. 5000/– ची मागणी करतांना यासंदर्भातील माहितीसाठी लागणा–या खर्चाचा तपशिल दिलेला नसल्यामुळे सदर आदेश रद्य करण्यात आला असून माहिती अधिकारी यांना निर्देश देण्यात आला आहे की त्यांनी माहिती पुरविण्यासाठी लागणा–या खर्चाचा तपशिल जर देता येत असेल तर तुम्हास कळवावा व नियमानुसार वेळेवर तुमच्या अर्जावर कारवाई करावी असा निर्णय पत्र क्र. 15776 दि. 17.11.2006 रोजी दिलेला दिसतो. त्यानंतर दि. 20.11.2006 रोजी पत्र क्र. 15852 अन्वये खर्चाचा तपशिल कळवण्यात आलेला आहे व त्यात सदरच्या कामासाठीचा खर्च रु. 1 लाख इतका होत असतांना आपणास उपरोक्त माहितीसाठी रु. 5000/– ही कमीतकमी खर्चाची मागणी केलेली आहे. तरी आपणास कळविण्यात येते की उपरोक्त खर्चाची रक्कम रुपये आपल्या स्थानिक महानिर्मिती कंपनीच्या कार्यालयात भरुन पैसे भरल्याची पावती सादर करावी किंवा रु. 5000/– चा डिमांड ड्राफ्ट कार्यालयास सादर करावा. जर आपण रु. 5000/– भरले तर आपणास माहिती पूरविण्यात येईल. त्यानंतर दि. 18.12.2006 रोजी पुन्हा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविण्यासाठी येणा–या खर्चाची मागणी केलेली आहे ती नियमाप्रमाणे योग्य आहे. सदर प्रकरणी त्यांना संरक्षण देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाने व्यथित होवून अपीलकर्ता

यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले असून माहिती न देता येण्याचे टाळण्याचे एकमेव उद्येशाने त्यांना रु. 5000/- ची मागणी केलेली आहे ही केलेली मागणी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या चॅप्टर 2 मधील कलम 4 च्या विसंगत आहे असे नमुद केले आहे.

3. अपीलकर्ता यांनी त्यांना स्वतः दिलेल्या अर्ज क्र. आदिम/2006/81, आदिम/2006/82 यामध्ये मागणी केलेल्या माहीतीचे स्वरुप पाहता सदरची माहिती ही विस्तृत व व्यापक स्वरुपात आहे असे दिसून येते. त्याचप्रमाणे अपीलकर्ता यांनी जो तक्ता दिलेला आहे त्या तक्त्यात माहिती संकलित करुन त्यांनी मागणी केलेली दिसून येते. सदरची माहिती ही संपूर्ण महाराष्ट्रातील महानिर्मिती कंपनीमधील राज्य स्तरीय तांत्रिक व अतांत्रिक पदाबद्यलची माहिती दिसून येते. सदरची माहिती ही त्यांनी आदिम कर्मचारी संघटनेचे सरचिटणीस म्हणून मागितलेली आहे. वास्तविक माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 2 मधील ''माहिती'' व ''माहितीचा अधिकार'' या दोन संज्ञांच्या व्याख्येप्रमाणे जर निकषावर तपासून बघितले तर माहिती तयार करुन उपलब्ध करुन देणे अपेक्षीत नाही. ''माहिती'' याचा अर्थ कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये अभिलेखे, दस्तऐवज, ज्ञापने, ईमेल, अभिप्राय, सुचना, प्रसिध्दी पत्रके, परिपत्रके, आदेश, नोंदवहया, संविधा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही ईलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधार सामुग्री यांचा समावेश होतो. तसेच ''माहितीचा अधिकार'' याचा अर्थ कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली किंवा त्यांच्या नियंत्रणात असलेली व या अधिनियमान्वये मिळवता येण्याजोगी माहिती मिळविण्याचा अधिकार असा आहे आणि त्यात (एक) एखादे काम, दस्तऐवज, अभिलेख यांची पाहाणी करणे (दोन) दस्तऐवजाच्या किंवा अभिलेखाच्या टिपण्या, उतारे किंवा प्रमाणीत प्रती घेणे (तिन) सामग्रीचे प्रमाणीत नमुने घेणे, डिस्केटस्, फ्लॉपी, टेप, व्हिडीओ कॅसेट या स्वरुपातील किंवा कोणत्याही अन्य ईलेक्ट्रॉनिक प्रकारातील माहिती साठविलेली असेल त्याबाबत मुद्रित प्रती मार्फत माहिती मिळवणे याबाबतच्या प्रकाराचा समावेश होतो. यावरुन माहिती संकलित करुन उपलब्ध करुन देणे हे दोनही

व्याख्येमध्ये येत नाही असे दिसून येते. त्याचप्रमाणे अपीलकर्ता यांनी वर्ष 2000 पासून जी माहिती मागितलेली दिसून येते याचा अर्थ सात वर्षाची माहिती ही त्यांना संकलित करुन पाहिजे आहे असे दिसते. अपीलकर्ता यांनी अधिनियमाच्या कलम 4 प्रमाणे माहिती उपलब्ध असली पाहिजे असे प्रतिवादन केले परंतु अधिनियम हा मुळात 12.10.2005 रोजी अंमलात आलेला असल्यामुळे त्यापूर्वीची माहिती त्याप्रमाणे संकलित झालेली असेलच असे नाही. तसेच माहिती मागणा–याला कारण विचारता येत नाही हे खरे असले तरी व्यापक व विस्तृत माहिती मागीतली जाते तेव्हा सार्वजनिक जनहित याचाही विचार करावा लागतो. ही माहिती कर्मचारी संघटनेचे सरचिटणीस म्हणून मागितलेली आहे व महानिर्मिती कंपनीमध्ये असलेल्या पदांमध्ये मागास वर्गीयांचे प्रयोजन आरक्षण योग्य रितीने भरण्यात येते किंवा कसे याबाबत खात्री करुन घेणेसाठी मागितलेली दिसून येते. असे असले तरी ही माहिती माहिती अधिकारी यांनी निर्णय दिल्याप्रमाणे संकलित करुनच उपलब्ध करुन देता येईल व त्याकरीता दि. 20.11.2006 रोजी खर्चाचा तपशिल हा त्यांनी दिलेला दिसतो. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की क्षेत्रीय स्तरावरील माहिती ही राज्य स्तरावर उपलब्ध नसते व त्यामुळे कंपनीच्या महाराष्ट्रातील सर्व 27 विद्युत निर्मीती केंद्रांमधून ही माहिती उपलब्ध करुन द्यावी लागेल व त्यावरुनच खर्चाचा तपशिल दिलेला दिसून येतो. ''माहिती'' व ''माहितीचा अधिकार'' या संज्ञाच्या व्याख्येप्रमाणे महाराष्ट्रातील चतुर्थश्रेणी कर्मचा–यापासून ते व्यवस्थापकीय संचालकाच्या पदापर्यंत सर्व पदांची माहिती उपलब्ध करुन देण्याचे झाले तर झेराक्स प्रतींचा खर्च 1 लाखापेक्षा जास्त येईल हा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांनी अर्जासोबत जोडलेल्या तक्त्यामधील राज्य स्तरावरील पदांच्या संदर्भात राज्य स्तरावर उपलब्ध असलेली माहिती त्यांना मिळाली तरी त्यांचे समाधान होईल असे त्यांचे म्हणणे आहे. त्याप्रमाणे राज्य जन माहिती अधिकारी तथा आस्थापना अधिकारी (मा.स.2) यांनी अपीलकर्ता यांना राज्य स्तरीय पदाची माहिती उपलब्ध करुन देणे शक्य आहे हे विचारले असता ती उपलब्ध करुन

देणे शक्य होईल व तसे असल्यास संयुक्तिक राहिल. त्याकरीता पुन्हा सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता छायांकीत प्रतींचा जो खर्च येईल तो खर्च कंपनीने केलेले नियमाप्रमाणे असेल त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना कळवून माहिती उपलब्ध करुन देणे योग्य राहिल.

## <u>आ दे श</u>

1) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांनी दि. 11.9.2006 च्या आदिम/2006/81 व आदिम/2006/82 या अर्जामध्ये मागितलेल्या माहितीच्या प्रमाणे राज्य स्तरीय अधिकारी यांची माहिती उपलब्ध करुन द्यावी.

2) सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यापूर्वी माहितीच्या व्यापकतेचा अंदाज घेवून छायांकित प्रतींच्या खर्चाप्रमाणे त्यांना खर्चाच्या बद्यल कळविण्यात यावे.

3) अपीलकर्ता यांनी माहिती अधिकारी यांनी खर्च कळविल्यानंतर व खर्चाचा भरणा केल्यानंतर व्यक्तीशः माहिती उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 25.10.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 566/2007.**

श्री विश्वास आत्मारामजी क्षिरसागर,
73 अ,ब, सन्मार्गनगर, क्र.2, प्रभाग क्र.7,
हुडकेश्वर रोड, नागपूर. ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अपर निगमायुक्त,
नागपूर महानगर पालिका, नागपूर.

2) जन माहिती अधिकारी तथा
उप निगमायुक्त (आरोग्य व स्वच्छता)
नागपूर महानगर पालिका, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 23/9/2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी अनुमतिशिवाय गैरहजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 13.7.2006 रोजी राज्य जन माहिती अधिकारी नागपूर महानगर पालिका सिव्हील लाईन्स नागपूर यांचेकडे माहिती 1) कम्पोस्ट डेपो 2) डम्पींग ग्राऊण्ड 3) कचरा भराव हे तिन्ही शब्द समानार्थी असल्याचे कोणत्या कायद्याचे आधारे

सांगत आहे त्याची लेखी प्रत देण्यात यावी. (पत्र क्र. एचओ/1694 एम आय एस सी दि. 18.2.2005) 2. अर्जदारास दि. 9.12.2004 चे अर्जावरील कारवाईची माहिती द्यावी. अशी माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक 20.7.2006 रोजी उप निगमायुक्त नागपूर महानगर पालिका नागपूर यांनी उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कम्पोस्ट डेपो, डम्पींग ग्राऊण्ड, कचरा भराव हे तिन्ही शब्द समानार्थी असल्याचे कायद्याची लेखी प्रत कार्यालयात उपलब्ध नाही अशी माहिती दिलेली दिसून येते. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी दिनांक 26.7.2006 रोजी अपीलीय अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त नागपूर महानगर पालिका यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले होते. सदरच्या प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या सेदर्भात अपीलकर्ता यास उपस्थित राहण्याकरीता दि. 27.7.2006 रोजी नोटिस काढलेली दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 10.8.2006 रोजी दिलेला असून माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती बरोबर असल्याचे प्रदुषन नियंत्रण मंडळाद्वारे व घनकचरा व्यवस्थापन पुस्तीकेद्वारा स्पष्ट झालेले आहे त्याअर्थी प्रस्तूत अपील निकाली काढण्यात येते असा निर्णय दिलेला आहे. सदरच्या निर्णयाने व्यथित होवून अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी दि. 13.7.2006 रोजी मागितलेल्या माहितीच्या अर्जाप्रमाणे विहीत मुदतीत जरी त्याला उत्तर दिलेले असले तरी माहिती मुद्या क्र. 1 अपूर्ण व मुद्या क्र. 2 ची माहिती दिलीच नाही असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे व ते दि. 20.7.2006 चे उत्तर पाहिल्यास स्पष्ट दिसून येते. अपीलकर्ता यांना विचारले असता माहिती अपूर्ण आहे म्हणजे काय तर त्यांनी Manual on Muncipal Solid Waste Management (First Edition) Prepared by the Expert Committee Constituted by the Government of India Ministry of Urban

Development and Central Public Health and Environmental Engineering Organisation May 2000 हया मॅन्युअलची प्रत दाखविली. तसेच Solid Waste Management in Class I Cities in India Report of the Committee constituted by the Hon. Supreme Court of India March 1999 ची प्रत सुध्दा सादर केली व त्यातील Chapter 17 Landfills ची प्रत ही अपीलाच्या सुनावणीत दिली असेही त्यांनी सांगितले. प्रथम अपीलाच्या निर्णयाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की अपीलकर्ता यांनी त्यांचे 14.7.2006 चे अर्जात जी माहिती मागितलेली आहे त्याचा विचार केलेला दिसून येत नाही व फक्त प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ नागपूर यांचेशी दूरध्वनीवरुन चर्चा करुन म.न.पा. चे घनकचना व्यवस्थापन करण्यासाठी जी जागा वापरली जाते त्यासाठी तिनही शब्द समानार्थी म्हणून वापरण्यात येते असे संक्षीप्त प्रकरणात परिच्छेद 4 मध्ये दिलेले दिसून येते. तसेच परिच्छेद 5 मध्ये Manual on Solid Waste Management च्या परिच्छेद 17.4.1 (location criteria) प्रमाणे घनकचरा व्यवस्थापन जागा रहिवासी क्षेत्रापासून कमीत कमी 500 मी. पेक्षा जास्त अंतरावर असला पाहिजे असे स्पष्ट करण्यात आलेले आहे. वरील माहिती अपीलार्थीला सांगण्यात आली असून माहिती दाखविण्यात आली आहे त्याची छायाप्रतसुध्दा देण्यात आलेली आहे असे स्पष्टीकरण करण्यात आलेले दिसून येते व त्यावरुन अपील निकाली काढण्यात आलेले दिसते.

4. राज्य जन माहिती अधिकारी तथा उपआयुक्त महानगर पालिका यांनी दिनांक 20.7.2006 रोजीची माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली आहे ती निश्चितच अपूर्ण आहे व तसेच दि. 9.12.2004 च्या अर्जाच्या संदर्भात झालेल्या कारवाईबद्यल माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे माहिती अधिकारी हे माहितीचा अधिकार

अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) प्रमाणे दोषी आढळून येतात. तसेच प्रथम अपीलाचा निर्णय देतांनासुध्दा प्रथम अपीलीय अधिकारी तथा अपर आयुक्त महानगर पालिका यांनी कोणत्या मुद्यावर निर्णय द्यावयाचा आहे याचेही त्यांना आकलन झालेले दिसून येत नाही. एकतर दि. 9.12.2004 रोजी केलेल्या अर्जावर कारवाई काय झाली याबद्दल कुठेही सुतोवाच नाही. व प्रथम अपील हे अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या माहितीच्या संदर्भात असल्यामुळे त्याबाबतचा निर्णय न देता गुणवत्तेवर निर्णय देण्याचा प्रयत्न केला आहे त्यातूनही निष्पन्न असे काहीही झालेले दिसून येत नाही. व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी हे स्वतः माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदींचा अभ्यास न करता निर्णय देतात असे दिसून येते. वर विवेचनात निष्कर्ष काढल्याप्रमाणे तत्कालीन राज्य जन माहिती अधिकारी तथा उप आयुक्त हे दोषी आढळून येत आहे परंतु महानगर पालिकेतर्फे आज आयोगाच्या कार्यालयातून नोटिसेस् काढून सुध्दा हजर न राहिल्यामुळे त्यांचे विरुध्द शास्ती लादण्याचे संदर्भात अधिनियमाच्या कलम 1 च्या परंतूकाप्रमाणे त्याचे म्हणणे एकुन घेवून त्यांना संधी देणे आवश्यक राहिल तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलाची प्रत्यक्ष सुनावणी घेवून माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने निर्णय देणे हे आवश्यक असल्यामुळे आयुक्त महानगर पालिका यांनीसुध्दा याबाबत देखल घेवून त्याप्रमाणे आदेश काढणे आवश्यक झाले आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 13.7.2006 रोजीच्या माहितीच्या अर्जाप्रमाणे दोन मुद्यांवर हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आत सुस्पष्ट अशी माहिती माहिती उपलब्ध करुन द्यावी.

2) तात्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप आयुक्त महानगर पालिका यांनी अपीलकर्ता यांच्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांना अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 500/— ही शास्ती कां लादण्यात येवू नये याबद्यलचा खुलासा त्यांनी किंवा आयुक्त महानगर पालिका यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसात आयोगाकडे खुलासा करावा.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 29.10.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 569/2007.**

श्री विकास गणपतराव शेंडे
एल–87, 128 सोमवारी पेठ,
एल.आय.जी. मानेवाडा रोड, नागपूर. ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यपालन अधिकारी
जिल्हा परिषद वर्धा

2) जन माहिती अधिकारी,
मुख्य कार्यपालन अधिकारी
जिल्हा परिषद वर्धा ..... **उत्तरवादी**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक 6/10/2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 1.7.2006 रोजी माहिती अधिकारी, मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद वर्धा यांचेकडे 12 वर्षाच्या कालावधीची माहिती मिळणेसाठी परिशिष्ट मध्ये 8 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. सदरची माहिती ही सौ. विमल गणपतराव शेंडे रिटायर्ड शिक्षिका यांचेबद्यल असून 1962 पासूनची माहिती मागितलेली

आहे. सदरचा अर्ज हा संबंधित माहिती अधिकारी यांचेकडे दि. 11.7.2006 रोजी प्राप्त झालेली दिसून येते. सदरची माहिती विहीत मुदतीत न मिळाल्यामुळे दिनांक 16.8.2006 रोजी अपीलीय अधिकारी मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद वर्धा यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. अपीलकर्ता यांच्या सदरच्या अर्जाच्या संदर्भामध्ये दि. 21.8.2006 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसते. दि. 21.8.2006 रोजी माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे प्रथम अपीलाची सुनावणी घेतलेली दिसून येत नाही त्यामुळे व्यथित होवून अपीलकर्ता यांनी दि. 6.10.2006 रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे. द्वितीय अपीलाच्या सोबत परिशिष्ट अ मध्ये 5 मुद्यांमध्ये खुलासा केलेला दिसतो व तसेच कारवाई करुन 32 वर्षाच्या प्रदीर्घ कालावधीत संबंधितास पदोन्नती न मिळणे कसे शक्य आहे. निवडश्रेणी तसेच कनिष्ठ प्रशिक्षित शिक्षकाची वेतनश्रेणी व वरिष्ठ प्रशिक्षित शिक्षकाची वेतनश्रेणी देवून वरील शिक्षिका ही प्रशिक्षित शिक्षिका म्हणून होती असे अनुमान काढुन दिलेले दिसते. पुनर्वेतन निश्चित करुन थकबाकी 18 टक्के व्याजासह देण्यात यावी अशी मागणी केलेली आहे. तसेच माहितीचा कालावधी हा 32 वर्षाचा असल्यामुळे मुद्या क्र. 4 मध्ये शक्यअशक्य अशा बाबतीतील मुद्या काढलेला दिसतो. तसेच पुर्वी काय करावयास पाहिजे होते याबद्यलचे सर्व मुद्ये काढलेले दिसते. व अपीलकर्ता यांनी काढलेल्या मुद्याच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून व उशिराने माहिती उपलब्ध करुन दिली म्हणून शास्ती लादणे व व्याजाची भरपाई अधिका–याकडून मिळावी असे अपेक्षित केलेले आहे.

3. एकुणच अपीलकर्ता यांच्या या संपूर्ण प्रकरणामध्ये श्रीमती शेंडे हया 1962 मध्ये शिक्षिका लागल्यापासून तर 1995 मध्ये सेवानिवृत्त होईपर्यंतच्या काळातील मिळालेल्या माहितीच्या आधारे कारवाई करुन मिळावी ही त्यांची अपेक्षा दिसून येते. त्याकरीता माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या उद्येशाचे स्पष्टिकरण करणे आवश्यक आहे. अधिनियमाच्या संपूर्ण तरतूदीप्रमाणे कोणत्याही तरतुदीमध्ये कोणत्याही प्रकरणात कारवाई

करुन मिळावी हे अपेक्षित नाही. ''माहिती'' व ''माहितीचा अधिकारी'' या संज्ञांच्या व्याख्येमध्ये माहिती ज्या स्वरुपात सार्वजनिक प्राधिकरणात उपलब्ध असेल उदा. अभिलेखे, दस्तऐवज, नकाशे इत्यादी त्या स्वरुपात ती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. अभिलेख्यामधून माहिती काढून तयार करुन देणे हेही अपेक्षित नाही. अपीलकर्ता यास अर्जदार म्हणून जी माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध करुन दिलेली असेल त्या उपलब्ध माहितीच्या आधारे त्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे संबंधित योग्य त्या अधिका–याकडे तक्रार करणे व न्याय मिळवून घेणे अशा प्रकारची ही संकल्पना आहे. व त्यामुळे द्वितीय अपील मेमोच्या परिशिष्ट मध्ये अपीलकर्ता यांना 32 वर्षाच्या सेवा काळामधील झालेल्या तक्रारीच्या कार्यवाहीबद्यल माहिती न विचारता शक्याशक्यतेवरती प्रश्न उपस्थित करुन कारवाईची किंवा व्याजाची मागणी करणे हे अधिनियमाच्या कक्षेत येत नाही.

4. आता प्रश्न उरतो तो अपीलकर्ता यांनी जी माहितीच्या अर्जाप्रमाणे जी माहिती मागितलेली आहे ती त्यांना विहीत मुदतीत उपलब्ध करुन दिलेली आहे किंवा नाही. त्याकरीता पुन्हा अर्जदारानी माहिती मिळण्याचा जो अर्ज आहे तो योग्य त्या संबंधित माहिती अधिका–याकडे माहिती मागितलेली आहे किंवा नाही हे तपासून पाहाणे. माहितीचा अर्ज मोघम स्वरुपात कोणत्याही अधिका–याकडे करणे व अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे तो त्या माहिती अधिका–याने संबंधित माहिती अधिका–याकडे हस्तांतर करणे व माहिती मुदतीत अपेक्षित करणे व पुन्हा माहिती विलंबाने मिळाली ही तक्रार करणे हे अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे नाही. माहिती विहीत मुदतीत उपलब्ध होण्याच्या उद्येशाने माहिती ज्या स्तरावर उपलब्ध आहे त्या स्तरावर माहिती अधिका–याची नियुक्ती करण्यात आलेली आहे. व त्या संबंधित माहिती अधिका–याकडे अर्ज केल्यासच माहिती विहीत मुदतीत उपलब्ध झाली किंवा नाही हे तपासून पाहाणे संयुक्तिक ठरते. अर्जदाराने अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे अर्ज करावयाचा नाही व पुन्हा माहिती विहीत

मुदतीत उपलब्ध झाली नाही ही तक्रार करावयाची हे अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे सुसंगत नाही. त्यातही माहिती मागतांना कोणत्याही प्रकारचे काल्पनिक प्रश्न किंवा शक्याशक्यतेचे प्रश्न किंवा मोघम माहिती खुलासेवार मागणे हेही अपेक्षित नाही. सद्यः प्रकरणामध्ये श्रीमती शेंडे यांच्या सेवापुस्तीकेवरती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. श्रीमती शेंडे हया 30.4.95 ला सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांचे सेवापुस्तक लेखागारात ठेवण्यात आले होते. व त्यामुळे 11 वर्षे जुने सेवापुस्तक शोधावयास थोडा उशिर झाला असे खुलाशामध्ये म्हटलेले आहे. तसेच श्री विकास शेंडे यांना ही माहिती प्राप्त झाली आहे ती माहिती याआधीही वेळोवेळी त्यांना पुरविण्यात आलेली आहे असा खुलासा माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद वर्धा यांनी केलेला आहे. अपीलकर्ता हे नागरीमंच अजनी मानेवाडा शाखा नागपूर चे अध्यक्ष आहे व पुन्हा त्यांना दि. 6.10.2006 रोजी मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद वर्धा, संचालक प्राथमिक शिक्षण संचालनालय पुणे हयांच्याकडे उपलब्ध झालेल्या माहिती वरुन तक्रार केलेली दिसून येते. त्याचप्रमाणे दि. 3.10.2007 रोजीसुध्दा त्यांना त्यांच्या अर्जाप्रमाणे मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद वर्धा यांनी माहिती दिलेली दिसून येते. व त्यात स्पष्टपणे सौ. विमल शेंडे यांच्या वेतनश्रेणीच्या संदर्भामध्ये उत्तर दिलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी मिळालेली माहिती चुकीची आहे वगैरे हे संयुक्तिक वाटत नाही. द्वितीय अपीलाच्या परिशिष्ट मध्ये उपस्थित केलेल्या माहितीच्या अनुषंगाने त्यांच्या दि. 6.10.2006 चा अर्ज आहे व त्यास मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद वर्धा यांनी दिलेले उत्तर हे स्वयंस्पष्ट दिसून येते. त्यात त्यांनी उपस्थित केलेल्या सर्व प्रश्नांवर निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती ही उपलब्ध झालेली आहे व त्यानंतर त्यावर कारवाईपण झालेली आहे त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना त्यांच्या माहितीच्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 29.10.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 571/2007.**

डॉ. देवराम विठोबा नंदनवार,
''तथास्तू'' प्लॉट नं. 37, भांडे प्लॉट,
उमरेड रोड, नागपूर. ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) श्री एस. एस. चव्हाण
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसंचालक (सं.) तथा सदस्य सचिव,
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती
गिरीपेठ नागपूर.

2) जन माहिती अधिकारी,
उपसंचालक (सं.) तथा सदस्य सचिव,
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती
गिरीपेठ नागपूर. ..... **उत्तरवादी**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक 26/10/2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 14.7.2006 रोजी शासकीय माहिती अधिकारी उपसंचालक (सं.) तथा सदस्य सचिव, अनुसूचित जमाती जात प्रमाणपत्र तपासणी

समिती यांचेकडे हलबा/हलबी जातीचे वैधता प्रमाणपत्र वितरणाबाबत 1) नागपूर विभाग (महसूल) अंतर्गत जानेवारी 2002 ते डिसेंबर 2004 या दोन वर्षात अनुसूचित जमाती मधील हलबा किंवा हलबी हया जातीच्या वैधता प्रमाणपत्र वितरीत केलेल्या एकुण प्रमाणपत्रांची संख्या किती आहे. 2) ज्या हलबा आणि हलबी अर्जदाराना वैधता प्रमाणपत्रे दिली त्यांचे नाव, वैधता प्रमाणपत्राचा अनुक्रमांक, केस नंबर व जे जातीचे प्रमाणपत्र वैध ठरविले त्या जात प्रमाणपत्राचा रेव्हेन्यु केस नं. व सक्षम अधिका–याचे पदनाम व कार्यालयाचे नाव ही सर्व माहिती उपलब्ध करुन द्यावी. माहिती नोंदणीकृत डाकेने घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 18.8.2006 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मधील कलम 2 (च)/2 (झ) (एक) शासनाच्या अभिलेख्यामध्ये उपलब्ध असलेली माहिती कागदपत्राच्या स्वरुपात पुरवणे अपेक्षित आहे. या संदर्भात आपणास यापूर्वीही कळविण्यात आलेले आहे. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 8.9.2006 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी उपसंचालक संशोधन यांचेकडेच पुन्हा प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथत अपीलाचा निर्णय दि. 10.9.2006 रोजी दिलेला असून माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम केलेला आहे तसेच आपणास पुरवावयाची माहिती ही शासकीय प्राधिकरणाच्या साधनसामुग्रीच्या प्रमाणाबाहेर असल्याने 7 (9) मधील नियमाचे तरतूदीनुसार नाकारण्यात येत आहे. सदरच्या निर्णयाने व्यथित होवून द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता यांनी दि. 14.6.2006 च्या अर्जाप्रमाणे मागितलेल्या माहितीचे स्वरुप पाहता नागपूर विभाग महसूल अंतर्गत जानेवारी 2002 ते डिसेंबर 2004 या दोन वर्षातील हलबाा किंवा हलबी या जातीच्या वैधता प्रमाणपत्र केलेल्या एकुण प्रमाणपत्रांची संख्या किती आहे असे विचारले व त्यानंतर वैधता प्रमाणपत्रे त्यांचे नाव, वैधता प्रमाणपत्राचा अनुक्रमांक, केस नंबर व जे जातीचे प्रमाणपत्र वैध ठरविले त्या जातीचा रेव्हेन्यू केस नं. इत्यादी वरीलप्रमाणे उपलब्ध करुन द्यावी त्यावरुन असे दिसून येते की सदरची माहिती ही

विस्तृत, व्यापक प्रमाणात असून ती तयार करुन द्यावी लागेल असे उत्तरवादी यांनी सांगितले. सदरच्या माहितीच्या संदर्भामध्ये माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की अनुसुचित जमातीच्या संदर्भात फक्त हलबा, हलबी या जमातीतील आलेल्या अर्जातील माहिती अशी स्वतंत्र जतन केली जात नाही किंवा सलग अशी संगणकावर घेतली जात नाही. सर्व अनु. जमातीमध्ये ज्या इतर जमाती आहेत व त्याप्रमाणे जे अर्ज येतील त्याप्रमाणे त्या अर्जाची नोंद केलेली असते त्यामुळे प्रत्येक हलबा किंवा हलबी या अर्जाच्या संदर्भात संगणकावरुन किंवा नस्तीवरुन सुध्दा त्याकरीता दोन वर्षाच्या कालावधीतील 21000 नस्त्या तपासून मगच त्या प्रमाणपत्राच्या संदर्भात विचारलेली तपशिलवार माहिती द्यावी लागेल व त्यामुळे उत्तर दिलेले आहे. तसेच प्रथम अपीलातसुध्दा अधिनियमाच्या कलम 7 (9) प्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणाची यंत्रणा प्रमाणाबाहेर वळवावी लागेल याचा अर्थ माहिती उपलब्ध करुन तयार करुन देण्यास मनुष्यबळ ब–याच मोठया प्रमाणात प्रत्येक नस्थी काढुन संकलीत करुन द्यावी लागेल हे उत्तरसुध्दा त्याच उद्येशानी दिलेले आहे. त्यावरुन अधिनियमाच्या कलम 2 (च) मध्ये ''माहिती'' या संज्ञाची व्याख्या तपासून पाहाणे आवश्यक ठरते. ''माहिती'' याचा अथ्र कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये अभिलेखे, दस्तऐवज, ज्ञापने, ईमेल, अभिप्राय, सुचना, प्रसिध्दीपत्रके, परिपत्रके, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही ईलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामुग्री यांचा समावेश होतो. तसेच उत्तरात दिलेल्या प्रमाणे झ (1) ''अभिलेख'' या संज्ञेच्या व्याख्येमध्येसुध्दा कोणताही दस्तऐवज, हस्तलिखीत व फाईल, एखाद्या दस्तऐवजाचा सुक्ष्मपट, सुक्ष्मपटात संग्रहीत केलेल्या प्रतींची नक्कल, संगणकाद्वारे किंवा कोणत्याही अन्य उपकरणाद्वारे तयार केलेले कोणतेही अन्य साहित्य यांचा समावेश होतो. या व्याख्येवरुन असे दिसून येते की माहिती तयार करुन उपलब्ध करुन देणे अपेक्षित नाही. माहिती अधिकारी यांनी खुलासा करतांना अपीलकर्ता व त्यांची पत्नी सौ. यशस्वी देवराम नंदनवार (हेडाऊ) यांनी दाखल

केलेल्या व आयोगानी निर्णय दिलेल्या अपील क्र. 288/2007, अपील क्र. 549/2007 हे निर्णय निदर्शनास आणले आहे. व सदरच्या अपीलामध्ये हलबा/हलबी यांची माहिती मागितलेली असल्यामुळे माहिती अधिकारी यांचा निर्णय योग्य आहे असे मान्य करुन अपीलकर्ता यांचे अर्ज फेटाळण्यात आलेले आहेत व निर्णयाच्या प्रति सोबत जोडलेल्या आहेत. ''डॉ. देवराम विठोबा नंदनवार यांनी जन माहिती अधिकारी यांना उद्येशून लिहिलेले दि. 22.6.2006 च्या अर्जात उपस्थित केलेले मुद्ये व सौ. यशस्वी देवराम नंदनवार यांनी मिळून एकाच विषयाबाबत आळीपाळीने वेगवेगळया अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी यांना दोघांचे मिळून एकुण 20 अर्ज सादर केलेले आहे. '' तसेच अपील क्र. 549/2007 मध्ये या सर्व मुद्याच्या संदर्भामध्ये विवेचन झालेले आहे. सदरच्या अपील क्र. 549/2007 च्या संदर्भामध्ये व्यापक लोकहित किंवा सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधाशी काय संबंध आहे याबाबत अपीलकर्ती यांना विचारले असता त्यांनी सुरुवातीला त्यांचे स्वतःचे मा. उच्च न्यायालयामध्ये रिट असल्यामुळे आवश्यक आहे असे सांगितले व त्यानंतर समितीने आता पर्यंत प्रमाणपत्रे दिलेली आहेत ती खरोखरच निकषानुसार दिली आहे किंवा नाही व मा. उच्च न्यायालयामध्ये व मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये हजारोनी प्रकरणे प्रलंबित आहे त्याबाबत त्यांना पी आय एल दाखल करण्याच्या दृष्टीने माहितीची आवश्यकता वाटते वगैरे विवेचन आलेले आहे. याकरीता सदरच्या निर्णयाच्या परिच्छेद 4 मध्ये समितीच्या कामकाजाबद्यलची कार्यपध्दतीबद्यल सविस्तररित्या विवेचन करण्यात आलेली आहे व त्याप्रमाणे सदरचा निर्णय हा स्वयंस्पष्ट आहे व त्यामुळेच सदरचे अपील हे फेटाळण्यात आल्याचा निर्णय देण्यात आला. अपील क्र. 228/2007 हे सुध्दा डॉ. देवराम विठोबा नंदनवार अपीलकर्ता म्हणून आहेत व त्यामध्ये सुध्दा माहिती अधिकारी यांचा निर्णय योग्य आहे असा निष्कर्ष काढून अपील फेटाळण्यात आले आहे. त्यामुळे पुन्हा पुन्हा तेच विवेचन करण्याची आवश्यकता वाटत नाही त्यामुळे सदरच्या अपीलातसुध्दा माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय हा योग्य दिसून येतो व अपील हे फेटाळण्यास पात्र आहे असे दिसून येते.

5

**आ दे श**

1) अपीलकर्ता त्यांचे दि. 8.9.2006 च्या अर्जाच्या संदर्भात दि. 19.8.2006 रोजी जो निर्णय माहिती अधिकारी यांनी दिलेला आहे तसेच दि. 10.9.2006 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जो निर्णय दिलेला आहे तो योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे फेटाळण्या येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 29.10.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती / नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 572 / 2007.**

श्री अशोक नत्थुजी गायकवाड
श्रा. चिचपूरा, वार्ड नं. 1,
ता. सावनेर जि. नागपूर ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) श्री मिलींदकुमार साळवे,
जन माहिती अधिकारी,
उपविभागीय अधिकारी सावनेर
ता. सावनेर जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 3./10/2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी सावनेर हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दाखल केलेल्या द्वितीय अपीलामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या अन्वये दाखल केलेला माहितीचा अर्ज किंवा त्यावरील प्रथम अपील यांचा काहीही उल्लेख नाही. द्वितीय अपील ज्या स्वरुपात दाखल केलेले आहे त्यामध्ये आर टी एस 59/2002–2003 चे अपील मधील प्रतिउत्तरार्थी अतिरिक्त जिल्हाधिकारी नागपूर शमाबाई भैयाजी घोडमारे तेलकामठी माझी शेती 161 फेरफार कोणत्या अधिकाराने बदल दुस–याच्या नावाने लावण्याबाबत महाराष्ट्र शासन विरुध्द

अपील. शेत नं. 161 चा विक्री रजिस्टर स्टॅम्प नं. 140 पेश करण्याबाबत व मी प्रार्थना करतो की माझी शेती मला परत करण्यात यावी हीच माझी प्रार्थना आहे अशा प्रकारचे अपील आयुक्त नागपूर विभाग नागपूर यांचेकडे दाखल केलेले असून त्याची प्रत वर शाईने मुख्य माहिती आयुक्त राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य संबोधून यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) द्वितीय अपील म्हणून पाठविललेली दिसून येते. यावरुन वर नमुद केल्याप्रमाणे सदरचे द्वितीय अपील हे अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीप्रमाणे नाही. सोबत जी कागदपत्रे दाखल केलेली आहेत त्यामध्ये अधिनियमाच्या बद्यलची 7/12 उतारा व अपील मेमोप्रोसेस इ. दाखल केलेल दिसून येते.

3. अपीलकर्ता यांनी दिनांक 17.7.2006 रोजी माझाी शेती दुस–याच्या नावाने का लावण्यात आली शेत नं. 161 फेरफार कोणत्या अधिकाराने केला इत्यादी कारणे हे विभागीय आयुक्त नागपूर विभाग नागपूर, उपविभागीय अधिकारी सावनेर यांचेकडे जोडपत्र अ मध्ये माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये अर्ज दाखल केलेला दिसून येतो. सदरचा अर्ज हा घेतला नाही असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. परंतु त्यावर कोणत्याही प्रकारचा शेरा दिसून येत नाही. त्यानंतरही प्रथम अपील दाखल केलेले दिसून येत नाही. उपविभागीय अधिकारी तथा अपीलीय अधिकारी सावनेर यांनी दाखल केलेल्या खुलाशामध्ये 21.9.2007 रोजी अर्ज टपालाद्वारे प्राप्त झाला. यापुर्वी कुठलाही अर्ज या कार्यालयास प्राप्त झाला नाही असे खुलाशात म्हटलेले आहे. त्याबाबत पुन्हा विचारले असता उपविभागीय अधिकारी तथा अपीलीय अधिकारी यांनी सांगितले की सदरचे प्रथम अपील हे अपीलकर्ता यांनी तहसिलदार सावनेर यांचेकडे दाखल केलेल्या दुस–या अर्जाच्या माहितीच्या निर्णयाच्या विरुध्द आहे. सदरच्या प्रथम अपीलाच्या सुनावणीस अपीलकर्ता यांना बोलावले होते. दि. 26.10.2007 ला माहिती घेवून जाण्याबाबत पत्र दि. 24.10.2007 रोजी कळविण्यात आले आहे परंतु सदरची माहिती घेण्यास अपीलकर्ता आले नाही असे खुलाशात म्हटले आहे.

4. उपविभागीय अधिकारी यांनी पुन्हा तपशिलात खुलासा दाखल केलेला आहे. अर्जदारास श्री अशोक नत्थुजी गायकवाड यांचा दि. 17.7.2007 चा अर्ज कार्यालयात प्राप्त झालेला नाही. अर्जदार यांचे तक्रारीबाबत फेरफार बाबतचे प्रकरण क्र. 5/आरटीएस 59/1999–2000 मौजा हेटी (सु.) मध्ये या कार्यालयाकडून दिनांक 15.12.1999 रोजी आदेश यापूर्वीच पारीत करण्यात आलेले आहे. परंतु आदेशावर अर्जदार यांनी अतिरिक्त जिल्हाधिकारी नागपूर यांचेकडे अपील दाखल केले होते त्यामध्ये दि. 31.3.2005 ला आदेश झालेला आहे. सदरहू आदेशा विरुध्द अपर आयुक्त नागपूर विभाग नागपूर यांचेकडे अपील दाखल केलेले असून प्रकरणाचा अभिलेख या कार्यालयाकडून दि. 26.5.2005 ला अपर आयुक्त नागपूर यांचेकडे सादर करण्यात आला असून प्रकरण सुरु आहे. वरील माहिती अर्जदाराना असूनसुध्दा अर्जदार हे वारंवार तक्रार करीत आहे. तहसिलदार सावनेर यांचेकडे दि. 16.7.2007 रोजी मागितलेल्या माहितीच्या अनुषंगाने दि. 21.9.2007 रोजी दाखल झालेल्या अपीलाच्या संदर्भात उपलब्ध करुन दिलेली माहिती घेणे हे अपीलार्थीच्या दृष्टीने संयुक्तिक राहिल.

सद्य द्वितीय अपील हे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीच्या अनुषंगाने खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता त्यांचे द्वितीय अपील हे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये नसल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दिनांक 30.10.2007

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 574/2007.**

श्री मनोहर मारुतीराव कुळकर्णी
रा. देवराव बाब चाळ, राजपूतपूरा,
मु. पो. ता. जि. अकोला ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपकार्यकारी अभियंता,
जिल्हा परिषद बांधकाम विभाग, अकोला
ता. जि. अकोला.

2) श्री पी. एल. राऊत
जन माहिती अधिकारी,
उपकार्यकारी अभियंता,
जिल्हा परिषद बांधकाम विभाग, अकोला
ता. जि. अकोला. ..... **उत्तरवादी**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक 17/2/2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी म्हणून उपकार्यकारी अभियंताच या सुनावणीस हजर आहे असे उपकार्यकारी अभियंता यांचे म्हणणे आहे त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांचा कोणत्याही प्रकारचा

किंवा प्रथम अपीलाचा निर्णयाबद्यलचा खुलासा या सुनावणीस दाखल केलेला दिसून येत नाही.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 3.10.2006 रोजी 1) स्थापत्य अ) सहा. पद निर्मिती बाबत प्राप्त शासन मंजूरातीच्या पत्रांच्या सत्यप्रती 2) जाने. 01 ते 06 अनुरेखकांची जेष्ठता यादीची सत्य प्रत. 3) सी.आर.टी. आस्थापनेवरील सहा. कनिष्ठ अभियंता यांना सामावून न घेण्याबाबतचा आधारभूत दस्तऐवजाची सत्यप्रत. ही माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 2.11.2006 रोजी विहीत मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसते. परंतु सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 15.11.2006 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील सादर केलेले दिसून येते. प्रथम अपीलामध्ये मुद्या क्र. 2 व 3 हे नवीन दिसून येतात. मात्र मुद्या क्र. 1 च्या संदभामध्ये त्यांना माहिती उपलब्ध झालेली नव्हती हा मुद्या कायम आहे. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक 14.12.2006 रोजी एकुण 12 पुष्ठासाठी रु. 24 चा भरणा करावा व माहिती घेवून जावी असे माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. परंतु दिनांक 15.12.2006 रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरच्या माहितीने पुन्हा समाधान न झाल्याने सदरचे व्दितीय अपील दाखल करण्यात आलेले आहे.

3. अपीलकर्ता यांच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 2.11.2006 रोजी मुद्या क्र. 3 वरची माहिती पुरविण्यात आलेली आहे चुकीची आहे असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे व ती तशी प्रथमदर्शनीच चुकीची दिसून येते. अर्जदारास पूर्वी माहिती उपलब्ध करुन दिली असली तरी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या अन्वये अर्ज केल्यानंतर माहिती उपलब्ध करुन देतांना ती स्पष्टपणे उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. सदरची माहिती आपण मागणी केल्याप्रमाणे हयापूर्वीच आपणास देण्यात आलेली आहे. हे जरी क्षणभर खरे धरले तरी अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की पूर्वी कोणतीही माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली नाही व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले

दिसून येते. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आलेली दिसून येत नाही. व दि. 15.12. 2006 रोजी मुद्या क्र. 1 बद्यलची माहिती अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी उपलब्ध करुन दिलेली दिसते त्यावरुन ज्या आदेशाची सत्यप्रत अपीलकर्ता यांनी मागितली होती असे आदेश अस्तित्वात नाही असे दिसून येते. याचा अर्थ माहितीच्या अर्जाप्रमाणे मुद्या क्र. 3 ची जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती चुकीची आहे. प्रथम अपीलातसुध्दा जी माहिती मुद्या क्र. 1 बाबत उपलब्ध करुन दिली आहे त्यातील शासन निर्णय क्र. /नियुक्ती/1093/प्र क्र/2951 दि. 20 मे 1999 नुसार तांत्रिक स. वर्गाचे सुसुत्रीकरण ग्राम विकास विभागाकडून स्थापत्य अभियांत्रिकी सहा. संवर्गाची नेमनुकी करण्यात आली असून सदर शासन निर्णयाची सहपत्र परिशिष्ट 1 नुसार स्थापत्य अभियांत्रिकी सहा. म्हणून समावेशाद्वारे पदस्थापीत करण्यात आलेले आहे असे कळविण्यात आलेले दिसून येते. यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की हीसुध्दा माहिती चुकीची असुन त्यांनी आदेशाची प्रत मागितलेली होती त्याबाबत माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. मात्र आदेश नसल्याने असेही लिहिलेले असल्यामुळे आदेश नाहीत हे स्पष्ट होते. उपलब्ध झालेल्या माहितीच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना त्यांना त्यावेळच्या सेवेच्या संदर्भात जी तक्रार असेल ती तक्रार त्यांना योग्य त्या अधिका–याकडे करुन किंवा न्यायालयात जावून न्याय मिळवून घेता येईल. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे हा उद्येश आहे परंतु माहितीच्या अनुषंगाने गुणवत्तेच्या (कारवाईच्या) संदर्भात कोणत्याही प्रकारची कारवाई करणे अपेक्षित नसल्याने सदर शासन निर्णयाप्रमाणे त्यांच्या सेवेच्या संदर्भामध्ये तपासणी करुन निर्णय देणे आयोगाच्या अधिकार कक्षेबाहेर आहे. मात्र माहिती अधिकारी यांनी दि. 2.11.2006 रोजी मुद्या क्र. 3 च्या संदर्भात जी माहिती चुकीची दिलेली आहे त्याबद्यल ते दोषी आहेत व शास्तीस पात्र आहे असे दिसून येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 3.10.2006 च्या अर्जातील मुद्या क्र. 3 च्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन न दिल्यामुळे माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता यांना माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 500/— ही शास्ती लादण्यात येत आहे. सदरची शास्ती ही त्यांच्या दरमहाच्या वेतनातून वसूल करण्यात येवून तशा प्रकारचा अहवाल हा आयोगास अधिक्षक अभियंता यांनी सादर करावा.

2) प्रथम अपीलाच्या संदर्भातसुध्दा सुनावणी घेतली गेली नसल्यामुळे सदरच्या अपील कार्यपध्दतीचे तंतोतंत पालन करण्याच्या संदर्भात प्रथम अपीलीय अधिकारी यांना त्याबाबतची हयांच्या संदर्भात त्यांना योग्य तो समज देण्यात यावा.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 30.10.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 579/2007.**

श्री परेश प्रभाकर कोसे

4/2, एनपीटीआय कॉम्प्लेक्स,

गेपाल नगर, नागपूर 440022. ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
नागपूर.

2) जन माहिती अधिकारी,
प्रशासकीय अधिकारी,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
नागपूर. ..... **उत्तरवादी**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 18/10/2006 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा न्याय वैद्यक शास्त्र विभाग हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी गैरहजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दिनांक 1.5.2006 रोजी संचालक वैद्यकीय शिक्षण सेंट जॉर्ज डेंटल कॉलेज मुंबई यांचेकडे नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय

मधील औषध विज्ञान शास्त्र विभागातील सात प्राध्यापकांची माहिती मागितली होती. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने संचालनालय वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन मुंबई यांचे माहिती अधिकारी यांनी दि. 9.6.2006 रोजी अर्जदारानी मागितलेली माहिती ही महाविद्यालयाशी व रुग्णलयाशी संबंधित असल्याने अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर यांना माहिती उपलब्ध करुन देण्याबद्यल पत्राने कळविले व त्या पत्राची प्रत अपीलकर्ता यांनासुध्दा दिली होती. त्यानुसार दि. 27.6.2006 रोजी अपीलकर्ता यांनी माहिती अधिकारी अधिष्ठाता यांचे कार्यालय शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यांचेकडे सदरची माहिती मागण्याकरीता अर्ज दाखल केला होता. सदरची माहिती विहीत मुदतीत न मिळाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 4.8.2006 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्राध्यापक व विभाग प्रमुख न्याय वैद्यकीय शास्त्र यांचेकडे दाखल केले. सदरचे प्रथम अपील दाखल केल्यानंतर दि. 8 ऑगष्ट 2006 रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना डॉ. व्ही. आर. धवानी, डॉ. मनोहर बेडे व डॉ. श्रीकांत परांजपे यांचेकडून प्राप्त झालेली माहिती कळविलेली दिसून येते. सदरची माहिती कळवितांना ज्या दृष्टीने ती माहिती कळविलेली दिसून येते ती माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे नाही व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सदरचे अपीलाची सुनावणी घेतांना अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपूर यांना दि. 5.9.2006 रोजी माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली माहिती ही अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे नसल्याचे कळवून त्यांचेविरुध्द कारवाई करावी अशा प्रकारची विनंती करुन पत्र पाठविलेले दिसून येते. तसेच माहिती अधिकारी श्रीयुत एम. एच. खान यांनासुध्दा माहिती उपलब्ध करुन दिल्याच्याबद्यल आदेश दिलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे उपलब्ध करुन दिलेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे त्यांनी द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. अपीलकर्ता यांनी त्यांच्या माहिती मागण्याच्या अर्जामध्ये एकुण सात डॉक्टरांच्या शैक्षणिक अर्हतेबद्यल माहिती विचारलेली असून काही माहिती ही अभिप्रायात्मक प्रश्नाच्या स्वरुपात विचारलेली दिसून येते. जी माहिती महाविद्यालयात उपलब्ध आहे ती माहिती अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे अभिलेख्याच्या किंवा दस्तऐवजाच्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे अपेक्षित असते. एखाद्या नियुक्तीच्या संदर्भात अनियमितता झालेली असली तरी त्याबाबत माहितीच्या अधिकारामध्ये अभिप्राय येईल असा प्रश्न विचारता येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांचा मुद्या क्र. अ आणि ब मधील माहिती ही महाविद्यालयातील कार्यालयातूनच उपलब्ध करुन देता येवू शकते परंतु मुद्या क्र. 3 मधील विचारलेल्या प्रश्नाची माहिती ही अभिप्रायात्मक असल्यामुळे ती उपलब्ध करुन देता येवू शकत नाही. वास्तविक माहिती अधिकारी यांनी ज्या डॉक्टरांची माहिती विचारलेली आहे त्यांचे शैक्षणिक अर्हतेबद्यल नियुक्तीच्या वेळेस घेतलेल्या प्रमाणपत्राची छायांकित प्रत उपलब्ध करुन द्यावयास पाहिजे होती परंतु तसे न करता प्रत्यक्ष त्या डॉक्टरांनाच त्यांनी अपीलकर्त्याच्या अर्जाचा नमुना पाठवून त्यावरुनच त्यांचे अभिप्राय घेवून ते अपीलकर्ता यास उपलब्ध करुन दिलेले आहे ही माहिती उपलब्ध करुन देण्याची कार्यपध्दती नाही. काही डॉक्टरांच्या संदर्भात त्यांच्या शैक्षणिक अर्हतेप्रमाणे जे प्रमाणपत्र त्यांना मिळालेले असेल त्यानुसार त्यांची पदवी ही मेडीकल कौन्सिल ऑफ इंडिया कडून मान्यताप्राप्त आहे किंवा नाही याबद्यलची माहिती अर्थातच मेडीकल कौन्सिल ऑफ इंडिया किंवा संबंधित विद्यापिठाकडे मिळू शकते. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यास कळविणे हे माहिती उपलब्ध करुन देणे प्रमाणे आहे. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना एकुण चार डॉक्टरांची माहिती ही माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली नाही तर त्यांना मेडीकल कौन्सिल ऑफ इंडिया कडून मिळाली असे त्यांनी द्वितीय अपीलात नमुद केले आहे. असे असले तरी त्यांचा माहिती मिळण्याचा अर्ज व उपलब्ध करुन दिलेली

माहिती ही माहितीचा अर्ज कार्यपध्दतीप्रमाणे हाताळला नसल्यामुळे व माहिती ही विलंबाने उपलब्ध करुन दिली असल्यामुळे व अपूर्ण दिली असल्यामुळे त्यांच्या विरुध्द अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे कारवाई करावी अशी विनंती केलेली आहे.

4. वास्तविक ही बाब प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय देतांना माहिती अधिकारी व अधिष्ठाता यांना त्यांच्या निदर्शनास आणली होती व त्याबाबत कारवाई करण्याचीसुध्दा विनंती केलेली होती. द्वितीय अपीलाचे सुनावणीचे वेळेस म्हणजे आज तात्कालीन माहिती अधिकारी कोण होते हयाबद्यलची माहिती विचारली असता प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले की ते सेवानिवृत्त झालेले आहेत व अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे शास्ती लादण्यात आली तरी ते सेवानिवृत्त असलयामुळे त्यांच्या निवृत्ती वेतनातून शास्तीची रक्कम ही वसूल करणे अपरिहार्य ठरेल. तसेच ते सेवानिवृत्त झालेले असत्यामुळे अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे त्यांना त्यांच्या विरुध्द शास्ती लादवयाची झाल्यास त्यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी द्यावी लागेल. आज अपिलकर्ता हजर नसल्यामुळे व कोणत्याही प्रकारची त्यांनी गैरहजर राहण्यासाठी परवानगी घेतलेली नसल्यामुळे याबद्यलचा अपीलकर्ता यांचे म्हणणे काय आहे हे कळणेस मार्ग नाही. अपीलकर्ता अशा प्रकारे गैरहजर राहिल्यास व त्यास मुदत दिल्यास आयोगाकडे प्रलंबित असलेल्या अपिलांचे निर्णय हे होवू शकणार नाही व अपीले प्रलंबित राहण्यास संख्या वाढत जाईल त्यामुळे अपीलकर्ते यांचे गैरहजेरीत सुध्दा अपीलांची सुनावणी घेणे हे अपरिहार्य होवून बसले आहे. अपीलकर्ता यास माहिती पाहिजे असल्यामुळे त्यांनी हजर राहाणे आवश्यक आहे परंतु या प्रकरणामध्ये त्यांना माहिती उपलब्ध झाली आहे असे त्यांचे द्वितीय अपील मेमोवरुन दिसून येते. फक्त त्यांना ती विहीत मुदतीत उपलब्ध झाली नाही व त्यामुळे शास्ती लादण्यात यावी

याबद्यलचा त्यांचा आग्रह दिसतो. शास्तीच्या बद्यल वर विवेचन आलेले असल्यामुळे व अपीलकर्ता यास माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 31.10.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 582/2007.**

श्री त्र्यंबकराव सुपडाजी आळशी
मु. पो. माटरगाव बु.
ता. शेगाव जि. बुलढाणा ..... **अपिलकर्ता अर्जदार**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद बुलढाणा

2) जन माहिती अधिकारी,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद बुलढाणा ..... **उत्तरवादी**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक 19/2/2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व त्यांचे वकील ॲड. श्रीमती जाचक हे हजर आहेत व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी नस्तीमध्ये दाखल केल्याप्रमाणे असे दिसून येते की दिनांक 8.11.2006 रोजी व दि. 25.11.2006 रोजी असे दोन वेगवेगळे अर्ज वेगवेगळी माहिती मागण्याकरीता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय बुलढाणा यांचेकडे

केलेली दिसून येतात. सदरच्या दोनही अर्जांच्या संदर्भात प्रथम अपील दाखल केलेले दिसून येत नाही. मात्र राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करुन दोनही अर्जात त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही असे त्यांनी द्वितीय अपीलात म्हटलेले आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे तरतुदीप्रमाणे कलम 6 प्रमाणे माहितीचा अर्ज दाखल केल्यानंतर त्याची प्रक्रिया सुरु होते व माहिती विहीत मुदतीत दिली नाही तर प्रथम अपील सादर करावे लागते व प्रथम अपीलाच्या निर्णयातसुध्दा समाधान न झाल्यास द्वितीय अपील सादर करावे लागते. माहिती ही विहीत मुदतीत उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्यामुळे एकाच द्वितीय अपीलांमध्ये दोन वेगवेगळया तारखांच्या अर्जांचा विचार करता येत नाही. कारण प्रत्येक अर्जाच्या तारखेप्रमाणे माहिती देण्याची, प्रथम अपील करण्याची किंवा द्वितीय अपील करण्याची मुदत ही बदलत जाते व त्याप्रमाणे आयोगाचा निर्णय दिला जातो. वास्तविक माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 5 अन्वये प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये ज्या ज्या स्तरावर जी जी माहिती उपलब्ध असते ती माहिती उपलब्ध करुन देण्याच्या उद्येशाने माहिती अधिकारी नियुक्त केलेले आहेत. ग्रामपंचायत स्तरावर माहिती अधिकारी हे ग्रामसचिव, अपीलीय अधिकारी गट विकास अधिकारी आहेत. त्याचप्रमाणे प्रत्येक वरच्या स्तरापर्यंत त्या त्या स्तरावरती माहिती विहीत मुदतीत मिळण्याकरीता माहिती अधिकारी नियुक्त केलेले आहेत. त्याप्रमाणे माहिती ही ग्रामपंचायत स्तरावरची असेल आणि अर्ज मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांचेकडे केलेला असेल तर माहिती ही 30 दिवसात उपलब्ध करुन देणे शक्य होईल असे नाही कारण त्या अर्जाचा प्रवास हा माहिती कोणत्या स्तरावरची आहे हे शोधण्या पासून तर पाठविण्यापर्यंत सुरु असते व तसाच काहीसा प्रकार अपीलकर्ता यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांचेकडे केलेला

असल्यामुळे झालेला दिसतो. दि. 25.11.2006 चा अर्ज हा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून गट विकास अधिकारी पंचायत यांचेकडे हस्तांतर केलेला आहे असे गट विकास अधिकारी यांनी सांगितले व त्याप्रमाणे दि. 3.1.2007 रोजी अंडर पोष्टिंग सर्टिफिकेट ने अपीलकर्ता यांना गट विकास अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसते. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना सदरची माहिती ही मिळालेली नाही व त्यामुळेच त्यांनी दि. 31.1.2007 रोजी पुन्हा परत स्मरणपत्र पाठविले होते. परंतु सार्वजनिक प्राधिकरणामध्ये एकदा पोष्टाने माहिती पाठविल्याचा पुरावा (Under Certificate of Posting) असल्यास (दिलेली आहे) व त्याबद्यल पोष्टाचा पुरावा दिलेला आहे त्यावेळेसच त्यांची निर्गमीत करण्याची जबाबदारी संपते व त्यामुळे गट विकास अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही असे म्हणता येत नाही. परंतु अपीलकर्ता यांना जरी ती माहिती पोष्टाद्वारे उपलब्ध झाली नसली तरी आता सदरची माहिती गट विकास अधिकारी पंचायत समिती शेगाव यांनी अपीलकर्ता यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल.

3. पुन्हा प्रश्न माहिती विलंबाने उपलब्ध करुन देण्याचा येतो त्याकरीता वर विवेचन केल्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी मुळात मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडेच सर्व अर्ज केल्यामुळे त्या अर्जांच्या प्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब निश्चितच झालेला आहे. परंतु त्या त्या स्तरावर माहिती अधिकारी म्हणून अर्ज केले असते तर त्यांना विहीत मुदतीत माहिती उपलब्ध होवू शकली असती. त्यातही त्यांना प्रथम अपील हे गट विकास अधिकारी यांच्याकडे सादर करता आले असते परंतु अशा कोणत्याही प्रकारचे कार्यपध्दतीचे पालन न झाल्यामुळे हा विलंब झालेला आहे व त्यामुळे कोणत्याही माहिती अधिका–यास त्याबाबत दोषी धरता येत नाही. कार्यपध्दतीच्या तांत्रिक बाबी पाळल्या गेल्या नसल्यामुळे हा विलंब झालेला आहे परंतु माहिती उपलब्ध करुन देणे हा उद्येश असल्यामुळे सदरचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून त्यांच्या दिनांक 25.11.2006 च्या अर्जाप्रमाणे त्यांना पुन्हा माहिती उपलब्ध करुन द्यावी व त्यांचेकडून त्याप्रमाणे पोच घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दिनांक 31.10.2007

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.